मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | शनिवार, १ फेब्रुवारी २०२५ | वर्ष - २९ | अंक - २२२ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## टीम इंडियाने टी -20 मालिका जिंकली

**पुणे :** टीम इंडियाने पुण्याच्या एमसीए स्टेडिय मवर इंग्लंड संघाला चौथ्या रोमहर्षक टी 20 सामन्यात 15 धावांनी पराभूत करीत 5 लढतीच्या मालिकेत 3-1अशी अपराजित आघाडी घेत मालिका खिशात घातली. हार्दिक पांड्या आणि शिवम दुबेच्या तुफानी शतकी खेळी आणि फिरकीवीर रवी बिष्णोई व वेगवान गोलंदाज हर्षित राणाच्या अफलातून गोलंदाजीच्या बळावर गोऱ्या साहेबांना 15 धावांनी पराभूत केले.भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना 20 षटकांत 9 बाद 181 असे तगडे आव्हान इंग्लंडसमोर ठेवले होते. इंग्लंडच्या फलंदाजांनीही आरंभाला आपला बेसबॉल खेळ दाखवत यजमान संघाच्या तोंडाला फेस आणला होता.पण रवी बिष्णोई आणि हर्षित राणा यांनी इंग्लिश फलंदाजांना विजयाच्या समीपच रोखत टीम इंडियाचा रोमांचक विजय साकारला.



झुकेरबर्ग ट्रम्प यांना 217 कोटी रुपयांची भरपाई देणार

पान 8

## म ह त्त्वा चे

### अंडी घेऊन आव्हाड थेट जिल्हाधिकारी कार्यालयात



**ठाणे :** राज्य शासनाकडून शालेय विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जाते. या मध्यान्ह भोजनात पोषक तत्त्वांचा समावेश असावा, असा दंडक आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या पोषण आहारातून अंडी गायब झाल्याचा फटका राज्यातील 24 लाख विद्यार्थ्यांना बसू लागला आहे. या पोषण आहारातील अंड्यांसाठी वर्षाला 50 कोटींची तरतूद करण्यात सरकार अपयशी ठरले असल्याचा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा विधिमंडळ गटनेते डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकारला अंडी पाठवून अनोखा निषेध केला.

### माझ्याही जिवाला धोका



**पालघर:** बारा दिवसापासून अपहरण झालेल्या शिवसेना शिंदे गटाचे डहाणू विधानसभा संघटक अशोक धोडी यांच्या तपासासंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. अशोक धोडी यांची गाडी आणि मृतदेह गुजरातच्या भिलाडमधील सरिगाम माला फलीया येथील एका बंद पडलेल्या खदानीमध्ये मिळून आली आहे. दरम्यान गेल्या बारा दिवसापासून तपास घेत असलेल्या पालघर पोलीस आणि गुन्हे अन्वेषण शाखेला अखेर यश आले आहे. तर ज्या पद्धतीने माझ्या वडिलांची ज्यांनी हत्या केलीय, त्यांनाही तशाच प्रकारची शिक्षा व्हावी, अशी मागणी अशोक धोडी यांच्या मुलाने केली आहे. सोबतच आमच्या जीवालाही धोका असल्याची भीती मृत अशोक धोडी यांचा मुलगा आकाश धोडी याने व्यक्त केले आहे. कौटुंबिक वाद आणि इतर वादातून त्यांच्या भावानेच आपल्या साथीदारांना सोबत घेऊन अशोक धोडी यांची हत्या केल्याचं यानंतर उघड झालंय .

संबंधित वृत्त पान 2 वर

### ममताची किन्नर आखाड्यातून हकालपट्टी

**प्रयागराज :** बॉलिवूड अभिनेत्री ममता कुलकर्णी यांना किन्नर आखाड्याच्या महामंडलेश्वर पदावरून हटवल्याची मोठी माहिती निदर्शनास येत आहे.



त्यांच्यासोबतच लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांनाही आचार्य महामंडलेश्वर पदावरून हटवण्यात आले आहे. याबाबत किन्नर आखाड्याचे संस्थापक ऋषी अजय दास यांनी नुकतीच घोषणा करत किन्नर आखाड्याची पुनर्रचना केली जाणार असल्याचेही सांगितले. ममता कुलकर्णी यांना किन्नर आखाड्याची महामंडलेश्वर बनवल्यापासून नवा वाद सुरु झाला होता. एखाद्या स्त्रीला किन्नर आखाड्याचे महामंडलेश्वर कसे केले जाऊ शकते, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभ दरम्यान ममता कुलकर्णी यांनी काही दिवसांपूर्वी आपले पिंडदान करून सन्यास घेतला होता. यानंतर भव्य स्वरुपात पट्टाभिषेक करत त्यांना किन्नर आखाड्याचे महामंडलेश्वर करण्यात आले होते.

## संकटात सापडलेल्या धनंजय मुंडेंच्या मदतीला भगवानगड

# सरपंच हत्या प्रकरणातील आरोपींची मानसिकताही समजून घेतली पाहिजे...

### नामदेवशास्त्रींच्या वादग्रस्त विधानामुळे खळबळ

प्रतिनिधी
■ बीड

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आज एक मोठा ट्विस्ट आला. वंजारी समाजबांधवांमध्ये आदराचे स्थान असणाऱ्या भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांनीही मंत्री धनंजय मुंडेंना गुन्हेगार नसल्याचे प्रमाणपत्र आज दिले. त्याचबरोबर मस्साजोगमध्ये घडलेल्या घटनेसंबंधी ते म्हणाले की, ज्या लोकांनी हे प्रकरण केले त्यांची मानसिकता का बिघडली, हे देखील तपासले पाहिजे महंतांच्या या विधानामुळे मोठी खळबळ उडाली असून त्यांच्यावर आता समाजाच्या सर्व वर्गांमधून मोठी टीका होत आहे.



सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे. त्यासोबतच विष्णू चाटे हा राष्ट्रवादीचा तालुकाअध्यक्ष होता. हत्याकांडातील आरोपींशी मंत्री मुंडेंचे आर्थिक संबंध असल्याचे आरोप होत आहेत. मुंडे मंत्रीपदावर असल्यामुळे संतोष देशमुख हत्याकांडाचा तपास निष्पक्षपणे होणार नाही, असा आरोप करत विरोधकांकडून मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही मंत्री मुंडेंना सध्यातरी अभय दिले आहे.

संतोष देशमुख हत्याकांडानंतर अडचणीत आलेले धनंजय मुंडे यांनी विधानसभा निवडणुकीनंतर काल प्रथमच भगवान गडला भेट दिली. गुरुवारी रात्री त्यांनी नामदेव शास्त्री यांची भेट घेतली. आज सकाळी त्यांनी भगवान बाबांचे दर्शन घेतले. दरम्यान रात्री नामदेव शास्त्री आणि धनंजय मुंडे यांच्यात चर्चा झाल्याचे नामदेवशास्त्री यांनी आज सकाळी माध्यमांशी बोलताना सांगितले.

पान 8 वर

## सरकारने 18 तास सत्य लपवलं, 6 ठिकाणी झाली होती चेंगराचेंगरी

### अविमुक्तेश्वरानंद सरस्वतींच्या विधानामुळे खळबळ



वृत्तसंस्था
■ प्रयागराज

प्रयागराज येथे महाकुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीनंतर अनेक संत-महंतांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेनंतर शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनीही उत्तर प्रदेश सरकारवर आपली नाराजी व्यक्त केली आहे. शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी नाराजी व्यक्त करत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. चेंगराचेंगरीसारखी हृदयद्रावक घटना लपवणे योग्य नाही. 1-2 नव्हे तर तब्बल 6 ठिकाणी चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली होती, असे ते म्हणाले.

शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी (योगी आदित्यनाथ ) एवढी मोठी घटना 18 तास लपवून ठेवली, हे खूप वेदनादायक आहे. यानंतरही लोकांच्या मृत्यूची आकडेवारी लपवली जात आहे. अफवांवर लक्ष देऊ नका, असे मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या सोशल मीडिया हँडलवरून सांगितले होते. जोपर्यंत मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिले नाही, तोपर्यंत या सर्व गोष्टी फक्त अफवा असल्याचे वाटत होते. मात्र 18 तासांनंतर मुख्यमंत्र्यांनीच अपघात आणि लोकांच्या मृत्यूची कबुली दिली. शंकराचार्य म्हणाले की, पोलीस अधिकाऱ्याने त्यांना सांगितले होते की, 1-2 नव्हे तर 6 ठिकाणी चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली होती.

## भारताचा विकासदर 6.8 टक्के राहणार

### आज सादर होणार अर्थसंकल्प

■ नवी दिल्ली

संसदेत सादर केलेल्या आर्थिक पाहणी अहवाल 2024-25 नुसार, आर्थिक वर्ष 2026 मध्ये भारताची अर्थव्यवस्था 6.3 टक्के ते 6.8 टक्क्यांदरम्यान वाढण्याचा अंदाज आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनातच्या पहिल्या दिवशी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतामरामन यांनी संसदेत आर्थिक पाहणी अहवाल सादर केला. जागतिक अनिश्चितते असूनही भारताने आपला आर्थिक विकास कायम ठेवला आहे यावर या आढाव्यात भर देण्यात आला. आर्थिक वर्ष 25 मध्ये भारताचा वास्तविक जीडीपी वाढ



6.4 टक्के असेल, जो दशकाच्या सरासरीच्या अगदी जवळ असल्याचे नमूद करण्यात आले आहे. चढ-उतार होणाऱ्या विकास दरांना पाहता, आर्थिक वर्ष 26 मध्ये वास्तविक जीडीपी 6.3 टक्के आणि 6.8 टक्के दरम्यान राहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

पुरवठ्याच्या बाबतीत म्हटले आहे की वास्तविक मूल्यवर्धित (जीव्हीए) 6.4 टक्के वाढण्याचा अंदाज आहे. 2025 या आर्थिक वर्षात कृषी क्षेत्रात 3.8 टक्के वाढ होण्याची शक्यता आहे. तिथेच. 2025 मध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास दर 6.2 टक्के राहण्याचा अंदाज आहे. बांधकाम आणि वीज, वायू, पाणीपुरवठा आणि इतर उपयुक्तता सेवा क्षेत्रातील मजबूत वाढीचा दर औद्योगिक विस्ताराला पाठिंबा देऊ शकतो. वित्तीय, रिअल इस्टेट, व्यावसायिक सेवा, सार्वजनिक प्रशासन, संरक्षण आणि इतर सेवांमध्ये वाढत्या घडामोडींमुळे सेवा क्षेत्र 7.2टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे. 2047 पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी, भौगोलिक-आर्थिक विखंडन, चीनने उत्पादनावर ताबा मिळवणे आणि ऊर्जा संक्रमणाच्या प्रयत्नांमध्ये चीनवर अवलंबून राहणे या उदयोन्मुख जागतिक वास्तवाच्या प्रकाशात भारताच्या मध्यम-मुदतीच्या विकासाच्या दृष्टिकोनाचे मूल्यांकन करणे महत्वाचे आहे, असे अहवालात सांगण्यात आले आहे. त्याचप्रमाणे भारताने प्रणालीगत नियमनाच्या मुख्य घटकावर लक्ष केंद्रित करताना, विकासासाठी अंतर्गत संसाधने आणि देशांतर्गत प्रोत्साहनांवर पुन्हा भर देण्याची आवश्यकता आहे. असे नमूद करण्यात आले आहे.

## मविआच्या काळात फडणवीस-शिंदेंना अटक करण्याचा कट रचला गेला का?

### महायुती सरकारकडून तपासासाठी SIT स्थापन

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर महाविकास आघाडीचे सरकार असताना खोटे गुन्हे दाखल करून अडकविण्याचा कट रचल्याचे षडयंत्र आखले गेले होते, असा आरोप भाजपाचे नेते प्रवीण दरेकर यांनी केला होता. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी दरेकर यांनी डिसेंबर महिन्यात नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात केली होती. आता या मागणीच्या आधारावर महायुती सरकारने सदर प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी स्थापन केली आहे. कायदा व सुव्यवस्थेचे पोलीस सह आयुक्त सत्यनारायण चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील विशेष तपास पथक या प्रकरणाची चौकशी करेल.

महायुती सरकारने यासंबंधीचा शासन निर्णय ३१ जानेवारी रोजी काढला आहे. या विशेष तपास पथकात राजीव जैन (पोलीस उपमहानिरीक्षक, एसआरपीएफ, मुंबई), नवनाथ ढवळे (पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६ मुंबई) आणि आदिकराव पोळ (सहायक पोलीस आयुक्त – मुंबई शहर) या तीन अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

पान 8 वर



## राज्यपाल होणे म्हणजे तोंडाला टाळे ठोकणे, मी असा मोकळाच बरा!

प्रतिनिधी
■ मुंबई

मी राज्यपाल होऊन काय करू? राज्यपाल होणे म्हणजे तोंडाला टाळे ठोकणे. त्यापेक्षा मी मोकळाच बरा, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे भुजबळांची नाराजी दूर करण्यासाठी त्यांच्यापुढे राज्यसभेच्या सदस्यत्वासह राज्यपालपदी संधी देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

छगन भुजबळ सध्या राज्य मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यामुळे नाराज आहेत. त्यांनी आपली नाराजी अनेकदा उघडपणे बोलून दाखवली आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देण्याचेही संकेत दिलेत. त्यामुळे त्यांची मनधरणी करण्यासाठी महायुतीकडून जोरकसपणे प्रयत्न केले जात आहेत. यासाठी महायुतीने त्यांच्यापुढे राज्यसभेचे सदस्यत्व किंवा राज्यपालपद स्वीकारण्याचा प्रस्ताव ठेवल्याचीही चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर छगन भुजबळ यांनी शुक्रवारी एका वृत्तवाहिनीशी बोलताना उपरोक्त विधान

**_संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना हाल-हाल करून मारा_**

*छगन भुजबळ यांनी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी नव्हे तर हालहाल करून मारण्याची मागणी केली. संतोष देशमुख यांना अत्यंत अमानुषपणे मारण्यात आले. राक्षसही अशी कृती करणार नाही. परभणीच्या प्रकरणात पोलिसांनी सोमनाथ सूर्यवंशी यांना ठार मारले. ते मराठा होते की दलित होते हा प्रश्न नाही. ती दोघेही माणसे होती. सर्वच घटकांनी त्याचा निषेध केला पाहिजे. एखादा या समाजाचा आहे म्हणून हे करा व तो दुसऱ्या समाजाचा आहे म्हणून विरोध करा हे मला काही पटत नाही, असे भुजबळ म्हणाले.*

## राष्ट्रपती थकलेल्या नाहीत!

### सोनिया गांधींच्या टीकेनंतर राष्ट्रपती भवनातून प्रत्युत्तर

■ नवी दिल्ली

"राष्ट्रपती यांची भाषण करता करता चांगलीच दमछाक झाली. त्या कशाबशा बोलत होत्या", अशी टीका सोनिया गांधी यांनी आजच्या राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर केली. त्यांच्या या टीकेवर आता प्रत्युत्तर यायला लागले असून राष्ट्रपती कार्यालयातूनही यावर उत्तर देण्यात आलं आहे. सोनिया गांधींचं विधान अस्वीकार्य आहे, असं कार्यालयातून सांगण्यात आलं आहे.

"संसदेतील माननीय राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर माध्यमांना प्रतिक्रिया देताना काँग्रेस पक्षाच्या काही प्रमुख नेत्यांनी उच्चपदस्थांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणारी टिप्पणी केली आहे आणि म्हणूनच ती अस्वीकार्य आहे. या नेत्यांनी म्हटले आहे की राष्ट्रपती शेवटपर्यंत खूप थकल्या होत्या आणि त्या बोलू शकत नव्हत्या", असं राष्ट्रपती भवनातील प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

राष्ट्रपती भवन स्पष्ट करू इच्छिते की, "राष्ट्रपती कोणत्याही टप्प्यावर थकल्या नव्हत्या. खरंच, त्यांचा असा विश्वास आहे की उपेक्षित समुदायांसाठी, महिला आणि शेतकऱ्यांसाठी बोलणे थकवणारे असू शकत नाही. राष्ट्रपती कार्यालयाचा असा विश्वास आहे की कदाचित या नेत्यांनी हिंदीसारख्या भारतीय भाषांमधील वाक्प्रचार आणि भाषण समजले नसेल आणि त्यामुळे त्यांचा गैरसमज निर्माण झाला असेल."



## आपच्या 7 आमदारांचा राजीनामा, पक्षही सोडला

■ नवी दिल्ली

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या 5 दिवस आधी आम आदमी पक्षाच्या 7 विद्यमान आमदारांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे. यामध्ये मेहरौली, त्रिलोकपुरी, जनकपुरी, बिजवासन, पालम, आदर्श नगर, कस्तुरबा नगर विधानसभा जागांचा समावेश आहे.

मेहरौलीचे दोन वेळा आमदार राहिलेले नरेश यादव यांनी शुक्रवारी पक्षाचा राजीनामा दिला आहे. राजीनाम्याचे कारण त्यांनी पक्षात पसरलेला भ्रष्टाचार असल्याचे सांगितले. त्यांनी X वर पक्ष सोडण्याचे कारणही दिले आहे.इ त्यांनी लिहिले, भारतीय राजकारण भ्रष्टाचार मुक्त करण्यासाठी भ्रष्टाचाराविरुद्ध अण्णांच्या आंदोलनातून 'आप'चा उदय झाला. पण आता आम आदमी पक्ष भ्रष्टाचार कमी करू शकला नाही, उलट 'आप'च भ्रष्टाचाराच्या दलदलीत अडकली आहे, याचे मला खूप वाईट वाटते.

त्यांनी लिहिले आहे, केवळ प्रामाणिकपणाच्या राजकारणासाठी मी आम आदमी पक्षात सामील झालो होतो. आज प्रामाणिकपणा कुठेच दिसत नाही. मेहरौली विधानसभेत गेली 10 वर्षे मी 100 टक्के प्रामाणिकपणे काम केले आहे. मी प्रामाणिकपणाचे राजकारण केले, चांगल्या वागणुकीचे राजकारण केले आणि कामाचे राजकारण केले हे मेहरौलीतील लोकांना माहीत आहे.

पालमच्या आमदार भावना गौर, मेहरौलीचे आमदार नरेश यादव, जनकपुरीचे आमदार राजेश ऋषी, त्रिलोकपुरीचे आमदार रोहित मेहरौलिया, कस्तुरबा नगरचे आमदार मदन लाल, जवासनचे आमदार भूपेंद्र सिंह जून, आदर्श नगरचे आमदार पवन शर्मा हे पक्षाला सोडचिठ्ठी देणारे 'आप'चे आमदार आहेत.

## मराठी साहित्यासाठी AI चा वापर करा : फडणवीस

प्रतिनिधी
■ पुणे



आज सगळीकडे एआयचा बोलबाला पाहायला मिळत आहे. या तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसारासाठी वापर केला पाहिजे. AI युगात जर आपण स्मॉल लँग्वेज मॉडेलमध्ये सर्व साहित्यिकांचे साहित्य टाकले. तर येणाऱ्या पिढीला साहित्यिकांनी काय लिहिले आहे, हे समजेल. त्यासाठी मराठी भाषा विभागाने एआयचा वापर करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आजपासून तिसरे विश्व मराठी संमेलन सुरू झाले आहे. त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मी पुन्हा येईल, हे वाक्य मला पिच्छा सोडत नाही, एखादा शब्द आपल्याला चिपकतो. जेव्हा जेव्हा विश्व मराठी संमेलन होईल. तेव्हा मी पुन्हा येईल, मी पुन्हा येईल, मी पुन्हा येईल. मराठी माणूस जगाच्या पाठीवर कुठे ही असला, तरी तिथे गुणवत्ता आणतो. दुधात साखरेसारखे काम करतो. कुठलं शहर किंवा देश सोयीचे असेल, यावर चर्चा करून 5 वर्षात ही संमेलन परदेशात घेऊ, असे सांगून परदेशात मराठी संमेलन घेऊन मराठी भाषेचा डंका सातासमुद्रापार वाजवू, असेही ते म्हणाले.

# 'आप'वाले दिल्लीचे तर काँग्रेसवाले स्वतःला देशाचे मालक समजतात!

### काँग्रेसच्या राजघराण्याने राष्ट्रपतींचा अपमान केला

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली



दिल्ली विधानसभा निवडणुकीसंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज द्वारका येथे एक सभा घेतली. ते म्हणाले की, देशाने पुन्हा एकदा काँग्रेसच्या राजघराण्याचा अहंकार पाहिला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेत भाषण केले. हिंदी ही त्यांची मातृभाषा नाही, तरीही त्यांनी खूप चांगले भाषण दिले, परंतु काँग्रेसच्या राजघराण्याने त्यांचा अपमान करायला सुरुवात केली आहे. काँग्रेस आणि आपदा दोघांमध्येही खूप अहंकार आहे. हे आपचे लोक स्वतःला दिल्लीचे मालक म्हणवतात. काँग्रेसचे लोक स्वतःला देशाचे मालक मानतात.

ते म्हणाले की, आपदावाल्यांनी त्यांचे राजकारण चमकवण्यासाठी दिल्लीला एटीएम बनवले आहे. या लोकांनी दिल्लीचे पैसे उकळले आहेत, दिल्लीची लुटमार केली आहे. ज्यांनी दिल्ली लुटली आहे, त्यांना ती परत करावीच लागेल. दिल्लीला संघर्षाचे नव्हे, तर समन्वयाचे सरकार हवे आहे.

माझ्याकडे स्वतःचे घर नाही, पण माझे स्वप्न आहे की प्रत्येक गरिबाला पक्के घर उपलब्ध करून द्यावे. पण येथील आप सरकार तुम्हाला योग्य घरे मिळू नयेत यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. ते टीव्हीवर, वर्तमानपत्रात, रस्त्याच्या कडेला आपले चेहरे चमकवण्यासाठी पाण्यासारखे पैसे खर्च करत आहेत, पण आपचे लोक तुमचे गल्ली, गटार, नाले, रस्ता, पाईपलाईन बांधण्यासाठी पैसे देत नाहीत. भाजप दिल्लीला किती आधुनिक बनवू इच्छित आहे, याची झलक द्वारकेमध्ये दिसते. केंद्र सरकारने येथे एक भव्य यशोभूमी बांधली. यशोभूमीमुळे द्वारका आणि दिल्लीतील हजारो तरुणांना रोजगार मिळाला आहे आणि येथील लोकांचा व्यवसाय वाढला आहे. येणाऱ्या काळात हा संपूर्ण परिसर एक प्रकारचा स्मार्ट सिटी असेल.

दिल्लीला केंद्र आणि राज्य सरकारच्या डबल इंजिन सरकारची आवश्यकता आहे. तुम्ही काँग्रेसला अनेक वर्षे सत्तेत पाहिले, त्यानंतर 'आप'ने दिल्ली ताब्यात घेतली. तुम्ही मला वारंवार देशसेवा करण्याची संधी दिली आहे, आता मला डबल इंजिन सरकार बनवून दिल्लीचीही सेवा करण्याची संधी द्या. 29 जानेवारी रोजी दिल्लीतील पहिल्या रॅलीत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केजरीवालांवर निशाणा साधला होता. करतार नगरमध्ये पंतप्रधानांनी 50 मिनिटांचे भाषण केले. यावेळी त्यांनी शिक्षण घोटाळा, दारू घोटाळा, शीशमहाल यांचा उल्लेख केला. यमुनेत विष मिसळल्याच्या केजरीवालांच्या आरोपांनाही प्रत्युत्तर दिले.

## धर्माबाद तालुकाप्रमुखपदी शंकर शंकरवार

**मुंबई :** उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, शिवसेनाप्रणीत ओबीसी व बाराबलुतेदार धर्माबाद तालुकाप्रमुखपदी शंकर नागनाथ शंकरवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना नियुक्तीचे पत्र नुकतेच बाळासाहेब भवन येथे देण्यात आले. शंकरवार यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन नियुक्ती झाली असल्याचे बोलले जाते आहे. यावेळी शिवसेना सहसचिव एकनाथ शेलार, नांदेड जिल्हाप्रमुख मेरसिंग पवार उपस्थित होते.



## थोडक्यात

### ॲप्टेकमार्फत क्रिएटिव्ह मूल्यांकन टूल 'क्रेव्हल' लाँच

**मुंबई:** ॲप्टेक लिमिटेड या देशातील व्यावसायिक प्रशिक्षण क्षेत्रातील अग्रणी कंपनीने नुकतेच अद्वितीय, एआय-समर्थित क्रिएटिव्ह मूल्यांकन टूल 'क्रेव्हल' लाँच केले आहे, ज्यामध्ये रिअल-टाइममध्ये व्हिज्युअल क्रिएटिव्हजचे मूल्यांकन करण्यासाठी मानवी कौशल्यासह जनरेटिव्ह एआयचे संयोजन आहे. क्रेव्हल ॲमेझॉन बेडरॉकच्या मॉडेल निवड, कस्टमायझेशन, सुरक्षितता, गोपनीयता आणि सेफ्टी गार्डरेल्य (सुरक्षा रेलिंग) या क्षमतांचा वापर करत क्रिएटिव्ह प्रोफेशनल्यच्या कलाकृतींचे संरक्षण करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. क्रेव्हल शिक्षण आणि क्रिएटिव्ह आर्ट्स उद्योगांमध्ये जनरेटिव्ह एआयच्या एकीकरणामधील महत्त्वपूर्ण पाऊल आहे.
क्रेव्हल जगभरातील क्रिएटिव्ह प्रोफेशनल्य आणि महत्त्वाकांक्षी आर्टिस्ट्ससाठी उपलब्ध आहे. सर्जनशीलतेने प्रेरित विश्वामध्ये मीडिया व मनोरंजन क्षेत्रातील आर्टिस्टस त्यांची कला निपुण करण्यासाठी आणि उच्च-स्तरीय कलाकृती निर्माण करण्यासाठी सतत टूल्यचा शोध घेत आहेत. या गरजेची पूर्तता कणारे क्रेव्हल जनरेटिव्ह एआय-समर्थित टूल आहे, जे विशिष्ट व सर्वसमावेशक अभिप्राय, सविस्तर विश्लेषण, कृतीशील माहिती आणि संयुक्त स्कोअर देते. क्रेव्हल ॲनिमेशन, ३डी, ग्राफिक्स, फोटोग्राफी अशा विविध व्हिज्युअल आर्ट्सचे मूल्यांकन करते.
क्रेव्हल आता जगभरातील क्रिएटिव्ह प्रोफेशनल्य, स्टुडिओ आणि शैक्षणिक संस्थांसाठी उपलब्ध आहे. याबाबत अधिक माहितीसाठी किंवा क्रेव्हलचा अनुभव घेण्यासाठी https://www.proalley.com/क्रेवाल भेट द्या.

### आरोपीचा न्यायालयातून पळून जाण्याचा प्रयत्न, गुन्हा दाखल

**मुंबई:** पोक्सो गुन्ह्यांतील आरोपीने कुलाब्यातील सत्र न्यायालयातून पळून जाण्याचा प्रयत्न केला. आरोपीला तात्काळ ताब्यात घेण्यात आले असून याप्रकरणी कुलाबा पोलिसांकडे तक्रार करण्यात आली आहे. पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून आरोपीला सध्या आर्थर रोड कारागृहात ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.कुलाबा येथे कोर्ट रूम ३३ येथे आरोपीला बुधवारी आणण्यात आले होते. सुनावणी झाल्यानंतर कोर्टरूम बाहेरील मोकळ्या जागेत उभा असताना आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याचा ताब्यात घेण्यात आले. आरोपीला सध्या आर्थररोड कारागृहात ठेवण्यात आले आहे. महिला पोलीस शिपायाच्या तक्रारीवरून याप्रकरणी कुलाबा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २६२ अंतर्गत अटकेला प्रतिकार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिवसेना नेते अशोक धोडींचा 'दृश्यम' स्टाईल मर्डर: खाणीच्या पाण्यात सापडली कार, डिक्कीत मृतदेह

**प्रतिनिधी**
**पालघर**

शिवसेना शिंदे गटाचे नेते अशोक धोडी हे गेल्या १२ दिवसांपासून बेपत्ता आहेत. या प्रकरणात पोलिसांना काही अंशी यश आल्याचे समोर आले आहे. अशोक धोडी यांची लाल रंगाची ब्रेझा कार गुजरातच्या भिलाड येथील सरिग्राम मालाफलिया येथे एका बंद दगड खाणीत सापडली आहे. घटनेची माहिती कळताच पालघर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

पालघर पोलिसांनी येथील गोतेखोरांच्या मदतीने तसेच हायड्राच्या मदतीने अशोक धोडी यांची कार पाण्यातून वर काढण्यात आली आहे. तसेच या शोध मोहिमेत गोतेखोरांना एक काळ्या रंगाचे जॅकेट तसेच पांढऱ्या रंगाचे हेडफोन सापडले आहे. कारची तपासणी केलील असता कारच्या डिक्कीत अशोक धोडी यांचा मृतदेह आढळून आला आहे.

### पालघर पोलिसांनी शिताफीने उलघडले खुनाचे गूढ



यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

अशोक धोडी हे डहाणू तालुका विधानसभा संघटक होते. अशोक धोडी हे 20 जानेवारीपासून बेपत्ता होते. याप्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली आहे. धोडी यांचा शोध घेण्यासाठी आठ टीम तयार करण्यात आल्या होत्या. आरोपींनी दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी गुजरातच्या भिलाडमध्ये जाऊन धोडी यांचा शोध घेतला असता येथील एका बंद खाणीत धोडी यांची कार सापडली.

गोतेखोर आणि क्रेनच्या मदतीने ही कार काढण्यात आली. या कारचा तपास केला असता कारच्या डिक्कीत अशोक धोडी यांचा मृतदेह आढळून आला आहे. मात्र, आता हा खून कोणी केला? कोणी केले होते अपहरण? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. पोलिसांचा तपास त्या दिशेने सुरू आहे. पालघरचे पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील स्वतः याप्रकरणाचा तपास करत आहेत. विशेष म्हणजे कारमधील मृतदेह नेमका कोणाचा आहे, त्यांचाच आहे का, याचा तपास केला जात आहे.

***अशोक धोडी यांचा भाऊ अविनाश धोडी फरार***

*अशोक धोडी यांचा भाऊ अविनाश धोडी पोलिसांचा तपास सुरू असतानाच फरार झाला असल्याचे समजते. गेल्या काही वर्षापासून अशोक धोडी आणि त्यांचा भाऊ अविनाश धोडी यांच्यात संपत्तीबाबत वाद सुरू होते. वैयक्तिक वैमनस्यातून भावाने अन्य आरोपींसोबत मिळून हे कृत्य केले असावे, असा अंदाज वर्तवला जात आहे.अशोक धोडी हे २० जानेवारी रोजी मीरा रोड साई बाबा नगर येथील श्रीनगर अपार्टमेंट येथे आल्याचे तिथल्या सीसीटीव्हीमध्ये आढळून आले आहे. घरगुती कामासाठी अशोक धोडी हे मीरा रोड या भागात आले होते. तिथून घरी परत जात असताना त्यांचे अपहरण झाले आहे.*

***लवकरच या प्रकरणाचा छडा लागेल- पालकमंत्री***

*दरम्यान, पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी अशोक धोडी यांच्या कुटुंबियांची आज भेट घेतली आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले की, या प्रकरणावर माझे बारीक लक्ष असून जे कोणी या प्रकरणात दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. असे मत पालकमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केले. तसेच लवकरच या प्रकरणाचा छडा लागेल असेही ते म्हणाले.*

# चिंचोटी-अंजुर फाटा रस्त्याच्या कामात सावळागोंधळ

### वाहनचालकांची घुसमट; कामात सुसूत्रता नाही

**प्रतिनिधी**
**वसई**

वसई पूर्वेतील चिंचोटी - अंजुर फाटा रस्त्याचे काम पूर्ण व्हावे, वर्षानुवर्ष वाहनचालकांची घुसमट थांबावी यासाठी अनेक राजकीय आंदोलने आणि विनंती अर्जानंतर या रस्त्याचे काम सुरू झाले आहे. मात्र कामात सातत्य, अखंडता नसल्याने वाहनचालकांची घुसमट कायम आहे.

सध्या चिंचोटी - अंजुर फाटा रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम पिडबल्युडी प्रशासनाने हाती घेतले आहे. परंतु सध्या टप्प्याटप्प्याने हे काम छोट्या छोट्या स्वरूपात सुरू आहे. त्यामुळे प्रचंड धुळवड सुरू आहे. त्यामुळे रस्त्याच्या आजूबाजूला असलेल्या घरे, दुकाने, गाळे यांच्यावर धूळ साचली आहे. वाहनचालकांना देखील या धुळीचा सामना करावा लागत आहे. तसेच पिडबल्युडी प्रशासनाने सदर रस्त्याचे काम करताना काँक्रिटीकरणाची उंची ही १ फूट इतकी ठेवण्यात आली आहे. त्याचादेखील मनस्ताप वाहतूकदारांना सोसावा लागत आहे.



रस्त्याच्या कामात सुसूत्रता, अखंडता नसल्याने वाहनचालकांची मोठी घुसमट सुरू आहे.

हा रस्ता पूर्ण व्हावा यासाठी आजवर अनेक राजकीय आंदोलने झाली, खराब रस्त्यामुळे अनेक नागरिकांना जीव गमवावा लागला तर नाते संबंधात दुरावा आला. अत्यंत विचित्र कोंडी झालेल्या या रस्त्याचे काम पिडबल्युडी प्रशासनाने हाती घेतले असले तरी या रस्त्याचे काम विचित्र पद्धतीने सुरू असल्याने वाहनचालकांना मनस्ताप सोसावा लागत आहे.

# भाजप आ. प्रविण दरेकरांच्या उपस्थितीत रविवारी स्वयंपुनर्विकास प्रकल्पाचे चावी वाटप

**मुंबई**

स्वयंपुनर्विकास प्रकल्पाच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या मुलुंड (पूर्व) येथील आर्यावर्त इंद्रप्रस्थ को. ऑप. सोसायटीतील रहिवाशांना भाजपा गटनेते व मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांच्या उपस्थितीत रविवार, २ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता चावी वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

आर्यावर्त इंद्रप्रस्थ को. ऑप. सोसायटी, देशमुखवाडी, जय राम कृष्ण को. ऑप. हौ. सोसायटी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व) येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला मुलुंड विधानसभेचे आमदार मिहीर कोटेचा, भाजपा विधानपरिषद आमदार प्रसाद लाड, माजी नगरसेवक प्रभाकर शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच यावेळी सकाळी ९ ते ११ गणेश पूजन होऊन त्यानंतर रहिवाशांना चावी वाटप करण्यात येणार असल्याची माहिती सोसायटीचे अध्यक्ष बाळकृष्ण देवरे, सचिव विशाल मारकड, खजिनदार रत्नकांत वरळीकर यांनी दिली.

# वाढत्या वायरींच्या अतिक्रमणामुळे शहराचे सौंदर्य विद्रुप

### तारांच्या जाळ्यात वसई !

**प्रतिनिधी**
**वसई**

वसईतील मुख्य रस्ते, गल्ली-बोळ, चौक आणि इमारतींच्या गच्चींवर सर्वत्र इंटरनेट, वायफाय आणि केबलच्या वायरींचे अनियंत्रित जाळे विणले गेले आहे. या वाढत्या वायरींच्या अतिक्रमणामुळे शहराचे सौंदर्य विद्रुप होत असून, अपघातांचा धोका वाढत चालला आहे.

तंत्रज्ञानाच्या वाढत्या गरजेमुळे वसई-विरार शहरात इंटरनेट आणि केबल टीव्हीच्या कनेक्शनसाठी मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. कोरोना काळानंतर वर्क फ्रॉम होम आणि ऑनलाईन शिक्षणामुळे घराघरात इंटरनेटची गरज निर्माण झाली. परिणामी, ठिकठिकाणी अनेक केबल कंपन्या आणि इंटरनेट सेवा प्रदाते वायरींचा जंजाळ वाढवत आहेत.

नियोजनाचा अभाव आणि अनियमित देखभाल यामुळे अनेक ठिकाणी या वायरी रस्त्यावर पडलेल्या असतात. काही वेळा भूमिगत वायरी टाकण्याच्या कामामुळे वारंवार उत्खनन सुरू असते, ज्यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडी, धूळ आणि असुविधांचा सामना करावा लागतो. उड्डाणपुलांवर आणि मोठ्या इमारतींवरून गेल्या या असंख्य वायरींमुळे शहराचे दृश्य बिघडले आहे.

या वाढत्या समस्येवर प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करावी, नियोजनबद्ध रीतीने भूमिगत वायरीकरणाला प्राधान्य द्यावे आणि शहराच्या सौंदर्यावर उठलेल्या या अनियंत्रित जाळ्याला आळा घालावा, अशी नागरिकांची मागणी आहे. अन्यथा, हे वायरींचे संकट भविष्यात आणखी गंभीर स्वरूप धारण करू शकते.

# अनधिकृत इमारतींवर कारवाईला जनतेचा विरोध!

### न्यायालयाच्या आदेशानंतर पालिका कारवाईसाठी मुदतवाढ मागणार

**प्रतिनिधी**
**वसई**

नालासोपाऱ्यातील ४१ अनधिकृत इमारतींवर सुरू असलेल्या कारवाईला नागरिकांचा तीव्र विरोध असून, प्रशासन हतबल झाल्याचे चित्र दिसत आहे. सद्यस्थितीत केवळ १३ इमारतींची तोडफोड शक्य असून, उर्वरित २८ इमारतींवर कारवाईसाठी वसई-विरार महापालिका न्यायालयाकडे मुदतवाढ मागणार असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली आहे.

नालासोपाऱ्यातील आचोळे परिसरात आरक्षित डम्पिंग ग्राऊंडवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत. यावर कठोर कारवाई करण्यासाठी उच्च न्यायालयाने महापालिकेला आदेश दिले होते. याआधी पालिकेने ७ अनधिकृत इमारती पाडल्या, त्यानंतर न्यायालयाने ३१ जानेवारीपर्यंत उर्वरित इमारतींवर कारवाई करण्याचे निर्देश दिले. मात्र, मागील आठवड्यात केवळ ६ इमारती तोडण्यात यश येऊ शकते, त्यामुळे ठरलेल्या मुदतीत उर्वरित २८ इमारतींची कारवाई शक्य नसल्याने पालिकेने मुदतवाढ मागण्याचा निर्णय घेतला आहे.

अनधिकृत इमारतींवर कारवाई सुरू होताच स्थानिक रहिवाशांचा मोठा आक्रोश पाहायला मिळत आहे. काही भागांत स्थानिक नागरिकांनी थेट प्रशासनाच्या पथकांना अडवण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे कारवाईस अडथळा निर्माण होत आहे. रहिवाशांनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या प्रकरणाचा कायदेशीर निकाल महत्त्वाचा ठरणार आहे.

पालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, अनधिकृत बांधकामे हटवण्याची प्रक्रिया थांबणार नाही. मात्र, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता न्यायालयाकडून अधिक वेळ मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर या प्रकरणाची पुढील दिशा अवलंबून आहे. मात्र, सद्यस्थितीत नालासोपाऱ्यातील अनधिकृत इमारतींवर कारवाई अटळ असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत!



*मुंबई : अपना सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून पुनश्च निवड झाल्याबद्दल दत्ताराम चाळके यांचे नायगांव-वडाळ्या मधील शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देतांना नायगांव-वडाळा विधानसभा क्षेत्राचे सहनिरीक्षक व शिवशाही प्रतिष्ठानचे संस्थापक/अध्यक्ष सुरेश गणपत काळे यांनी त्यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तदप्रसंगी ग्राहक संरक्षण कक्षाचे उपकक्ष संघटक आकाश भिसे, शाखा कक्ष संघटक इम्तियाज खान, युवासेना शाखा क्र. २०१ चे शाखाअधिकारी रोहन सुरेश काळे उपस्थित होते.*

## PUBLIC NOTICE

**HINDUSTAN UNILEVER LIMITED**
**Unilever House, B.D Sawant Marg, Chakala, Andheri (E), Mumbai - 400069.**

Notice is hereby given that the certificates for the undermentioned securities of the Company has been lost and the holder of the said securities / applicant has applied to the Company to issue duplicate certificates.
Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the Company at its Registered Office within **15 days** from this date, else the Company will proceed to issue duplicate certificates without further intimation.

| Name Of Holder (As per share certificate) | Name Of The Claimant | No of Securities | Folio No. | Certificate No | Distinctive Numbers |
|---|---|---|---|---|---|
| 1. Sri Hari Dhondu Wagoskar (Deceased) 2. Smt Janaki Hari Wagoskar (Deceased) | Sadanand Hari Wagoskar | 2160 Shares of FV 1 | HLL2800383 | 5167430 | 891262631-891264790 |

## CAUTION NOTICE

NOTICE is hereby given that my client Magnum Co.op.Hsg.Ltd., having address at Viva Gokul Complex, Agashi Road, Bolinj, Virar(west), Tal-Vasai, Dist-Palghar, Pin-401303, have issued the notices and legal notices for recovery of **MRS. USHA BAROT** having Flat No.B/701, in the Magnum Co.op. Hsg.Ltd., at Bolinj for **Rs.4,21,042/- (Rupees Four Lakh Twenty One Thousand Forty Two Only)** as on **01.01.2025**. It is observed that the said **MRS. USHA BAROT** is not traceable for longer period and not accepted notices. People are hereby caution and advised not to deal with any matter mentioned herein above in respect of above said flat by way of sale, exchange, gift, mortgage, charge, trust, possession, Inheritance, lease, lien, attachment or any other right whatsoever. Any person henceforth dealing with **MRS. USHA BAROT** should do so at their own risk and my client is not responsible for the same from the publication of this notice. The Society has reserved the right to file an application before the concern authority for getting Recovery Certificate at the cost of the member.

**Place: Virar** **(Dhanashri Yerunkar)**
**Date: 31.01.2025** **(ADVOCATE)**

## CAUTION NOTICE

NOTICE is hereby given that my client Magnum Co.op.Hsg.Ltd., having address at Viva Gokul Complex, Agashi Road, Bolinj, Virar(west), Tal-Vasai, Dist-Palghar, Pin-401303, have issued the notices and legal notices for recovery of **MR. BHAVESH SANKHE** having Flat No.C/604, in the Magnum Co.op. Hsg.Ltd., at Bolinj for **Rs.1,57,840/- (Rupees One Lakh Fifty Seven Thousand Eight Hundred Forty Only)** as on **01.01.2025**. It is observed that the said **MR. BHAVESH SANKHE** is not traceable for longer period and not accepted notices.

People are hereby caution and advised not to deal with any matter mentioned herein above in respect of above said flat by way of sale, exchange, gift, mortgage, charge, trust, possession, Inheritance, lease, lien, attachment or any other right whatsoever. Any person henceforth dealing with **MR. BHAVESH SANKHE** should do so at their own risk and my client is not responsible for the same from the publication of this notice. The Society has reserved the right to file an application before the concern authority for getting Recovery Certificate at the cost of the member.

**Place: Virar** **(Dhanashri Yerunkar)**
**Date: 31.01.2025** **(ADVOCATE)**

## नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की माझे अशिल श्री सुभाष बी ज्ञानी, ह्यांची फ्लॅट क्र. डी/००१, तल मजला. लेक-व्ह्यू को.ऑ.हा.सो.लि., लोढा मार्ग, आचोळे रोड, नालासोपारा (पुर्व) ता. वसई, जि. पालघर, सर्वे क्र. २०३ (१६९), हिस्सा नं.२, व्हीलेज आचोळे, नालासोपारा (पुर्व) ता. वसई, जि. पालघर, दस्तावेज न.०७५९०/२००८, वसई. ३, दिनांक १४.०७.२००८ ला श्री सुभाष बी ज्ञानी व श्रीमती शीला सुभाष ज्ञानी संयुक्त रित्या खरेदी केली होती.

श्रीमती शीला सुभाष ज्ञानी ह्यांचे दिनांक ०४.०९.२०२२ रोजीस रोजी निधन झाले असून.. त्यांच्या मृत्युपश्यात त्यांना १. श्री सुभाष बी ज्ञानी, नवरा वयस्क, २. श्री अमित कुमार सुभाष ज्ञानी; मुलगा वयस्क, ३. श्री सुमित सुभाष ज्ञानी, मुलगा वयस्क, व ४. राखी सुभाष ज्ञानी मुलगी वयस्क हे केवल वारस असून त्यांच्या मालमत्तेच हक्कदार आहेत.

श्रीमती शीला सुभाष ज्ञानी ह्यांच्या मृत्युपश्यात वरील फ्लॅट त्यांच्या नवरा श्री सुभाष बी ज्ञानी ह्यांच्या एकटाच्या नावे आहे.

माझे अशील पत्नीचे निधन झाले असून पत्नीचे हिस्सा त्यांचा नवरा व भाउ म्हणजे श्री सुभाष बी ज्ञानी, २.श्री अमेत कुमार सुभाष ज्ञानी, ३. श्री सुमित सुभाष ज्ञानी सदरच्या रिलीज डीड द्वारे विनामोबदला राखी सुभाष ज्ञानी यांना दिली आहे. त्यांचा दस्तावेज न. १९१६/२०२३, वसई. ४, दिनांक ०१.०२.२०२३ आहे. व सदर फ्लॅट म्हणुन यापुढे उल्लेख कोणत्याही व्यक्ती सदर फ्लॅट वा त्याचा कोणत्याही भागमध्ये बिक्री, भेट, भाडेपट्टा, वारसा अदलाबदल, गहाण, प्रभार, धारणाधिकार, न्यास, कब्जा, सुविधाधिकार, जीम वा जे जे काही असेल त्याद्वारे हितसंबंध दावा करीत असल्यास त्याबाबत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत सर्व त्या लेखी कागदीपत्री पुराव्यांसहीत शॉप न. ११ गुरु गोविन्दसिंग नगर को. आ. हा.सो लि., गाला नगर, नालासोपारा पु. ता. वसई, जि. पालघर हा। पत्त्यावर कळवावे.

**सही**
**ॲड. नीलरतन राय**
**वकील**

## जाहीर नोटीस

माझे अशील, अर्जदार श्री.योगेश तुकाराम गीते यांच्या सूचनेनुसार महानगरपालिकेची सी.सी. आणण्यासाठी अर्ज करत आहे.सदर मिळकत हि गाव मौजे.नवाळे ,तालुका वसई, जिल्हा-पालघर या मधील सर्वे. नं. १५६/०४ क्षेत्र – १.८६ आर.चौ.मी.आहे. त्यावर कोणाची हरकत असल्यास लेखी स्वरुपात १४ दिवसाच्या आत खालील पत्यावर नोंदवाव्यात.

**वकील**
**संकेत गदगी**
**(९०९६४७०६४१७)**
**पत्ता ऑफिस:- ख्रिस्त क्रॉस मागे ०१ वसई कोर्टजवळ, वसई-४०१२०२**

## जाहीर नोटीस

माझे अशील, अर्जदार श्री.बिपिन मतिवर सिंग यांच्या सूचनेनुसार महानगरपालिकेची सी.सी. आणण्यासाठी अर्ज करत आहे.सदर मिळकत हि गाव मौजे.भुईगाव खुर्द,तालुका वसई, जिल्हा-पालघर या मधील सर्वे. नं. ८३/१/१ क्षेत्र – ०.५०० आर. चौ.मी. हे आहे. त्यावर कोणाची हरकत असल्यास लेखी स्वरुपात १४ दिवसाच्या आत खालील पत्यावर नोंदवाव्यात.

**वकील**
**संकेत गदगी**
**(९०९६४७०६४१७)**
**पत्ता ऑफिस:- ख्रिस्त क्रॉस मागे ०१ वसई कोर्टजवळ, वसई-४०१२०२**

## जाहीर नोटीस

याव्दारे कळविण्यात येते की, श्री. देवेंद्र चिन्नप्पा नावन दि. १५:०२:२०२४ व श्रीम. पार्वती चिन्नप्पा देवेंद्र दि. २१:०५:२०२३ रोजी मयत झाले आहेत. ते श्री. गणेश चाळ, नेहरु नगर, व्ही. एम. रोड क्र. ५, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई ५६ येथे राहत होते. त्यांच्या मृत्यू पश्चात खालील नमूद केलेप्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

| अ. क्र. | नाव (विवाहित महिला असल्यास लग्नापुर्वीचे व लग्नानंतरचे अशी दोन्ही नावे नमूद करावीत.) | वय | मृत व्यक्तीशी नाते |
|---|---|---|---|
| १) | कुप्पाई चिन्नप्पा देवेंद्र<br>कुप्पाई आरुमुगम देवेंद्र | ४९ वर्षे | मुलगी (विवाहित) |
| २) | अंजला चिन्नप्पा देवेंद्र<br>अंजला पलानीस्वामी देवेंद्र | ४६ वर्षे | मुलगी (विवाहित) |
| ३) | आरुमुगम चिन्नप्पा देवेंद्र | ४४ वर्षे | मुलगा |

उक्त नमूद वारसांना उक्त नमूद मृत व्यक्ती पश्चात त्यांच्या निवृत्त वेतन/बँक ठेवी/ प्रॉव्हिडंट फंड/अनुकंपा तत्वासाठी (शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्याचे वारस या नात्याने), म्हाडामार्फत देणेत येणाऱ्या निवासी गाळ्याचा लाभ मिळणेकरीता (मृत गिरणी कामगाराचे वारस या नात्याने) वारस दाखला हवा असल्याने तसा अर्ज तहसीलदार अंधेरी यांच्याकडे केला आहे.

त्या अनुषंगाने कुणा व्यक्तीचा आक्षेप असल्यास त्यांनी तहसीलदार अंधेरी यांचे कार्यालय, दादाभाई नौरोजी रोड, अंधेरी (प), मुंबई ५८ यांच्याकडे लेखी पुराव्यासह नोटीस प्राप्त झालेपासून ७ दिवसांत संपर्क साधावा. अन्यथा सदर प्रकरणी आक्षेप नाही असे समजून निर्णय घेणेत येईल.

**अर्जदाराचे नाव व पत्ता**
**आरुमुगम चिन्नप्पा देवेंद्र**
**श्री. गणेश चाळ, नेहरु नगर,**
**व्ही. एम. रोड क्र. ५,**
**विलेपार्ले (प), मुंबई ५६**

**दि. १ फेब्रुवारी २०२५**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना माझे अशील श्रीमती. सुरेखा श्रीकुमार नायर यांजकडुन कळविण्यात येते की गाव मौजे बोळींज, ता. वसई, जि. पालघर, येथील गावठाण मिळकत क्षेत्र हे. आर. ०-०७-० व त्यावरील जुना घर क्र. २६० आणि २६१, क्षेत्र ४८१४.७ चौ. फुट व त्यावरील जुना घर क्र. २५९, ह्या जमिन मिळकतीवर बांधण्यात आलेली इमारत, "संकल्प दिप", सोसायटी "संकल्प दिप को-ऑप हौसिंग सोसायटी लि." बोळींज, विरार (प), तालुका वसई, जि. पालघर, ह्या बिल्डिंग मधील सदनिका क्र. ००३, तळमजला, "ए' विंग, क्षेत्र ५१५ चौ. फुट म्हणजेच ४७.८४ चौ. मी. (सुपर बिल्ट अप), हि सदनिका श्री. श्रीकुमार अय्यपन नायर यांच्या मालकीची व कब्जेवहीवाटीची होती. तसेच श्री. श्रीकुमार अय्यपन नायर हे "संकल्प दिप को-ऑप हौसिंग सोसायटी लि." चे सदस्य असून त्यांच्या नावे शेअर सर्टिफिकेट क्र. ०१, एकूण १० (दहा) शेअर, प्रत्येकी रु.५०, नंबर ०१ ते १० आहे. सदरहू श्री. श्रीकुमार अय्यपन नायर, हे दिनांक ०१/०६/२०२४ रोजी मयत झाले असून त्यांच्या पश्चात त्यांना १. श्रीमती. सुरेखा श्रीकुमार नायर (पत्नी), २. श्री. सुजितकुमार श्रीकुमार नायर (मुलगा) आणि ३. कुमारी. सुजाता श्रीकुमार नायर (मुलगी) हे मयत श्री. श्रीकुमार अय्यपन नायर यांच्या सदरील सदनिकेमध्ये कायदेशिर वारस आहेत, ह्यांच्या व्यतिरिक्त कोणीही वारस नाही तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणाताही हक्क हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य पुराव्यासह आम्हांस ऑफिस क्र. १०२, पहिला माळा, कुंती सदन, वीर सावरकर मार्ग, विरार (पु), तालुका वसई, जि. पालघर- ४०१ ३०५, या पत्त्यावर लेखी पुराव्यासह कळवावे.

**दि. ०१.०२. २०२५** **ॲड. रंजन हाशा पाटील**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना माझ्या अशिल चंदकांत अंकुश हडपीडकर ह्यांच्या कडुन कळविण्यात येते की गाव मौजे-उमराळे, समेळपाडा, नालासोपारा (प), ता वसई, जि पालघर, येथील जुना सर्व्हे नं. ५४, हिस्सा नं. ८ व नविन सर्व्हे नं. ५०, हिस्सा नं. ८, ह्या जमिन मिळकतीवर बांधण्यात आलेली "ड्यामंड कॉम्पलेक्स", "डयामंड डिव्हीन्कल कॉ ऑप हौ सोसायटी लि", नालासोपारा (प), ता-वसई, जि-पालघर-४०१२०३, ह्या बिल्डिंग मधील रूम नं. २०४, डी विंग, दुसरा मजला, क्षेत्र ४६.४६ चौ मिटर, बिल्टिअप हा फ्लॅट दिनांक २७/०५/१९९६ रोजी रजिस्टर दस्त नं. छा-१८२९/१९९६ च्या नुसार अंकुश लक्ष्मण हडपीडकर ह्यांनी कायमच्चा विकत घेतला असून अंकुश लक्ष्मण हडपीडकर हे सदर फ्लॅटचे मालक होते पण अंकुश लक्ष्मण हडपीडकर हे दिनांक २६/०४/२०२१ रोजी मयत झाले व त्यांच्या पत्नी स्मिता अंकुश हडपीडकर हे दिनांक ०५/०५/२०२१ रोजी मयत झाले तरीही त्यांच्या पश्चात त्यांना १) चंद्रकांत अंकुश हडपीडकर (मूलगा), २) सरिता अंकुश हडपिडकर (मूलगी), ३) स्वाती सुहास सकपाळ (मूलगी) ४) मानसी चंद्रहास बंदेकर (मूलगी), ५) सूर्यकांत अंकुश हडपिडकर (मूलगा), ६) रवींद्र अंकुश हडपिडकर (मूलगा), हे कायदेशिर वारस आहेत तरीही अंकुश लक्ष्मण हडपीडकर ह्यांच्या नावावर सदर सोसायटी मध्ये शेअर सर्टिफिकेट नं ४०, ह्यांचे १० शेअर पत्ती शेअर रू.५०/- प्रमाणे ३९१ ते ४०० आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणाताही हक्क, हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आम्हांस ऑफीस नं १०२, पहिलामाळा, कुंती सदन, श्री मंगल कार्यालय हॉलच्या खाली, विर सावरकर मार्ग, विरार (पू), ता वसई, जि-पालघर, या पत्त्यावर लेखी पुराव्यासह कळवावा -

**ॲड. रंजन हाशा पाटील**

### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 222**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - २२२**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## चेंबूरमध्ये मेट्रोचे अर्धवट बांधकाम कोसळले, मोठी जीवितहानी टळली

**मुंबई :** चेंबूरमधील एका वसाहतीसमोरून जाणाऱ्या मेट्रो बांधकामाच्या ठिकाणी मोठी घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. चेंबूर भागात मेट्रोचे बांधकाम सुरू असून वडाळ्याकडे जाणाऱ्या या मेट्रोचे अर्धवट बांधकाम कोसळले आहे. आज शुक्रवारी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली. सुमन नगर सहकारी गृहनिर्माण परिसराच्या आवारात मेट्रोचे अर्धवट बांधकाम कोसळले. पहाटेची वेळ असल्याने या ठिकाणी वर्दळ नसल्याकारणाने सुदैवाने मोठी दुर्घटना टळली. परंतु, या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मेट्रो मार्गिकेसाठी २० फूट उंचीच्या सळ्या टाकून हे काम करण्यात येत आहे. पण आता ही घटना घडल्यामुळे प्रशासन काय निर्णय घेते याकडे लक्ष आहे.चेंबूरमधील सुमन सुमन नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेजवळून मेट्रोचा मार्ग जातो. वडाळ्यापर्यंत जाणाऱ्या या मार्गावर सध्या मेट्रोचे काम सुरू आहे. सध्या येथे मेट्रोचे खांब उभारण्याचे काम सुरू असून सळई व कॉंक्रीटच्या साहाय्याने हे खांब उभारले जात आहे. यातीलच एक अर्धवट उभारलेला खांब सुमन नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या आवारात कोसळला. हा खांब सुरक्षा रक्षकाच्या खोलीवर व मोकळ्या जागेत कोसळला आहे. साधारणतः २० फूट उंच असलेल्या या सळ्या कोसळल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



# मुंबईकरांचे होणार 'मेगा हाल', 125 वर्ष जुना ब्रिटिशकालीन पूल पाडणार...

## मध्य -पश्चिम रेल्वेला जोडणारा एलफिस्टन पूल नसल्यास प्रचंड वाहतूक कोंडीचे संकट

प्रतिनिधी
■ मुंबई

सायन आरओबी पूल, कर्नाक पूल, बेलासिस पूल आणि रे रोड पूल हे ब्रिटिशकालीन पूल जीर्ण झाल्यामुळे त्यांना पाडण्यात आले आहे. या चार पुलांनंतर आता १२५ वर्ष जुना म्हणजेच ब्रिटिश काळातील आणखी एक पूल लवरकच दुरुस्तीसाठी पाडण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावरील परळ आणि प्रभादेवीला जोडणारा १२५ वर्ष जुना एलफिन्स्टन पूल पाडण्यात येणार आहे. ज्यामुळे मुंबईकरांचे पुन्हा हाल होणार आहे.

मुंबईत आधीच अनेक पूल दुरुस्तीच्या कारणामुळे बंद असल्याने मुंबईकरांना हव्या त्या ठिकाणी जाण्याकरिता विविध मार्गांनी वळसा घालून जावा लागतो. त्यात आता दक्षिण मुंबईतील महत्त्वाच्या पुलांपैकी एक असलेल्या एलफिन्स्टन पुलाला पाडण्यात आले तर यामुळे मुंबईकरांचे प्रचंड हाल होणार आहेत. कारण याच पुलावरून केईएम,वाडिया आणि टाटा अशा मोठ्या रुग्णालयांना जाणारा मार्ग पश्चिमेकडून पूर्वेला जोडण्यात आलेला आहे.

मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावरील परळ आणि प्रभादेवीला जोडणारा एल्फिन्स्टन रोड ओव्हर ब्रिज हा शिवडी-वरळी कनेक्टर प्रकल्पाचा भाग आहे. त्यामुळे एमएमआरडीएने हा पूल पाडून पुन्हा बांधण्याचा निर्णय घेतला आहे.

या ब्रिजचे आयुष्य संपले असून सुरक्षिततेच्यादृष्टीने हा पूल पाडून याची पुनर्बांधणी करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. ज्यामुळे एल्फिन्स्टन पूल पाडल्यानंतर या मार्गावरील वाहतूक टिळक ब्रिज (दादर) आणि करी रोड पुलाच्या दिशेने वळवण्यात येईल. परंतु, या दोन्ही पुलांवरून अवजड वाहनांची वाहतूक नेहमीच सुरू असते. त्यामुळे गर्दीच्या वेळी होणारी वाहतूक कोंडी आणखी वाढण्याची शक्यता असून प्रवासाचा वेळ देखील वाढणार आहे. नवीन एल्फिन्स्टन पूल हा सेनापती बापट रोड ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडला जोडणारा डबल डेकर उड्डाणपूल असेल, अशी माहिती एमएमआरडीएकडून देण्यात आली आहे.





### फेब्रुवारीअखेरीस पाडणार एलफिस्टन पूल

एल्फिन्स्टन पुलाच्या पुनर्बांधणीला १९ इमारती अडथळा होत्या. ज्यामुळे या पुलाचे पाडकाम करण्यास विलंब झाला. परंतु, आता वाहतूक विभाग या कामाकरिता ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास तयार आहे. त्यामुळे फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात हा पूल पाडण्यास सुरुवात करण्याचा एमएमआरडीएचा विचार आहे. पुनर्बांधणी केलेला एल्फिन्स्टन आरओबी सेनापती बापट रोड ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडला जोडणारा डबल-डेकर फ्लायओव्हर असेल. तर दुसरी शाखा शिवडी येथील एमटीएचएल आणि वरळी येथील वांद्रे-वरळी सी लिंकला थेट कनेक्टिव्हिटी असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शिवडी-वरळी कनेक्टरचे काम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यामुळे अटल सेतू (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक किंवा एमटीएचएल) वरील सुमारे १५ टक्के वाहतुकीची सोय होणार आहे. तसेच त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला थेट प्रवेश देखील मिळणार आहे, अशी माहिती एमएमआरडीएच्या सूत्रांकडून देण्यात आली आहे.

# प्रतिभेने साकारलेल्या पुष्पोत्सवाचा मुंबईकरांनी आनंद घ्यावा - भूषण गगराणी

प्रतिनिधी
■ मुंबई

भारताची राष्ट्रीय प्रतिके फुलांच्या माध्यमातून मुंबईकरांपर्यंत पोहोचविणे ही यंदाचा 'मुंबई पुष्पोत्सव' अर्थातच वार्षिक उद्यानविद्या प्रदर्शनामागची संकल्पना आहे. यंदाच्या प्रदर्शनात फुलझाडांसह वेगवेगळ्या प्रजातींच्या वनस्पती, फळझाडे, औषधी-सुगंधी वनस्पती, वेली तसेच भाजीपाला आणि मसाल्यांची रोपे मांडण्यात आली आहेत. अत्यंत कष्टाने आणि प्रतिभेने हे प्रदर्शन सजविले आहे. मुंबईकरांनी याचा आनंद घ्यावा, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी केले.

बृहन्मुंबई महानगरपालिका आणि वृक्ष प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने भायखळा (पूर्व) येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालय येथे मुंबई पुष्पोत्सव भरविण्यात आला आहे. आयुक्त भूषण गगराणी यांच्या हस्ते शुक्रवारी या पुष्पोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उप आयुक्त (उद्याने) चंदा जाधव, संचालक (प्राणिसंग्रहालय) डॉ. संजय त्रिपाठी, उद्यान अधीक्षक जितेंद्र परदेशी आदी उपस्थित होते.

## राणीच्या बागेत तीन दिवस 'मुंबई पुष्पोत्सव'



### *शनिवारी, रविवार पुष्पोत्सव राहणार खुला*

*वार्षिक उद्यानविद्या प्रदर्शनाचे यंदाचे हे २८ वे वर्षे आहे. शुक्रवार, दिनांक ३१ जानेवारी; शनिवार, दिनांक १ फेब्रुवारी आणि रविवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२५ असे तीनही दिवस सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत हा पुष्पोत्सव सर्वांसाठी खुला राहणार आहे.*

### *राष्ट्रीय प्रतिकांनी वेधले लक्ष*

*मुंबई पुष्पोत्सवाच्या यंदाच्या संकल्पनेत भारताच्या राष्ट्रीय प्रतिकांचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले आहे. विविध फुलांच्या मनमोहक रचनांमधून भारताच्या प्रतिकांचे दर्शन घडविण्यात आले. झेंडू आणि शेवंतीच्या फुलांनी साकारलेला तिरंगा नागरिकांचे विशेष आकर्षण ठरतोय. भारतरत्न पुरस्काराची प्रतिकृती लाकडी कलाकृतीच्या माध्यमातून साकारली आहे. राष्ट्रीय फळ असलेल्या आंब्याची रचना झेंडूच्या फुलांनी तयार केली आहे. राष्ट्रीय जलचर असलेले गंगा डॉल्फिन पांढ्या आणि गुलाबी रंगांच्या शेवंतीच्या फुलांनी साकारले आहे. यासह कमळ, राष्ट्रीय चलन रुपया, राष्ट्रीय प्राणी वाघ, राष्ट्रीय वृक्ष वड, अशोक स्तंभ, गंगा नदी, मोर आदी प्रतिकेही मुंबईकरांचे लक्ष वेधून घेत आहेत. पहिल्याच दिवशी लोकांनी तिथे गर्दी होती.*

# मुंबईत मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू; वाढत्या डेब्रिजमुळे पालिकेची डोकेदुखी

## दिवसाला ८ हजार टन डेब्रिज होतोय तयार

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईत सध्या मोठ्या प्रमाणात सुरु असलेल्या बांधकामांमुळे मुंबईकरांना वायू प्रदूषणाला सामोरे जावे लागत आहे. गेल्या वर्षी सप्टेंबर ऑक्टोंबर मध्ये काही दिवस बांधकामांवर बंदी घालण्यात आली होती. मात्र, आता पुन्हा ही बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. दिवसाला ८ हजार टन डेब्रिज तयार होत आहे. कंत्राटदार हे डेब्रिज कोठेही टाकतात आणि त्याची विल्हेवाट मात्र पालिकेला लावावी लागते. या डेब्रिजवर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेकडे दहिसर आणि कल्याण येथे केवळ १२०० टनाचे दोनच प्रकल्प आहेत. त्यामुळे रोजच्या वाढत्या डेब्रिजमुळे पालिकेची डोकेदुखी वाढली आहे. त्यामुळे डेब्रिजची समस्या दूर करण्यासाठी येत्या काळात या प्रकल्पांची क्षमता वाढवण्याचे काम मुंबई महापालिका करणार आहे.

'कन्स्ट्रशन अँण्ड डिमोलेशन सेक्टर अँड एअर पल्यूशन' या विषयावरील मुंबई प्रेस क्लबमध्ये गुरुवारी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यात संबंधित तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यात पालिका उपायुक्त किरण दिघावकर, फुफ्फुसरोग तज्ज्ञ लान्सलॉट पिंटो, इंदूरमध्ये झिरो कचरा व्यवस्थापनासाठी काम करणारे राकेश कुमार, शाश्वत शहरांसाठी काम करणारे प्रयास गिरिया आदी मान्यवर उपस्थित होते.

ओला कचरा, सुका कचऱ्याबरोबरच बांधकामातून निर्माण होणारे डेब्रिजही टाकले जात आहे. त्यामुळे अशा कचऱ्याचा पुनर्वापर करणे शक्य होत नाही. डेब्रिज गोळा करण्यासाठी 'डेब्रिज ऑन कॉल' ही संकल्पना राबवली जात आहे. सध्या यासाठी आकारले जाणारे शुल्क टप्प्याटप्प्याने कमी केले जाणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य, कंत्राटदार याचा वापर करतील आणि अनधिकृतपणे टाकल्या जाणाऱ्या डेब्रिजला आळा बसेल, असे पालिका उपायुक्त किरण दिघावणकर सांगितले.

वायू प्रदूषणामुळे भारतीयांची फुफ्फुसे कमकुवत झाली आहेत. त्यामुळे दमा, मधुमेह, ब्लडप्रेशर, ऑटो इम्युन डिसिज ते फुफ्फुसाच्या कर्करोगाचा धोका वाढला आहे. मुंबईसह देशात वायू प्रदूषणाचे प्रमाण जागतिक मानांकनाच्या दृष्टीने जास्त असून त्यामुळे होणाऱ्या मृत्यूची संख्याही मोठी आहे. प्रदूषणाचा फटका गर्भाला आणि लहान मुलांनाही बसत असून त्यांच्या वजन आणि उंचीवरही परिणाम होत आहे. अशी माहिती फुफ्फुसरोगतज्ज्ञ लान्सलॉट पिंटो यांनी दिली.

# कर्करोग रुग्णांसाठी टाटा रुग्णालयाचे अतिविशेषोपचार रुग्णालय

■ मुंबई

कर्करोग रुग्णांच्या अन्य आजारांवर उपचार करण्यासाठी व त्यांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी टाटा रुग्णालय खारघरमधील ॲक्ट्रेक्ट येथे पहिले अतिविशेषोपचार रुग्णालय सुरू करणार आहे. यामुळे कर्करोगावर उपचार घेत असलेल्या हृदय, फुफ्फुस, मूत्रपिंड यांसारख्या आजाराने त्रस्त रुग्णांना दिलासा मिळणार आहे.कर्करोगग्रस्त रुग्णांवर उपचार करताना त्यांना देण्यात येणाऱ्या किमोथेरपीमुळे हृदय, फुफ्फुस, मूत्रपिंड यांसारख्या विविध अवयवांवर केमोथेरपीचा परिणाम होतो. तसेच त्यांना रक्तदाब, मधूमेह यांसारख्या सहव्याधींनाही सामोरे जावे लागते. अशावेळी या रुग्णांना अन्य आजारांवरील व अवयवांवर होणाऱ्या परिणामांसंदर्भात अन्य रुग्णालयामध्ये उपचाारासाठी पाठविण्यात येते. त्यामुळे रुग्णांना मानसिक व शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागते. ही बाब लक्षात घेऊन टाटा रुग्णालयाने खारघर येथील ॲक्ट्रेक येथे १२ मजली अतिविशेषोपचार रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला आहे. १५० खाटांचे हे रुग्णालय पुढील तीन वर्षांत उभारण्यात येणार आहे. या रुग्णालयामध्ये विविध आजरांमुळे निर्माण होणारी गुंतागुंत दूर करण्यासाठी स्वतंत्र विभाग असतील. ॲक्ट्रॅकअंतर्गत असलेल्या या रुग्णालयामुळे रुग्णांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामावर उपचार करणे व त्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत होणार असल्याचे ॲक्ट्रेकचे संचालक डॉ. पंकज चतुर्वेदी यांनी सांगितले.

**मध्य रेल्वे**
**मल्टीपल बेंच एअर स्प्रिंग टेस्ट रिग**
**ई-निविदा सूचना क्र. आरआर/पीआर/एसएनपीडी/२८३/२४-२५/५९**
कामाचे नाव: ईएमयू पीओएच कार्यशाळा एसएनपीडीमधील पॉवर पॅक आणि हायड्रोलिक सिलेंडर क्षमतेच्या किमान ३० टी सह मल्टीपल बेंच एअर स्प्रिंग टेस्ट रिगच्या तपासणीसाठी फिक्सचरचे आरेखन, विकास आणि उत्पादन. कामाचे अंदाजे मूल्य: रु. ४८६२१९० इसारा रक्कम: रु. ९७३००/- निविदा अर्जाचे शुल्क: नाही, पूर्तता कालावधी: ६ महिने, निविदेच्या सादरीकरण समाप्तीचा दिनांक आणि वेळ : २०.०२.२०२५ रोजी १४:०० वा. बोलीकरण सुरु दिनांक: ०६.०२.२०२५. निविदा केवळ ई-निविदाकरण स्वरूपात www.ireps.gov.in संकेतस्थळाद्वारेच स्वीकारण्यात येतील. निविदा कागदपत्र संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. 739
अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

**मध्य रेल्वे**
**ट्रॅक्शन पॉवर ट्रान्सफॉर्मरचे पूर्ण ओव्हर हौलिंग**
**ई-निविदा सूचना क्र. : बीबी-ईएल-जीएसयू-२०२४-२५-०२/आर ३ दि. ३०.०१.२०२५**
वरिष्ठविभागिय विद्युत अभियंता (गती शक्ती युनिट) बीबी, ३ रा मजला, जुने क्षेत्रिय व्यवस्थापक ह्यांचे कार्यालय, गुडस डेपो, पी.डी'मेलो मार्ग, वाडीबंदर मुंबई – ४०००१० भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने खालील कामासाठी सुस्थापित आणि नामांकित कंत्राटदारांकडून खुली ई-निविदा (एक लिफाफा पद्धती) मागवित आहेत. प्रत्यक्ष सादर करण्यात आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदेच्या सादरीकरणाचा शेवटचा दिनांक आणि वेळ १०.०३.२०२५ रोजी १५:०० वा. पर्यंत आहे आणि त्याच दिवशी १५:०० वा. नंतर उघडण्यात येतील. कामाचे नाव : मध्य रेल्वेच्या मुंबई विभागामधील नागोठणे टीएसएस येथे २२० केव्ही/ २७ केव्ही, २१.६ एमव्हीए ट्रॅक्शन पॉवर ट्रान्सफॉर्मर (मे. एबीबी बनावटी) च्या एक नं. च्या क्षतिग्रस्त भागांच्या दुरुस्तीसह पूर्ण ओव्हर हौलिंग. निविदा शुल्क (अंदाजे) : रु. १५,९२,६४६/-. आवश्यक बोली सुरक्षा: रु. ३१,९००/- प्रस्तावांची वैधता: ६० दिवस. पूर्तता कालवधी : ०३ महिने पावसाळ्यासह. निविदेचा पूर्ण तपशील www.ireps.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. पूर्ण निविदा तपशिल संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील. 743
खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| निविदा कागदपत्र क्र. | २०२५_एमसीजीएम_११४२५१_१ |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | एमडब्ल्यूडी हॉस्पिटलच्या विविध ठिकाणी करायची विविध एम ई संबंधित कामे. |
| निविदा शुल्क | रु. ३३००/- + १८% जीएसटी |
| ई-निविदेचे मूल्य (अंदाजे मूल्य) | नग दर निविदा |
| बोली सुरक्षा ठेव / इरठे | रु. २०,०००/- |
| निविदेचे वितरण आणि विक्रीचा दिनांक | ०१.०२.२०२५ रोजी १०:०० वा. |
| निविदेच्या विक्रीसाठी शेवटचा दिनांक आणि वेळ आणि बोली सुरक्षा ठेव स्वीकृती | ०७.०२.२०२५ रोजी १६:०० वा. |
| लिफाफा ए, बी आणि लिफाफा सी चे सादरीकरण (ऑन लाईन) | ०७.०२.२०२५ रोजी १६:०० वा. |
| पूर्व बोली बैठक | लागू नाही |
| लिफाफा ए उघडणे | ०८.०२.२०२५ रोजी १६:०० वा. |
| लिफाफा बी उघडणे | ०८.०२.२०२५ रोजी १६:०० वा. |
| लिफाफा सी उघडणे | १४.०२.२०२५ रोजी १६:०० वा. |
| पत्रव्यवहारासाठी पत्ता | ह्यांचे कार्यालय:- कार्य. अभि. (यांत्रिकी) बृमनपा महापालिका कार्यशाळा, आर. एस. निमकर मार्ग, भायखळा, मुंबई ४००००८ |
| बोली उघडण्यासाठी ठिकाण | ई. ई. यांत्रिकी (दक्षिण) ह्यांच्या कार्यालयामध्ये ऑन लाईन |

सदर निविदा कागदपत्रे हस्तांतरीत करता येणार नाहीत.
बृमनपा कोणतेही कारण न देता वरील विषयासाठी कोणताही अर्ज स्विकारण्याचे किंवा स्विकारलेला कोणताही किंवा सर्व अर्ज नाकारण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

सही/-
कार्य. अभि. यांत्रिकी
(दक्षिण)

पीआरओ/२४०९/जाही/२०२४-२५
झाडे लावा, झाडे जगवा

# सांताक्रूझमध्ये शालेय इमारतीचा भाग चाळीवर कोसळला

## चारजण जखमी

प्रतिनिधी
■ मुंबई

सांताक्रूझ (पश्चिम) येथे एका शालेय इमारतीचे पाडकाम सुरू असताना इमारतीचा पिलरचा भाग शेजारील चाळीवर कोसळला. या दुर्घटनेत चार तरुण जखमी झाले. त्यापैकी एका तरुणाची प्रकृती चिंताजनक आहे. सुदैवाने जीवित हानी झाल्याचे वृत्त नाही.

प सांताक्रूझ (पश्चिम), जुहू तारा रोड, माणिकजी कूपर हायस्कूल या शाळेच्या इमारतीचे बांधकाम तोडण्याची कार्यवाही शुक्रवारी सुरू होती. सदर पाडकाम सुरू असतानाच सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास शालेय इमारतीच्या पिलरचा भाग अचानकपणे बाजूच्या चाळीवर कोसळला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. ज्या घरावर हा पिलरचा भाग कोसळला त्या ठिकाणी चार तरुण या दुर्घटनेत जखमी झाले.

या घटनेची माहिती मिळताच आजूबाजूच्या नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य हाती घेतले. स्थानिक नागरिकांनी चार जखमी तरुणांना तत्काळ नजीकच्या महापालिकेच्या कूपर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.कमलेश कुमार यादव (२८) मनीष कुमार साहनी (२४) हे रुग्णालयात उपचार घेत असून मनीष कुमार यांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर आयसीयू मध्ये उपचार सुरू आहेत.

**फॉर्म नं. आयएनसी २६**
[कंपनीज (इनकोर्पोरेशन) नियमावली २०१४ च्या नियम ३० च्या अनुषंगाने]
केंद्र सरकार, क्षेत्रीय संचालक, पश्चिम क्षेत्र खंडपीठ, मुंबई ह्यांच्या समोर
**कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३ चे उप कलम ४ आणि कंपन्या (इनकॉर्पोरेशन) नियमावली, २०१४ च्या नियम ३० च्या उप नियम (५) मधील मुद्दा (ए) च्या प्रकरणामध्ये**
**आणि**
**वियाटोन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय: वीरवाणी इंडस्ट्रीयल इस्टेट, दुकान क्र. ए १०१, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे समोर, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०००६३, महाराष्ट्र, भारत ह्यांच्या प्रकरणामध्ये .......... अर्जदार कंपनी/ याचिकाकर्ते**

**सूचना**

सामान्य जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३ अंतर्गत क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र खंडपीठ, मुंबई ह्यांच्याकडे कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्य येथून आंध्र प्रदेश राज्य येथे स्थलांतरीत करण्यासाठी लागणारी परवानगी घेण्यासाठी **शुक्रवार १६ ऑगस्ट २०२४ दु. १२ वा.** झालेल्या कंपनीच्या अतिरिक्त सर्वसाधारण सभेमध्ये कंपनीच्या संस्थापन समय अभिलेखाच्या मुद्द्दा क्र. II मध्ये फेरफार करण्यास संमती प्राप्त करण्यासाठी अर्ज करण्याच्या विचारात आहे.

कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित असलेल्या बदलामुळे कोणीही व्यक्ती ज्याच्या स्वारस्याला त्यामुळे बाधा होणार असेल त्यांनी सदर सूचनेच्या प्रसिद्धीपासून चौदा दिवसांच्या आत एमसीए पोर्टल **(www.mca.gov.in)** वर गुंतवणूक तक्रार अर्ज भरून किंवा क्षेत्रीय संचालक, पश्चिम क्षेत्र, खंडपीठ, एवरेस्ट बिल्डींग, ५ वा मजला, १००, मरीन लाईन्स, मुंबई – ४००००२ ह्यांच्याकडे त्याच्या/तिच्या स्वारस्याची आणि विरोधाची कारणे शपथपत्रामध्ये नमूद करून नोंदणीकृत कंपनीच्या खाली नमूद करण्यात आलेल्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये पाठवावे:

**वीरवाणी इंडस्ट्रीयल इस्टेट, दुकान क्र. ए १०१, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे समोर, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०००६३, महाराष्ट्र, भारत**

**संचालक मंडळाच्या वतीने वियाटोन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०१/०२/२०२५**
**सही/- सुशील गोयंका, संचालक**
**डीआयएन: ००५३३२७४**

**कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**
**उपमुख्य अधिकारी - पणन विभाग**
म्हाडा MHADA
**कक्ष क्र. २५५, पहिला मजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा), कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१. कार्यालयीन संपर्क क्र.६६४० ५०९९/५०४४**

**शुद्धिपत्रक**

१) कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ / पणन विभागातंर्गत सोडत २०२४-२५ करिता जाहिरातीमध्ये ओरस येथे संकेत क्र. २५३ A नुसार १०९ सोसायटी भूखंड विक्रीसाठी उपलब्ध आहे.
२) संकेत क्र. २७९ PMAY प्रकल्पामध्ये १२४ सदनिका वगळण्यात येत आहे.
३) रोहा येथे भूखंड क्र. २२१, संकेत क्र. १९ E हा सर्वसाधारण प्रवर्गातच आहे.
४) चारही उत्पन्न गटासाठी किमान मर्यादा अत्यल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अत्यल्प व अल्प, अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अल्प व मध्यम, मध्यम उत्पन्न गटातील व्यक्ती मध्यम व उच्च, उच्च उत्पन्न गटातील व्यक्ती केवळ उच्च उत्पन्न गटासाठी अर्ज करु शकता.
५) अधिक तपशीलाकरिता संकेत स्थळावरील माहिती पुस्तिकेचे अवलोकन करावे.
६) संकेत क्र. २८१ मधून ४ सदनिका वगळण्यात आल्या आहेत.
७) संकेत क्र. २७१ B मधून सर्वसाधारण जनता या प्रवर्गातील ११ सदनिका वगळण्यात आल्या आहेत.
एकूण PMAY योजनेतील ९८८३ सदनिका मधून ९७४१ इतक्याच सदनिका विक्रीस उपलब्ध आहे. वरील प्रमाणे दुरुस्ती वाचण्यात यावी.

**सही/-**
**(सारिका झनके)**
**मिळकत व्यवस्थापक-२/पणन,**
**कोंकण मंडळ**

CPRO/A/65
**म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**
**(म्हाडाचा घटक )**
म्हाडा MHADA

**निविदा सुचना ४७ (२०२४-२५)**

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, यांच्या कार्यालायामार्फत खालील दर्शविलेल्या इमारतीच्या दुरुस्तीकरीता खाली दर्शविलेल्या कामाकरीता माहराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण / सा.बां. विभागाकडे उप जिल्हा निबंधक / पश्चिम उपनर मुंबई यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदारांकडून खालील कामाच्या मोहोरबंद बी- १ फॉर्ममध्ये [ टक्केवारी दर] मोहरबंद निविदा मागवित आहोत. ज्यांच्या दुरुस्तीच्या कामासाठी स्तंभ क्र. १० मध्ये दर्शविलेल्या योग्य वर्गाच्या पुनर्रचित इमारती खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | १% इसारा रक्कम | २% सुरक्षा अनामत रक्कम | कोऱ्या निविदा विक्रीची रक्कम (विना परतावा रु. १८% GST सह) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| १ | कार्यकारी अभियंता फ दक्षिण विभागांतर्गत असलेली विशेष दुरुस्ती अंतर्गत सदगुरु सदन या पुनर्रचित इमारतीचे गटार लाईन सुधारणे व शहाबाबद लादीचे काम करणे. | ९,९६,८०२.०० | ९,९६८.०० | २०००० | ५९०.०० | दि. ०३/०२/२०२५ ते दि. १७/०२/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | दि. १८/०२/२०२५ से दि. २०/०२/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | १५ महिने | वर्ग ७ व त्यावरील |

1. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रककम ०८ दिवसांच्या आत भरली नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करून त्यांनी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजूर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.
2. को-या निविदा म्हाडा / मुं.म.पा./खा. मां विभाग/ के.सा.बां.विरेल्वे / बीपीटीए अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणाकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्याए पैन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
3. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविधा भरतांना ते कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुचील शपथपत्र सादर करावे.
4. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर सादर करावे.
5. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुलड बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं.इ. दु. व पु.मंडळ यांच्या नावावर द्यावी.
6. को-या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता [] विभाग तिसरा मजला, अनेक्स बिल्डिंग, म.न.पा. इमारत, परेल, मंबई- १२. यांचेकडून विहित केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे को या निविदांची विक्री केली जाईल तांत्रिक व आर्थिक लिफाफा हे एका लिफाफामध्ये याच कार्यालयात स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा शक्यतो दि. २०/०२/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता नंतर कार्यकारी अभियंता, फ[द] विभाग मुं.इ.दु. व पु.मंडळ यांच्या कार्यालयात उघडण्यात येतील.
7. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
8. या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामाचा / वास्तु बांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता [सिव्हिल इंजिनियर] आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे.
9. उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने / साधन संपत्ती विचारात घेतली जाणार नाही.
10. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकारी सक्षम अधिका-यांकडे ठेवण्यात येत आहे.
11. मागविण्यात आलेली निविदा सन २०२०-२१ च्या एसएसआर वर आधारीत असून, त्यामध्ये जी.एस.टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. ची अदागयी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल
12. जी. एस. टी. अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

CPRO/A/ 66

**सही/-**
**कार्यकारी अभियंता फ [द] विभाग**
**मुं.इ.दु. व पु.मंडळ**

**म्हाडा - गृहनिर्मान क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**
Follow us: @mhadaofficial

एक मूल, एक शिक्षक, एक पुस्तक आणि एक पेन जग बदलू शकतात. शिक्षण हाच एकमेव उपाय आहे.



- मलाला युसुफझाई
नोबेल विजेती

वृत्तमानस
मुंबई, शनिवार, १ फेब्रुवारी २०२५

# शेतकऱ्यांच्या हातावर तुरी!

हातावर तुरी देणे हा वाक्प्रचार पसार होण्या कामी वापरला जातो, सरकारच्या बाबतीतही तो वापरला जावा असे शेतकऱ्यांना वाटते. त्याचे कारणही तसेच आहे. कारण तुरीच्या भावाबाबत शेतकरी चिंतेत असताना सरकार मात्र त्यांच्यासमोर न येता पसार होताना दिसते. तुरडाळीचा वापर हा भारतात सर्वाधिक केला जातो. असे असले तरी याच तुरीची तरतरी कमी झाल्याने शेतकरी चिंतेत पडलेला आहे. खुल्या बाजारात हमीदराच्या तुलनेत पाचशे रुपये कमी दराने तूर विकल्या जाऊ लागली आहे. सोयाबीन व कापसाचे भाव पडले असताना आता तुरीचे दर पडल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. यंदा पावसामुळे तुरीसोबतच अन्य डाळींचे उत्पादनही मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याने त्यांचे दरही घसरले आहेत. डिसेंबरपर्यंत 110 रुपये किलो असलेली हरभरा डाळ 20 रुपयांनी तर मूगडाळ 15 रुपयांनी आता स्वस्त झाली आहे. मसूर डाळीचे दर किलोला 90 रुपयांवर स्थिर असले तरी तिचेही दर काहीअंशी कमी होण्याची शक्यता असून सर्वसामान्यांना हा चांगला दिलासा मिळू शकतो. विदर्भात मोठ्या प्रमाणात तुरीचे पीक घेतले जाते. मात्र, गेल्या वर्षी झालेल्या अवकाळी पावसामुळे तुरीच्या उत्पादनात मोठी घट झाली होती. त्यामुळे बाजारात तुरीची आवक मंदावली होती. आवक घटली असताना बाजारातून मागणीवाढल्याने तूर डाळीचे भाव गगनाला भिडले होते. गेल्या वर्षी तुरीच्या भावाने 10 हजारांचा टप्पा ओलांडला होता. पण, आता तुरीचे भाव झपाट्याने खाली येत आहेत. सरकारने यंदा तुरीला 7 हजार 550 रुपये प्रति क्विटल हमीभाव जाहीर केला आहे. सध्या बाजारात हमीभावापेक्षा अधिक दर असले, तरी नवीन तूर बाजारात आल्यावर दरांमध्ये आणखी घसरण होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षीच्या समाधानकारक पावसामुळे तुरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होईल, असा अंदाज आहे. यामुळे व्यापाऱ्यांनी शिल्लक साठा विक्रीसाठी खुला केल्याने बाजारात तूरडाळीचे दर उतरले आहेत. उपलब्ध माहितीनुसार, बाजारात तूरडाळीचा दर किंटलला 13 हजार 550 रुपये होता. पंधरा दिवसांपूर्वी याच तूरडाळीचा दर किंटलला 17 हजार 500 रुपये होता. किरकोळ बाजारात तूरडाळीचे दर किलोला190 रुपयांपर्यंत पोहोचले होते. ते आता 150 रुपयापर्यंत उतरले असले तरी तूर उत्पादक शेतकरी मात्र यामुळे निराश झाला आहे. उत्पादन खर्चसुद्धा निघेल की नाही याची शेतकऱ्यांना अजिबातच खात्री नाही. यंदा चांगला पाऊस झाल्याने महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश या प्रांतात तुरीचे विक्रमी पीक आले आहे. देशांतर्गत तुरीची मागणी 42 लाख टनांची आहे. यंदा तेवढे उत्पादन देशांतर्गत होण्याची शक्यता आहे. शिवाय बर्मा व आफ्रिकेवरून सुमारे दहा लाख टन तूर आयातीचे करार झालेले असल्यामुळे ही डाळ देखील देशात येणार आहे. यामुळे तुरीचा साठा हा मागणीपेक्षा जास्तीचा होणार आहे. या शिल्लक राहणाऱ्या साठ्याचा अंदाज घेऊनच बाजारातील दर आतापासूनच पडण्यास सुरुवात झाली आहे. भारतात दरवर्षी 42 ते 44 लाख टन तूरडाळीची मागणी असते. केंद्रीय सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीनुसार, मागील आर्थिक वर्षात देशात सुमारे 43 लाख टन इतकं तुरीचं उत्पादन झाले होते. यंदा तुरीचे बंपर उत्पादन होण्याची शक्यता आहे. नवीन हंगामातील तूर बाजारात आल्यानंतर दरात मोठी घसरण होण्याची शक्यता गृहीत धरून व्यापाऱ्यांनी शिल्लक साठ्यातील तूरडाळ विक्रीला काढल्याने दर कोसळले आहेत. नवीन उत्पादन बाजारात आल्यावर तूरडाळीचा दर शंभरपर्यंत खाली येऊ शकतो. मागील वर्षीच्या दसरा दिवाळीमध्ये हरभरा डाळीचे दर 110 रुपये किलोपर्यंत पोहोचले होते. अद्याप नवीन हंगामातील हरभरा बाजारात येण्यापूर्वीच हरभरा डाळीचे दर 20 रुपयांनी खाली आले आहेत. मसूर डाळीचे दर किलोला pरुपये स्थिर असले तरी मूगडाळीचे दर मात्र किलोला 10 ते 15रुपये उतरले आहेत. नवीन हंगामातील तुरीची अद्याप बाजारात आवक झालेली नसली तरी ती लवकरच अपेक्षित आहे. दहा वर्षांपूर्वी जगभर दुष्काळ होता. देशांतर्गत तुरीचे उत्पादन अतिशय कमी झाले होते, बाजारपेठेत तुरीला दहा हजारापेक्षा अधिक भाव मिळत होता. तूरडाळीची एक किलोची किंमत 250 रुपयांपर्यंत पोहोचली होती. जगात मिळेल तेथून केंद्र सरकार तूरडाळीची आयात करत होते. दुसऱ्या वर्षी सरकारने देशातील शेतकऱ्यांना डाळीचे उत्पादन अधिक घेण्याचे आवाहन करून आपण ती हमीभावाने खरेदी करू असे सांगितले. शेतकऱ्यांनी डाळीचे उत्पादन वाढवले. मात्र, त्यानंतर बाजारपेठेत हमीभावापेक्षा एक हजार रुपये कमी दराने शेतकऱ्याला तूर विकावी लागली होती ही बाब विसरून चालणार नाही. देशाला 42 ते 45 लाख टन तुरीच्या डाळीची गरज आहे. देशांतर्गत उत्पादन 32 ते 35 लाख मे. टन एवढे होते. हवामान बदलामुळे उत्पादनात मोठी घट होऊन ग्राहकांची अडचण होऊ नये म्हणून आयातीचे निर्णय घेतले जातात. 2016 हे आंतरराष्ट्रीय डाळ वर्षे म्हणून जगभर साजरे केले गेले. देशात डाळीचा वापर दरडोई सहा किलोपेक्षा कमी होतो, हे सर्वेक्षणातून लक्षात आले आहे. प्रथिने मिळविण्याचा स्वस्त पर्याय म्हणून डाळ उत्पादनात सरकारने लक्ष घातले. मात्र डाळींचा वापर हवा तसा वाढलेला नाही. या वर्षी तुरीचा हमीभाव 7550 आहे व बाजारपेठेत 7100 इतका भाव तुरीला मिळतो आहे. यावर्षी चांगला पाऊस झाल्यामुळे तुरीचे विक्रमी उत्पादन झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्याला तुरीला किमान हमीभाव तरी मिळावा अशी अपेक्षा आहे. मात्र सरकारने 2026 पर्यंत शून्य टक्के आयात शुल्क आकारत विदेशातील तूर उत्पादकांना पायघड्या घातल्या आहेत. त्यामुळे देशांतर्गत शेतकऱ्यांना हमीभाव मिळेना झाला आहे. गेल्या चार वर्षांपासून दरवर्षी हमीभावापेक्षा कमी भावानेच शेतकऱ्याला तूर विकावी लागत आहे. ही परिस्थिती गेल्या काही वर्षांपासून असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे हमीभावापेक्षा हजार रुपये कमी भाव बाजारपेठेत शेतकऱ्याला नेहमीच मिळत होता. हमीभावामुळे तूर विक्री होत नसल्याचे दिसत असल्याने केंद्र सरकारने खरेदी केंद्र सुरू केले. पण तिथेही वेगवेगळी कारणे सांगत शेतकऱ्यांची सातत्याने कोंडी केली जाते. सरकारने महागाईवर नियंत्रण ठेवले पाहिजे. सामान्य माणसाला परवडेल अशा किमतीत शेतमाल मिळायला हवा असेल तर स्वस्त धान्य दुकानात सरकारने डाळ उपलब्ध करून दिली पाहिजे. यासाठी बाजारपेठेत लक्ष घालून शेतकऱ्याला हमीभाव मिळेल यासाठी काळजी घ्यायला हवी. कॅनडा, बर्मा, म्यानमार, टांझानिया आदी देशात तेथील सरकार तूर उत्पादकांच्या हिताचे निर्णय घेते. मात्र, भारतात चुकीच्या आयात-निर्यात निर्णयांमुळे तूर उत्पादक अडचणीमध्ये येतात असे या क्षेत्रातील अभ्यासक नेहमीच सांगतात. त्याकडे सरकारने लक्ष देणे आवश्यक आहे. जागतिक तूर उत्पादनात भारताचा वाटा 70 टक्क्यांपर्यंत आहे. भारत किंवा भारतीय उपखंड वगळता अन्य देशांत तुरीचा अन्न म्हणून फारसा उपयोग होत नाही. वास्तविक सरकारच्या चुकीच्या आयात-निर्यात धोरणाचा फटका हा शेतकऱ्यांना सातत्याने बसत आला आहे. जेव्हा बाजारात शेतमालाची आवक कमी होते, तेव्हा दर वाढण्याची अपेक्षा असताना आयात केली जाते आणि दर पाडले जातात. हे दुष्टचक्र कायमस्वरूपी थांबायला हवे आणि सरकारनेही हमीभावाबाबत शेतकऱ्यांच्या हाती तुरी देणे बंद करावे.

# गुन्हा सिद्ध करण्यासाठी 'लॅब ऑन व्हील'

सध्या पोलिसांसमोर नवनवीन गुन्ह्यांचे आव्हान उभे ठाकले आहे. दिवसागणिक गुन्ह्याचे स्वरूप बदलत आहे. गुन्हेगारांकडून गुन्ह्यासाठी होत असलेल्या नवीन पद्धतींचा उपयोग गुन्ह्याची उकल करताना अडचणीचे ठरत आहे. बदलत्या गुन्हेगारीनुसार तपासाकरीता असलेल्या यंत्रणेतही बदल होणे आवश्यक होते. त्यानुसार जलद गतीने तपास पूर्ण होण्यासाठी 'लॅब ऑन व्हील' अर्थात 'मोबाईल फॉरेन्सीक व्हॅन' (न्यायवैद्यक प्रयोगशाळा ) ची सुविधा राज्यात उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून 27 जानेवारी 2025 रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते महाराष्ट्रात 21 मोबाईल फॉरेन्सीक व्हॅनचा शुभारंभ करण्यात आला आहे. महाराष्ट्र हे देशातील मोबाईल फॉरेन्सीक व्हॅन सुरू करणारे पहिले राज्य ठरले आहे.



पूर्वी मर्यादित तंत्रज्ञानामुळे बोटांचे ठसे आणि साध्या रक्ताच्या चाचण्या यासारख्या मूलभूत तंत्रांवर भर देण्यात येत होता. तसेच मानवी निरीक्षणावर अवलंबित्व असलेल्या प्रत्यक्षदर्शींच्या जबाबांवर आणि प्राथमिक साक्षींवर मोठा भर दिला जात असे. यासोबतच कमी प्रमाणात डीएनए विश्लेषण व मर्यादित स्वरूपामुळे गुन्ह्याचा तपास जलद गतीने होत नव्हता. यामध्ये पुरावे नष्ट किंवा पुराव्यांशी छेडछाड करून आरोपी शिक्षेपासून स्वत:ला वाचविण्यात यशस्वी होतात. तसेच पुरावे तपासणे ही वेळखाऊ प्रक्रिया होऊन बसली होती. मात्र मोबाईल फॉरेन्सीक व्हॅनसारख्या प्रगत तंत्रज्ञानाच्या उपयोगाने डीएनए विश्लेषण, फॉरेन्सीक ऑडिओ, सायबर फॉरेन्सीकचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात येणार आहे. गुन्हेगारांचा मागोवा घेण्यासाठी जैव-रासायनिक आणि डिजिटल पुराव्यांचा वापर केला जातो. या व्हॅनमुळे गुन्हे स्थळीच असे पुरावे गोळा करणे शक्य होणार आहे.

**न्याय वैद्यक प्रयोगशाळा संचालनालय कार्य**

न्याय वैद्यक प्रयोगशाळा संचालनालय अंतर्गत विषशास्त्र, जैवशास्त्र, भौतिक शास्त्र, दारू बंदी, सामान्य उपकरणे व विश्लेषण विभाग कार्यरत आहेत. या विभागांच्या मदतीने खून, बलात्कार, बॉम्बस्फोट आणि अंमली पदार्थ अशा गुन्ह्यांमध्ये विश्लेषण करून अहवाल देण्यात येतो. सध्याच्या काळात वाढते सायबर गुन्हे, डेटा चोरी व ऑनलाईन व्यवहारांमध्ये होणारी फसवेगिरी यामध्ये डिजिटल पुराव्यांची स्वीकार्यता माहिती तंत्रज्ञान कायद्यातंर्गत समाविष्ट आहे. त्यामुळे डिजिटल पुरावा हा अत्यंत महत्वाचा आहे. यासाठी संचालनालय अंतर्गत ध्वनी, सायबर व ध्वनीफित विभाग कार्यरत आहे. तसेच मानसशास्त्र विभागात लाय डिटेक्टर,ब्रेन मॅपिंग, नार्को विश्लेषणाचा उपयोग करण्यात येतो.

**फॉरेन्सीक व्हॅनमधील सुविधा**

फॉरेन्सीक व्हॅन अत्याधुनिक व प्रगत न्यायवैद्यक तंत्रासह सुसज्ज आहेत. व्हॅनमुळे गुन्हे दृष्य संकलित करणारे व व्हिडीओ कॉन्फरसिंगची सुविधा असणारे क्राईम सीन अप्लीकेशन, प्रशिक्षीत फॉरेन्सीक तज्ञाद्वारे कोणत्याही प्रकारचे क्राईम सीन प्रभावीपणे संकलित करता येणार आहे. क्राईम सीन अप्लीकेशन ब्लॉकचेन पद्धतीवर कार्य करते. जे पुरावे व 'चेन ऑफ कस्टडीची' नोंदणी सुरक्षीत करतात. ब्लॉक चेन तंत्रज्ञान मेटा डेटा आणि पुराव्यांच्या 'फाईल इनक्रीप्टेड व्हॅल्यू' संग्रहीत करून फॉरेन्सीक तपासात विश्वासार्हता निर्माण करतात.

**व्हॅनमधील उपलब्ध किट**

क्राईम सीन कॉर्डीनिंग ऑर प्रोटेक्शन किट, जनरल इन्व्हेस्टीगेटींग किट, एव्हीडन्स पॅकिंग अँड कलेक्शन किट, फूट अँड टायर ब्रीट कास्टीग किट, हाय इन्सेंटीकेंटींग फॉरेन्सीक लाईट सोर्स, ब्लड व सिमेन्स डिटेक्शन किट, डिएनए कलेक्शन अँड सेक्स्युअल असॉल्ट किट, एक्सप्लोझीव्ह डिटेक्शन किट, नार्कोटीक डिटेक्शन किट, गनशॉट रेस्युडींग टेस्ट किट, बुलेट हॉल्ट टेस्टींग किट, आर्सल इन्व्हेस्टीगेटींग विथ गॅस डिटेक्टर आणि सायबर फॉरेन्सीक किट अशा किटसह फॉरेन्सीक व्हॅन सुसज्ज असेल. या व्हॅनमध्ये रक्त, डीएनए संग्रहण आणि बलात्कार गुन्ह्यात आवश्यक पुरावे गोळा करता येणार आहे. वैज्ञानिक तज्ज्ञ व सहाय्यक कर्मचारी व्हॅनमध्ये असतील. व्हॅन सीसीटिव्हीने सज्ज असून कनेक्टेड असणार आहे. त्यामुळे सबंधित पोलीस स्टेशनला सबंधित गुन्ह्यकामी गोळा केलेल्या पुराव्यांची माहिती देता येणे शक्य होणार आहे. ही एकत्र प्रणाली असून यामध्ये सुसज्ज मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन, फॉरेन्सिक किट्स, फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि क्राईम सीन ॲप्लिकेशन यांचा समावेश आहे. यामुळे पुरावे गोळा करण्याची प्रक्रिया अधिक कार्यक्षम आणि अचूक बनणार आहे. तपास यंत्रणा आणि फॉरेन्सिक तज्ज्ञ यांच्यात उत्तम समन्वय साधला जाणार आहे.

**अशी काम करेल फॉरेन्सीक व्हॅन**

प्रत्येक व्हॅनमध्ये दोन तज्ज्ञ अधिकारी, एक मदतनीस आणि नियंत्रण कक्षात एक सहायक संचालक 24 तास कार्यरत असेल. पोलीस स्टेशनने नियंत्रण कक्षाला गुन्हा अन्वेषण ठिकाणाची माहिती देताच नियंत्रण कक्ष संबंधित फॉरेन्सीक व्हॅन युनीटला याबाबत माहिती देतील. व्हॅन टीम तपास अधिकाऱ्याशी समन्वय साधत गुन्ह्याच्या ठिकाणी पोहचेल. फॉरेन्सीक तज्ज्ञ मोबाईल टॅबलेटच्या माध्यमातून गुन्ह्याचे ठिकाण 'क्राईम सीन ॲप्लीकेशन'द्वारे निश्चित करतील. या अप्लीकेशनद्वारे गुन्हे स्थळाचे फोटो, व्हीडीओ घेण्यात येतील. फॉरेन्सीक तज्ज्ञ मार्गदर्शक तत्वानुसार गुन्हे स्थळावर फॉरेन्सीक किटच्या साहाय्याने पुरावे गोळा करतील आणि आवश्यकतेनुसार क्राईम सीन अप्लीकेशनमधील व्हिडीओ कॉलद्वारे नियंत्रण कक्षातील सहायक संचालक यांच्याशी संपर्क साधतील. फॉरेन्सीक तज्ज्ञ सर्व गोळा केलेले पुरावे व्हॅनमधील सीसीटीव्हीच्या निगराणीखाली सील करून एका बारकोडदद्वारे संरक्षीत करतील.

गुन्हे स्थळावरील सर्व छायाचित्रे, व्हिडीओ, ऑडीओ संदेश आणि पुरावे यासह गुन्ह्याच्या दृष्याचे तपशील सहायक संचालकांना पाठवतील. नियंत्रण कक्षातील सहायक संचालक तपशील तपासून गुन्ह्याच्या दृष्टीने पुरेसा व योग्य असल्याची खात्री करून मान्यता प्रदान करतील. व्हॅनमधील फॉरेन्सीक तज्ज्ञ गुन्ह्याच्या ठिकाणच्या तपशीलांमध्ये कोणताही बदल करू शकणार नाही. तज्ज्ञ क्राईम सीन अहवाल तयार करतील आणि अहवाल सर्व पुराव्यांसह पोलीसांना सुपूर्द करतील. यामुळे गुन्हे स्थळावरून गोळा केलेल्या सर्व पुराव्यांची सुरक्षितता अधोरेखीत होते. ब्लॉक चेन तंत्रज्ञानाचा वापर करून क्राईम सीन ॲप्लिकेशन गुन्हे स्थळावर तपासणी करणार आहे. यामध्ये पुरावे संग्रहीत करून बारकोडद्वारे सुरक्षित करण्यात येणार आहे. गुन्ह्यांच्या उलगडा करण्यामध्ये फॉरेन्सिक सहाय्य पुरविण्यासाठी, पुरावे गोळा करणे व विश्लेषण करण्यासाठी ही व्हॅन उपयुक्त ठरणार आहे.

**व्हॅन प्रकल्पाचा उद्देश**

गृह विभाग अंतर्गत राज्य शासनाने मंजूर केलेल्या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन प्रकल्पाचा उद्देश भारतीय न्याय सुरक्षा संहितेतील तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक आहे. गुन्ह्यांमध्ये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा तज्ञांकडून सात वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या प्रकरणांमध्ये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा तज्ञांकडून परिस्थितीजन्य पुरावे गोळा करणे बंधनकारक आहे. गुन्हे स्थळावरुन परिस्थितीजन्य पुरावे गोळा, जतन करण्याकरीता तसेच व्हिडीओग्राफी व फोटोग्राफीकरीता न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या तज्ञांना किट व केमिकल्ससह मोबाईल व्हॅनचा वापर करण्यात येणार आहे.

**मोबाईल फॉरेन्सीक व्हॅन प्रकल्पाचे स्वरूप**

महाराष्ट्र सरकारने प्रकल्पास लागणाऱ्या निधीला मंजूरी दिली आहे. प्रकल्पाअंतर्गत २५९ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. एकुण २५९ व्हॅन्सकरिता फॉरेन्सीक किट्स, कंट्रोल रूम, केमिकल्स आणि आवश्यक सॉफ्टवेअर ब्लॉकचेन अप्लिकेशन्ससह पुढील पाच वर्षांकरिता ऑपरेशन आणि देखभालीसह प्रशिक्षित फोरेन्सिक तज्ज्ञ सुसज्ज असणार आहेत. उपक्रमाची परिणामकारकता सुनिश्चित करण्यासाठी सरकारने पायलट प्रकल्पासाठीसुद्धा निधी मंजूर केलेला आहे. या प्रकल्पाअंतर्गत पायलट प्रकल्प सुरुवातीला मुंबई, नवी मुंबई, नागपूर शहर आणि जळगाव जिल्ह्यात राबविण्यात येत आहे यामध्ये एकूण २१ व्हॅन आहे. त्यानंतर प्रत्येकी ११९ व्हॅनसह दोन टप्प्यात उर्वरित एकूण २३८ व्हॅनसह संपूर्ण राज्यात हा प्रकल्प पूर्ण केला जाणार आहे.

प्रत्येक उपविभागीय पोलीस अधिकारी व उपायुक्त यांचे कार्यालयात एक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन कार्यरत राहणार आहे. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय व प्रत्येक प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे एक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन असे एकूण ८ व्हॅनचा वापर अतिमहत्वाच्या, संवेदनशील तसेच आव्हानात्मक प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे. प्रत्येक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनमध्ये सहाय्यक रासायनिक विश्लेषक, वैज्ञानिक सहाय्यक, प्रयोगशाळा परिचर आणि चालक राहणार आहेत. अशा एकूण २५९ व्हॅनसाठी एकूण २२०० पदेही मंजूर करण्यात आली आहेत. या प्रकल्पामुळे निश्चितच गुन्हे सिद्धतेमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे.

**- निलेश तायडे,**
विभागीय संपर्क अधिकारी

## पत्र मानस

### 10 वी व 12 वीच्या परीक्षेत मुलींच्या बुरख्यावर बंदी नको

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत परीक्षेसाठी बुरखा घालुन बसण्यावर बंदी घालावी असे ना. नितेश राणे यांनी शिक्षणमंत्री भुसे यांच्याकडे मागणी केली आहे. ही बाब लक्षात घेता परीक्षेला जाण्यापूर्वी मुलींची तपासणी महिला पोलीसाकडुन योग्यरित्या करून परीक्षेला बसण्याची परवानगी द्यावी. नेमके कोण परीक्षेला बसले आहे हे पहावेच लागेल. चेहऱ्यावरील बुरखा बाजुला करता येतो. व चेहरा ओळखता येतो. जर तपासणी करताना मुलींनी आडकाठी घातली जात असेल तर परीक्षेला बसायला परवानगी देऊच नये. बुरखा घालण्यावर बंदी ही सरकारची भुमिका योग्य वाटत नाही. मुस्लिम विद्यार्थीनी मुलींवर बंधणे घालणे हा धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रकार म्हणावा लागेल. मुस्लिमांना चिथावणी देण्याचा हा प्रकार नाही ना. शिक्षणमंत्र्यांनी जरूर विचार करून धार्मिक तेढ वाढु नये. वातावरण बिघडवू नये असे वाटते.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर, अंधेरी**

### अशाने सुजाण नागरिक कसे घडणार?

आसाममधील सिलचर येथील एका शाळेतील दहावीच्या निरोप समारंभानंतर वर्गातील साहित्याची नासधूस करतानाची ध्वनीचित्रफित पाहण्यात आली. समाजमाध्यमांवर ही ध्वनीचित्रफित मागील आठवडाभरापासून प्रसारित होत आहे. यात विद्यार्थी (विद्यार्थिनीसुद्धा) वर्गातील पंखा, फळा, बाके, लाईट इत्यादी साहित्य तोडून फोडून टाकताना दिसत आहेत. हे सगळे कृत्य ते एका उन्मादात करत आहेत. शालेय जीवनात शाळेतील शिस्तीला किती महत्त्व असते. पण या प्रकारात त्या शिस्तीचा लवलेशही दिसत नाही. जणू काही शालेय जीवनात ती शिस्त या विद्यार्थ्यांवर लादली गेली असावी आणि ती शिस्त अशा अनिर्बंध वागण्याने त्या विद्यार्थ्यांनी झुगारुन लावली असावी. या मुलांचे भविष्य नक्की कसे असेल? सामाजिक जीवनात वावरताना सार्वजनिक वस्तूंचीही ते अशीच नासधूस करतील का? त्या शाळेने त्या विद्यार्थ्यांवर काही कारवाई केली की नाही ते कळू शकले नाही. पण कुठेतरी त्यांच्या कृत्याची जाणीव त्यांना करुन द्यायला हवी.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### धनंजय मुंढेचा राजीनामा अशक्य

मस्साजोग सरपंच संतोष देशमुख याच्या हत्येत हात असल्याचा आरोप असणा-या आणि मंत्री धनंजय मुन्ढेशी सलोख्याचे संबंध असलेल्या वाल्मिक कराडवरुन राजकीय वातावरण पेटले आहे.यावरुन मुन्ढँचा राजिनामा विरोधी पक्षानी मागितला आहे.सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यानी त्याचे सर्व पुरावे उपमुख्यमंत्री अजित पवार याना दिले आहेत.अजित पवारानी एकच घोशा लावलाय तो म्हणजे या प्रकरणाची एसआयटी ,सीआयडी चौकशी सुरु आहे.त्यात कोणीही दोषी आढळल्यास कारवाई करण्यात येईल.मुळातच बीड मधील सर्व यंत्रणा या वाल्मिक कराड आणि मुन्ढेच्या इशा-यावर चालत आहेत.मंत्री मुन्ढे आणि वाल्मिक कराड यांच्यात कितीही सबंध असले तरी खून प्रकरणात मुन्ढे सापडणे कठिण आहे. उलट पालक मंत्री अजित पवारानी मुन्ढेवर आरोप करणा-या आमदार सुरेश धस आणि प्रकाश सोळंके यानाच जिल्हा नियोजन समिती मधून डच्चू दिलाय.मुन्ढेना वाचविण्याचा प्रयत्न मंत्री अजित पवार नक्कीच करतील.त्यामुळेच मंत्री धनंजय मुन्ढेचे मंत्रिपद अबाधित राहील.

**- अरुण पां.खटावकर**

### महाराष्ट्रात 2024मध्ये तब्बल 15335 अपघाती मृत्यू ...

महाराष्ट्रात २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये रस्तावरील अपघातात वाढ झाली असून त्यांची संख्या १५३३५ एवढी आहे . २०२३ मध्ये ही संख्या १५३६६ होती . एका बातमीनुसार मुंबई पुणे एक्स्प्रेस वरील अपघात १९ टक्क्यांनी वाढले आहेत . तर समृद्धी महामार्गावरील अपघात ४ टक्क्यांनी कमी झाले आहेत . विशेष म्हणजे नऊ जिल्हे व शहरामध्ये मृत्यूमध्ये १० टक्क्यापेक्षा जास्त वाढ झाली आहे . धुळे जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे २५ टक्के वाढ झाली आहे . एकूणच दिवसेंदिवस रस्त्यावरील अपघातात मृत्यू होणारांचे प्रमाण वाढत चालले आहे ही चिंताजनक बाब आहे . दिवसे दिवस वाहनांची संख्या प्रचंड वाढताना दिसून येत आहे . अपघाताची करणे विविध आहेत . त्यामध्ये १. वेग जास्त घेऊन वाहन चालविणे व वेग मर्यादेचे नियम डावलणे २. मद्यप्राशन करून वाहन चालविणे ३. वाहतुकीचे नियम न पाळणे ४, कमी वयातील मुलांच्या हातात गाडी देऊन अपघाताला आमंत्रण देणे वरील काही गोष्टीमुळे अपघात होत आहेत . दिवसेंदिवस नागरिकांमध्ये चार चाकी व दुचाकी वाहने घेण्याचे प्रमाण वाढत चालल्याचे दिसते दिसते . आज रस्त्यावर प्रचंड वाहतूक दिसते . या मुले दिवसेंदिवस प्रदूषणाचा प्रश्न बिकट होत चालला आहे .रस्त्यावरील वाहनांना कोणतेही निर्बंध नाहीत . त्यांच्या संख्येवर सुद्धा काही मर्यादा नाही .या अपघाताला रस्त्यावरील खाजगी वाहनांची संख्या कमी करून सरकारी वाहनांची संख्या वाढविणे म्हणजेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारणे ही उपाय होऊ शकतो . त्या दृष्टीने सरकार प्रयत्न करीत आहे पण हे प्रयत्न फारच कमी आहेत आज पुण्यासारख्या शहरात रस्त्यावर चालले मोठे मुश्किल होत चालले आहे अशीच परिस्थिती इतर शहरात दिसून येते केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी देशात २०२४ मध्ये १. ८० लाख मृत्यू झाल्याचे सांगितले आहे ही संख्या खरेतर प्रचंड आहे . ही संख्या हळू हळू कमी कशी करता येईल या कडे सर्वांचेच लक्ष हवे

**- शांताराम वाघ पुणे**

### महागडा महाकुंभ

महाकुंभ प्रयागराजसाठी विमान भाडे गगनाला भिडले आहे. दिल्लीहून पन्नास हजार तर मुंबईहून बावीस हजार विमान भाडे लागत आहे. भाविकांना बोटीच्या भाड्यात पन्नास टक्के वाढ केली आहे.प्रयागराजमध्ये राहण्यास मिळत रुम मिळत नसून भाडे खूपच वाढले आहे.पाण्याच्या बाटलीला शंभर रुपये मोजावे लागत आहेत.गाडीला दहा किलोमीटर लांब पार्किंग शोधावे लागत आहे.महाकुंभला भेट देणाऱ्या भाविकांचे शोषण करण्यासाठी सेवा पुरवणा-या सगळ्या यंत्रणा सरसावल्या आहेत. यावर कोणाचे नियंत्रण नाही का? महाकुंभ ह्या मोठ्या आध्यात्मिक मेळाव्याने भारतातील आणि बाहेरील लाखो भक्तांना आकर्षित केले असल्याने प्रयागराजमध्ये पायाभूत सुविधांवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. त्याचा व्यवसायिक फायदा उठवत आहेत. महाकुंभातील चेंगराचेंगरी,संगम घाटावर भगदाड,आगीमध्ये अनेक तंबू, साहित्य जळून खाक झाले असे अपघात झाले आहेत.महाकुंभ,इतिहासातील सर्वात महागड्या धार्मिक कार्यक्रमांपैकी एक आहे. सरकार सामान्य नागरिकांना ब-याच मोफत सेवा देत आहे तसेच महाकुंभात सरकार सामान्य भाविकांना मोफत सुविधा का देत नाहीत?

**- विवेक तवटे, कळवा, ठाणे**

## देवभूमी स्पोर्ट्स फाउंडेशनचा कौथिग 16 महोत्सवात नेते प्रितम म्हात्रेंची उपस्थिती

**पनवेल :** उत्तराखंड येथील रहिवासीयांच्या माध्यमातून देवभूमी स्पोर्ट्स फाउंडेशनच्या पुढाकाराने "कौथिग भाग:-16" चे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी शेकापचे नेते प्रीतम म्हात्रे यांनी भेट दिली. यामध्ये उत्तराखंड मधील संस्कृती ,खाद्य संस्कृती, तेथील लोककला या महोत्सवाचे वैशिष्ट्य होते. सांस्कृतिक कार्यक्रमा सोबतच सामाजिक कार्यक्रमांमध्ये आरोग्य शिबिर, रोजगार शिबिर आणि इतरही बरेच काही या ठिकाणी आयोजकांकडून आयोजित करण्यात आले होते. आजही कामानिमित्त नवी मुंबईत आल्यावर सामाजिक बांधिलकीतून असे उपक्रम आपले इतर राज्यातील बांधव आपल्यासोबत एकरूप होऊन आयोजित करतात याचे समाधान वाटत असल्याचे शेकापचे नेते प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले.



### महत्त्वाचे

## वृत्तपत्र विक्रेत्यांना कारवाईचा फटका

**बदलापूर :** आठवडाभरापासून बदलापूर नगरपरिषदेने पदपथावरील अतिक्रमण हटविण्याची कारवाई केली. कारवाईला नवीन आलेले मुख्याधिकारी मारुती गायकवाड स्वतः रस्त्यावर उतरले आहेत. सुरुवातीला बदलापूर पूर्व परिसरात पदपथावरील अतिक्रमणे काढण्यात आली. पूर्वेला जवळपास सर्व मुख्य रस्त्यांची पदपथे मोकळी झाली.बदलापूर पश्चिम हद्दीत कारवाई करताना वृत्तपत्रे विक्रेत्यांना फटका बसला आहे. बदलापूर पूर्व भागातील पदपथे मोकळी केल्याची कारवाई केल्यानंतर बदलापूर पश्चिम बाजारपेठ स्थानक परिसरात अतिक्रमणे हटवताना काही वृत्तपत्रे विक्रेत्यांना त्याचा फटका बसला आहे. वृत्तपत्रे विक्रेत्यांवरही कारवाई झाली.यामुळे वृत्तपत्र विक्रेते हवालदिल झाले आहेत

## छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर सज्ज

**भिवंडी :** महाराष्ट्राचे श्रद्धास्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर उभारण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे महाराष्ट्रातील पहिले मंदिर भिवंडी येथे उभारण्यात येत आहे. अखेर या मंदिराच्या लोकार्पणाचा मुहूर्त ठरला आहे. लोकार्पणनंतर शिवभक्तांसाठी हे मंदिर खुले होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे महाराष्ट्रातील पहिले मंदिर भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा या ठिकाणी साकारत आहे. येत्या 17 मार्च 2025 ला तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती दिनी प्राणप्रतिष्ठा आणि मंदिराचा लोकार्पणाच्या भव्यदिव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. या ठिकाणी जी शिवरायांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. मैसूर येथील सुप्रसिद्ध मूर्तिकार अरुण योगीराज ज्यांनी आयोध्या राम लल्ला यांची मूर्ती साकारलेली आहे त्यांनीच शिवरायांची मूर्ती साकारली आहे. ही मूर्ती मैसूर येथून मराडे पाडा येथे आणण्यात आली आहे.

## डिझेल तस्करीबाबत स्थानिक पोलिसांच्या कामावर प्रश्नचिन्ह

**अलिबाग :** रायगड जिल्ह्याला डिझेल तस्करीने मगरमिठी मारली आहे. डिझेल तस्करी आणि या तस्करांमुळे रेवदंडा, मांडवा, पेण अशा अनेक सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील किनारे असुरक्षित झाले आहेत. जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात अलिबाग तालुक्यातील रेवदंडा बंदरावर सीमा शुल्क विभागाने (कस्टम) डिझेल तस्करीचा भांडाफोड करत डिझेलचे 4 टँकर आणि दोन मासेमारी बोटी जप्त केल्या होत्या. कारवाई स्थळापासून रेवदंडा पोलीस ठाणे 500 मीटरवर असूनही त्यांना कारवाईचा पत्ता नव्हता. या कारवाईनतंरही डिझेल माफिया मोकाट असून त्यांच्यावरील स्थानिक पोलिसांचा अकुंश कमी होऊ लागल्याची चर्चा होत आहे. रायगडमधील समुद्रकिनारे सुरक्षित करण्यासाठी किनारपट्टीवर 150 सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. यातून संशयित हालचालीवर लक्ष ठेवले जाते. तरीही धरमतर खाडी, रेवदंडा बंदर, रेवस तसेच आणि अन्य जेटींमधून छुप्या पद्धतीने मध्यरात्री डिझेलची तस्करी होते. सागरी किनाऱ्यांवरील अनेक पोलीस ठाणे बंदराच्या व डिझेल तस्करीच्या स्थळापासून हाकेच्या अंतरावर आहेत.

# नामदेव शास्त्रींनी धनंजय मुंडेंची पाठराखण करणे समाजासाठी घातक

प्रतिनिधी
■ ठाणे





बीडमधील मस्साजोग गावचे सरपच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण गेल्या काही दिवासंपासून चांगलेच चर्चेत आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर देखील आरोप केले जात आहेत. खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याचा आरोप करत त्यांचा राजीनामा घेतला जावा अशी मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे. या आरोपांच्या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडेंनी भगवान गडावर जाऊन संत भगवान बाबा यांच्या समाधीचे दर्शन घेतले, तसेच गडाचे महंत डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्याशी चर्चा केली. यानंतर भगवान गड मंत्री धनंजय मुंडे यांच्या पाठीशी भक्कमपणे आहे, असे नामदेव शास्त्री यांनी जाहीर केले आहे. दरम्यान त्यांच्या या विधानानंतर राजकीय क्षेत्रातून प्रतिक्रिया उमटताना पाहायला मिळत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर यासंबंधी पोस्ट केली आहे. यावेळी आव्हाडांनी "डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी आज धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांचे समर्थन करणे आत्यांत दुर्दैवी आहे", अशी भावना व्यक्त केली आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी त्यांच्या पोस्टमध्ये विविध आरोप करत काही लोकांची यादी देखील दिली आहे. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, "डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी आज धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांचे समर्थन करणे अत्यंत दुर्दैवी आहे. भगवान गडासारख्या पवित्र ठिकाणावरून अशा गुन्हेगारी वृत्तीचे समर्थन आणि पाठराखण होणे, ही समाजासाठी अत्यंत घातक गोष्ट आहे. कधीकाळी आपण भगवानगड राजकारण्यापासून मुक्त करण्याची शपथ घेतली होती? आणि आज निष्पाप लोकांचे बळी घेणाऱ्या लोकांवर खोटे गुन्हे दाखल करून त्याचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्या धनंजय मुंडे वाल्मिक कराड टोळीचे समर्थन करताय ही मनाला न पटणारी गोष्ट आहे. शास्त्री महाराज आपल्याबद्दल आम्हाला नितांत आदर आहे, पण आपण धनंजय मुंडे वाल्मिक कराड टोळीची पाठराखण करणे हे भगवान बाबांच्या विचारांना तिलांजली देण्यासारखे आहे.

# खारघरच्या सेवा कॉरीडॉर उभारणीत पनवेल पालिकेच्या फलकांचा सिडकोला अडथळा

प्रतिनिधी
■ नवी मुंबई



सिडको महामंडळाने हजारो कोटी रुपये खर्च करुन खारघर उपनगराचे निर्माण केले. परंतु गेल्या अनेक वर्षांपासून उपनगरातील पांडव मार्गावरील मुख्य सेवा कॉरीडॉर बांधण्याकडे दुर्लक्ष केल्याने या जागेवर गाळेधारकांनी अतिक्रमण केले. तसेच पनवेल पालिकेनेसुद्धा याच मोकळ्या जागेवर फलक उभारणीचे काम एका कंत्राटदाराला दिले. सध्या या सेवा कॉरीडॉरच्या विकासातील अडथळे दूर करणे हेच सिडको मंडळासमोर आव्हान बनले आहे.

अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवणाऱ्या सिडकोला खारघरमध्ये शिरुन ही जागा मोकळी केल्याशिवाय खारघरवासियांना हा सेवा कॉरीडॉर मिळू शकणार अशी स्थिती निर्माण झाली आहे. खारघर उपनगरातील सेंट्रल पार्क येथील ग्रामविकास भवनाची इमारत ते उत्सव चौक या दरम्यान मोकळ्या जागेवर सिडकोच्या नियोजन आराखडाप्रमाणे १३ मीटर रुंदीचा जागा सेवा कॉरीडॉरसाठी प्रस्तावित आहे. मुख्य रस्त्यालगत ८ मीटर रुंदीचा सेवा रस्ता, पदपथ आणि वाहनतळासाठी या जागेचा लाभ वाहनचालकांना होऊ शकणार आहे. सध्या ग्रामविकास भवन ते उत्सव चौक या दरम्यानचे गाळेधारक आणि गृहनिर्माण सोसायटी आणि फलकांमुळे येथे सेवा कॉरीडॉरचे काम सुरू करणे सिडकोला शक्य नसल्याचे सिडकोच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न प्रसिद्ध करण्याच्या अटीवर सांगितले. सिडको मंडळाकडून अद्याप या जागेचे हस्तांतरण झाले नसताना पनवेल महापालिकेने संबंधित जागेवर फलक उभारणीसाठी कंत्राटदाराची नेमणूक करुन पालिकेचे उत्पन्न सुरू केले.

खारघर युटीलिटी कॉरीडॉर हा पनवेल महानगरपलिका हद्दीतील व सिडकोच्या मालकीचा आहे. ६ सप्टेंबर २०२३ मध्ये सिडकोच्या संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय क्र. १२७६४ संबंधित जागेवरील जाहिरात फलकास परवानगी अथवा न हरकत देण्यास व्यवस्थापक (शहरसेवा-३) यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी जाहिरात फलकांना परिवहन विभागामार्फत कोणतीही परवानगी देण्यात आली नसल्याचे समितीने स्पष्ट केले.

## पदपथावर झोपलेल्या कचरा वेचकावरुन मोटार गेल्याने मृत्यू

■ ठाणे




पदपथावर झोपलेल्या एका कचरा वेचकाच्या शरिरावरून बेदरकार मोटार गेल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. अजय (२८) असे मृताचे नाव असून याप्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजय हा एका कचरा वेचकाकडे काही दिवसांपूर्वीच कामाला लागला होता. परिसरातील कचरा वेचून तो उदरनिर्वाह करत होता. तसेच तो दररोज सिडको बसथांब्या लगत असलेल्या महाविद्यालयाच्या पदपथावर झोपायचा.

मंगळवारी रात्री ११.३० वाजता तो पदपथावर झोपला असताना भरधाव मोटार त्यांच्या छातीवरुन गेली. घटनेची माहिती अजय यांच्या मित्रांना मिळाल्यानंतर त्यांना त्याच मोटारीतून कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. परंतु उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात मोटार चालकाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

## 4 वर्षांच्या चिमुरडीवर ज्येष्ठ नागरिकाचा अत्याचार

### लोकांमध्ये संतापाची लाट

प्रतिनिधी
■ पनवेल




पनवेलमध्ये खळबळजनक घटना घडली आहे. पनवेलमध्ये ४ वर्षीय चिमुरडीवर अत्याचार झाल्याची घटना घडली आहे. पनवेलमधील शेडुंगमध्ये ही घटना घडली आहे. पनवेलच्या शेंडुगमध्ये हरी नावाच्या ६३ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने चिमुरडीवर अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पनवेलच्या शेडुंग येथील एका खासगी सोसायटीच्या लिफ्टच्या बाजूला असलेल्या भिंतीलगत ज्येष्ठ नागरिकाने चिमुरडीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणानंतर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात ६३ वर्षीय ज्येष्ठ नागरिकावर पोस्को कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी हरीला अटक केली आहे. त्याला कोर्टाने ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पनवेल तालुक्यातील शेडुंगमध्ये एका 4 वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. हरी या 63 वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने हे घृणास्पद कृत्य केले आहे. पीडित मुलगी आणि आरोपी एकाच सोसायटीमध्ये राहण्यास आहे. याच खाजगी सोसायटीमधील लिफ्टच्या बाजूला असलेल्या भिंतीलगत ज्येष्ठ नागरिकाने चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केला. पीडित मुलीने तिच्यासोबत घडलेला प्रकार पालकांना सांगितला. त्यानंतर तिच्या पालकांनी तात्काळ पोलीस ठाणे गाठत तक्रार दाखल केली. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात हरी विरोधात पोस्को कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## सिमेंटचा गाळ रस्त्यावर टाकणाऱ्यांकडून दंडवसूली



■ नवी मुंबई

बांधकामासाठी वापरण्यात येणारे सिमेंट काँक्रिट मिश्रीत पाणी रस्त्यावर सोडून दिल्याने त्या ठिकाणी काँक्रिटचा चिखल होऊन वाहने घसरुन अपघात होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत होत्या. त्या अनुषंगाने परिमंडळ 2 च्या अतिक्रमणविरोधी भरारी पथकाने परिमंडळ 2 चे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली धडक कारवाई करीत ज्या वाहनाव्दारे रस्त्यावर काँक्रिटचा चिखल रस्त्यावर सोडण्यात येत होता ते वाहन ताब्यात घेतले तसेच त्यांच्याकडून 30 हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. शहर स्वच्छतेला बाधा आणणा-या घटकांविरोधात महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात येत आहे.

# रेशनकार्डधारकांनो, ई-केवायसी करुन घ्या; अन्यथा धान्य बंद

प्रतिनिधी
■ बदलापूर




२० फेब्रुवारीपर्यंत केवायसी न झालेल्या रेशनकार्ड धारकाचे धान्य बंद होऊ शकते. त्यामुळे कार्डधारकांनी मुदतीत केवायसी करून घेणे आवश्यक आहे. बदलापूर शिधावाटप कार्यालयाने याबाबतची माहिती दिली.

आजही अनेक असे रेशनकार्डधारक आहेत, ज्यांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यामुळे सर्व कार्डधारकांनी २० फेब्रुवारीपूर्वी ई-केवायसी झाल्याची खात्री करणे आवश्यक आहे.अन्यथा त्यांचे पुढील महिन्याचे धान्य बंद करण्यात येईल. रेशनकार्ड धारकांनी त्यांचे घरातील सर्व सदस्यांचे केवायसी तातडीने व प्राधान्याने आपापल्या शिधावाटप दुकानात जाऊन पूर्ण करावे. कामानिमित्त, शिक्षणानिमित्त बाहेर राहणाऱ्या सदस्यांनी आधारकार्ड आणि रेशनकार्डचा बारा अंकी क्रमांकासह जवळच्या रेशन वितरण दुकानात जाऊन केवायसी प्रक्रिया पूर्ण करायची आहे. अन्यथा भविष्यात आपला धान्य पुरवठा बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे आवाहन बदलापूर ४६ फ चे शिधावाटप अधिकारी धनराज जाधव यांनी केले आहे.

> "कुटुंबातील मयत व लग्न झालेल्या व्यक्तीची नावे ऑफलाईन आणि ऑनलाईन शिधापत्रिकेमधून कमी करणेसाठी, शिधापत्रिकेत नाव वाढवणे, नवीन, दुय्यम शिधापत्रिका बनवणे इत्यादी कामांसाठी शिधापत्रिकाधारकानी कुटुंबातील रेशनकार्ड आधारकार्डसह शिधावाटप कार्यालयाशी संपर्क साधावा. कोणत्याही दलाल, एजंट व्यक्तीशी संपर्क साधू नये. आपली वरील नमूद सर्व कामे ह्या कार्यालयात खिडकीवर नेमण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यामार्फत निःशुल्क व मोफत करून घ्यावी."
>
> **- धनराज जाधव**
> **शिधावाटप अधिकारी ४६ फ बदलापूर**

# 120 किलो प्रतिबंधित प्लास्टिक साठ्यावर पालिकेची धडक कारवाई!

रु. 25,000/- इतक्या रक्कमेची दंड आकारणी !



प्रतिनिधी
■ कल्याण

आज महापालिकेच्या अधिकारी वर्गानी 3/क प्रभाग परिसरातील दुकानांची पाहणी केली असता, या पाहणी दरम्यान किरण स्टोअर या होलसेल दुकानात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक साठा आढळून आला. दुकानात सुमारे 120 किलो प्रतिबंधित प्लास्टिक आढळल्याने संबंधित दुकानदारावर रुपये 25,000/- रुपये दंड आकारण्यात आला आहे. महापालिकेने यापूर्वीही अशी कारवाई करून मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित प्लास्टिक जप्त केले आहे.

सदर कारवाई महापालिका परिमंडळ-1 चे उपआयुक्त प्रसाद बोरकर यांचे मार्गदर्शनाखाली 3/क प्रभागाचे सहा.आयुक्त धनंजय थोरात, अधिक्षक उमेश यमगर, स्वच्छता निरीक्षक जगन्नाथ वड्डे यांच्या पथकाने केली. महापालिकेकडून प्रतिबंधित प्लास्टिक बंदीच्या अंमलबजावणीसाठी सातत्याने उपाययोजना राबविण्यात येत असून, अनधिकृतरित्या प्लास्टिक साठवणाऱ्या व विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात आहे.

प्लास्टिकमुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनी प्लास्टिकचा वापर टाळावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

वकील जावेद अन्सारी

## जाहीर नोटीस

वसई येथील मा. श्री. जी. जे. श्रीसुंदर, दिवाणी न्यायाधिश व. स्तर, वसई हयांच्या न्यायालयात

ने. ता. २६/०२/२०२५
चौ.अ.क्र. ०४/२०२५
नि.क्र. ०५

**Mr. Siddhesh Deepak Desai ...... Applicant**
**To,**
**1. Mr. SIDDHESH DEEPAK DESAI**
**Plot No 302, Purnima Apartmnent Manvelpada Road**
**Near Parimal Hospital, Virar East 401305 Vasai, Palghar**
**2. Mr. JITENDRA CHANDRAKANT DESAI**
**D-601/701, Parritosh Premier Apt Behind Agashi Road**
**Virar West 401303 Taluka Vasai, District. Palghar**
**3. Mr. VIJAY CHANDRAKANT DESAI**
**Plot No 302, Purnima Apartmnent Manvelpada Road**
**Near Parimal Hospital, Virar East 401305**
**Vasai, Palghar ... Applicant**
**Verses**
**None ....Respondent**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी दिनांक ०२/०१/२०२५ रोजी Late Deepak Chandrakant Desai and Late Mrs Ranjan Chandrakant Desai ह्या दिनांक २७/१०/२००६ रोजी मयत झाले असुन त्यांच्या मालमत्तेसंबंधी वारस दाखला (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणेसाठी या न्यायालयात चौकशी अर्ज क्रमांक ०४/२०२५ दाखल केला आहे.

**Schedule of Property**

| Sr. No | SCHEDULE-A IMMOVEABLE PROPERTY] |
|---|---|
| 1. | Survey no 280, Hissa No 311admesuring 435 square Feet Flat No 302, Purnima Apartment, Manvelpada Road Near Parimal, Hospital, Virar East, Taluka -Vasai, District: Palghar, Maharashtra - 401305 |
| Sr. No | SCHEDULE-B MOVEABLE PROPERTY] |
| 2. | A. Saving account bearing no 029200100032177 in bank of Saraswat CO-Operative Bank amount lies in the account. Virar East Branch whatever |
| | B. Bank Locker bearing No.1/B/0565 at Saraswat CO-Operative Bank, Virar East Branch whatever amount lies in the Locker. (above serial no A and B hereinafter referred as Movable properties) |

ज्याअर्थी हेअरशिप सर्टीफिकेट मिळण्याकरिता या न्यायालयात चौ. अर्ज क्रमांक ०४/२०२५ दाखल केलेला आहे. ज्या कोणी इसमास त्यांचे कायदेशीर वारस, हक्क हितसंबंध किंवा हरकत असेल त्यांनी ह्या न्यायालयांत दिनांक २६/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून एक महिन्याचे आत लेखी हरकत दाखल करावी. सदरहू वारस दाखला देण्याबाबत जर कोणत्याही इसमाची हरकत न आल्यास योग्य ते पुरावे व कागदपत्रे घेऊन अर्जदार ह्यांना वारस दाखला देण्यात येईल हयाची कृपया नोंद घेण्यात यावी.
आज दि. ३१/०१/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

हुकुमावरुन,
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर वसई

## बृहन्मुंबई महानगरपालिका

### जाहीर सूचना

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की येत आहे की बृहन्मुंबई करीता विकास नियंत्रण आणि प्रवर्तन नियमावली, २०३४ अनुसार आर/ सेन्ट्रल प्रभागामधील १८.३० चौ. मी. रुंद विकास आराखडा रोडमुळे बाधित होणाऱ्या गाव दहिसरमधील जमिनीचा धारण केलेला सी.टी.एस. क्र. १९९८/२०८/२ बृहन्मुंबई महानगरपालिका ह्यांस नि:शुल्क आणि सर्व बोज्यांपासून मुक्त असलेली जमीन हस्तांतरीत करण्याच्या संदर्भात बृहन्मुंबई २०३४ करीता विकास नियंत्रण आणि प्रवर्तन नियमावली च्या नियम ३२ मधील तरतूदीनुसार विकास अधिकार प्रमाणपत्राच्या (डीआरसी) स्वरूपात विकास अधिकार हस्तांतरण (टीडीआर)च्या संमतीसाठी येथे खालील परिशिष्टामध्ये अधिक विस्ताराने वर्णन करण्यात आलेल्या गाव दहिसरमधील जमिनीचा धारण केलेला सी.टी.एस. क्र. १९९८/२०८/२ चे मालक असलेली, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या सहकारी गृह निर्माण संस्था असलेली मे. अभिनव सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादित चे कायद्याच्या द्वारे स्थापित वकील श्री. सुभाष अनंत अवसरे ह्यांनी मान्यता दिली आहे.

मे. अभिनव कॉ-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेडला भूसंपादन कायदा, किंवा इतर कोणत्याही कायद्यांतर्गत किंवा परस्पर संमतीने आणि मे. अभिनव को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड च्या नावाने कोणतीही भरपाई मिळालेली नाही आणि दहिसर गावामधील जमिनीचा धारण केलेला सीटीएस क्र. १९९८/२०८/२ चे मालक म्हणून मे. अभिनव को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेडला ह्यांच्या नावाची मालमत्ता पत्रकामध्ये अद्याप आहे. मे. अभिनव को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेडला कोणतीही भरपाई मिळाली नसल्याने आता मे. अभिनव को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेडने डीआरसी स्वरूपात विकास अधिकार हस्तांतरणाच्या संमतीसाठी अर्ज केला आहे.

कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्ती (ज्याचा अर्थ व्यक्ती, संस्था, कंपन्या, व्यक्ती, वैधानिक संस्था/संस्था किंवा इतर कोणतेही प्राधिकरण इत्यादींचा समावेश आहे.) ज्यांच्या विरुद्ध कोणतीही माहिती असेल आणि/किंवा कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, स्वारस्य असेल, मालकी, विक्री, देवाणघेवाण, हस्तांतरण, भाडेपट्टा, सबलीज, गहाण, भेटवस्तू, भाडेकरू, रजा आणि परवाना याप्रमाणे, या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या जमिनीच्या संदर्भात दावा, मागणी किंवा आक्षेप लिखित किंवा तिचा कोणताही भाग, ट्रस्ट, वारसा, मृत्युपत्र, ताबा, देखभाल, गृहीतक, शुल्क, धारणाधिकार, सुलभता, खटला, वाद, कोणत्याही स्वरूपाचे किंवा अन्यथा किंवा कोणत्याही स्वरूपाचे इतर कोणतेही हक्क किंवा हितसंबंध आणि अर्जदाराचा डीआर वरील दावा कोणत्याही प्रकारचा न मिळाल्यावर अवलंबून आहे भूसंपादन कायदा, किंवा इतर कोणत्याही कायद्यांतर्गत किंवा वरीलप्रमाणे परस्पर संमतीने भरपाई आणि कोणाकडे त्याच्या विरुद्ध माहिती असल्यास, याद्वारे विधी अधिकारी, विधी विभागाच्या कार्यालयात खाली स्वाक्षरीदारांना महानगरपालिका मुख्य कार्यालय (ॲनेक्स बिल्डिंग), ३ रा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई :- ४०० ००१, अशा कोणत्याही कथित दाव्यासाठी/आक्षेपासाठी कागदोपत्री पुराव्यासह/ पुराव्यासह किंवा न्यायालयाच्या आदेशासह प्रकाशित झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कळवावे असे आवाहन करण्यात येत असून, असे जर न झाल्यास दावा किंवा मागणी मानली जाईल. सर्व हेतू आणि उद्देशांसाठी माफ केले गेले आहे असे समजण्यात येईल.

वर नमूद केल्याप्रमाणे डीआरसी च्या स्वरूपामध्ये विकास अधिकारांच्या हस्तांतरणाच्या संदर्भात कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, बृमनपा अनुदान टीडीआरची प्रक्रिया कोणताही संदर्भ न देता किंवा अशा कोणत्याही कथित दाव्याचा किंवा व्याजाचा संदर्भ न घेता स्वतःच्या गुणवत्तेनुसार पूर्ण करेल जे सर्व हेतू आणि हेतूंसाठी माफ केले गेले आहे असे मानले जाईल आणि ते बृमनपावर बंधनकारक असणार नाही.

**उपरोक्त संदर्भात परिशिष्ट**
**(टीडीआर – डब्ल्यूएस - आरसी –३६९)**

महापालिका प्रभाग आर/ सेन्ट्रल प्रभागामधील संमत विकास आराखडा २०३४ मधील संमत आराखड्यानुसार नोंदणीकरण जिल्हा आणि मुंबई शहर आणि मुंबई उप नगर जिल्ह्यामधील ८७६९.४० चौ. मी. किंवा साधारणपणे तितक्याच मोजमाप असलेल्या गाव दहिसर येथे असलेल्या आणि वसलेल्या रिक्त जमिनीचा किंवा मैदानाचा धारण केलेला सी.टी.एस. क्र. १९९८०८/२ चा सर्व खंड आणि भूखंड आणि सीमा पुढील प्रमाणे

पूर्वेस किंवा त्या दिशेने : गाव दहीसरचा सीटीएस क्र. १९९८/१३
पश्चिमेस किंवा त्या दिशेने : गाव दहीसरचा सीटीएस क्र. १९९७ आणि एसजीएनपीची हद्द
दक्षिणेस किंवा त्या दिशेने : गाव दहीसरचा सीटीएस क्र. १९९८/१३ आणि अभिनव नगर म्युन्सिपल ट्रेनिंग सेंटर
उत्तरेस किंवा त्या दिशेने : (सीटीआयआरसी, बोरीवली)

**३१ जानेवारी २०२५ रोजी दिनांकित**

**सही/-**
**(श्रीमती कोमल पंजाबी)**
**वकील आणि विधी अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका साठी**

**पीआरओ/२४१३/जाही/२०२४-२५**

**आठवड्याचा एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळा.**

## कृषी उद्योगातील परिवर्तनासाठी 'एआयएम' सज्ज

**मुंबई :** भारतीय कृषी क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन करण्यासाठी खते आणि शेती औषधे निर्मिती क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या ऑल इंडिया अँग्रो इनपुट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने पुढाकार घेतला असून याचाच एक भाग म्हणून पुण्यात अखिल भारतीय ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (AIM B2B ) बीटूबी परिषद आयोजित केली आहे. 'एआयएम'तर्फे आयोजित ही दुसरी परिषद आहे. गेल्यावर्षी नवी दिल्लीत ही परिषद आयोजित करण्यात आली होती. कृषी इनपुट क्षेत्राला समर्पित एका विशेष प्रदर्शनासह या परिषदेचे पुण्यातील कोरेगाव पार्क येथील द वेस्टिन हॉटेलमध्ये आयोजन केले आहे. येत्या ३ आणि ४ मार्च २०२५ रोजी ही परिषद होईल, अशी माहिती एआयएम असोसिएशनचे अध्यक्ष राजकुमार धुरगुडे-पाटील यांनी दिली. यावेळी असोसिएशनचे सचिव समीर पाथरे आणि खजिनदार सर्जेराव शिसोदे उपस्थित होते.




### महत्त्वाचे

## गावकऱ्यांनी यात्रेसाठी बुक केलं अख्खं विमान

**कोल्हापूर :** हौस करावी तर ती कोल्हापूरकरांनीच असा प्रत्यय आला आहे. 'कोल्हापूरकरांच्या हौसेला मोल नाही' असं उगाच म्हणत नाहीत. एखादी अशक्यप्राय गोष्ट करायची म्हणजे करायचीच, मग त्यासाठी काहीही करायला कोल्हापूरकर एका पायावर तयार असतात. आता हेच बघा की, कोल्हापूर जिल्ह्यातल्या भादवण गावातील गावकऱ्यांनी लक्ष्मीच्या यात्रेला अखंड विमानचं बुक केलं. 50 ते 60 जणांनी मुंबई ते कोल्हापूर असा विमान प्रवास करत यात्रेला हजेरी लावली. कोल्हापुरात उतरल्यानंतर यातील पहिल्यांदाच विमान प्रवास करणाऱ्यांनी आभाळातून खाली बघताना 'फिलिंग ढगात' गेल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. गावकऱ्यांनी केलेल्या या विमान प्रवासाची चर्चा मात्र सध्या जिल्हाभर सुरू आहे. कुठल्याही कोपऱ्यातून यात्रेला हजेरी : कोल्हापूर जिल्ह्यातला आजरा तालुका निसर्गसंपन्न म्हणून ओळखला जातो. या तालुक्यातील अनेक जण कामाच्या निमित्तानं मुंबई, पुणे यासारख्या मोठ्या शहरात स्थिरावले आहेत.

## पुण्यात 25 लाख रूपयांचे अंमली पदार्थ जप्त

**पुणे :** महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून प्रसिद्ध असलेल्या पुणे शहरात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या गुन्हेगाराच्या घटनांमुळे शहराचं नाव वेगळ्याच दृष्टीनं चर्चेत आहे. पुण्यात पुन्हा एकदा ड्रग्स आढळून आले आहेत. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने २५ लाख रूपयांचे ड्रग्स जप्त केले आहेत. हे अंमली पदार्थ उच्चभ्रू विमाननगर आणि मार्केटयार्ड परिसरातून जप्त करण्यात आले आहेत. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेनं तब्बल २५ लाख रूपयांचे ड्रग्स जप्त केले आहेत. उच्चभ्रू विमाननगर आणि मार्केटयार्ड परिसरात पुणे पोलिसांना कारवाई करत ड्रग्स जप्त केले आहेत. एकूण तीन कारवायांमध्ये २५ लाख ५१ हजारांचे मॅफेड्रॉन (एम. डी) आणि गांजा जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पहिल्या कारवाईत पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेचे कर्मचारी विमाननगर परिसरात गस्तीवर असताना एक व्यक्ती संशयितरित्या वावरत असल्याचे आढळून आले. संशयितरित्या वावरत असल्याचं आढळून आल्यानंतर पोलीस कर्मचाऱ्यांनं त्याची चौकशी केली. त्या व्यक्तीची चौकशी केली असता, त्याने त्याचे नाव कुमेल महम्मद तांबोळी असे सांगितले.

# आधी राजकीय हस्तक्षेप व्हायचा, आता होत नाही

### अजित पवारांचे खळबळजनक विधान

प्रतिनिधी
■ पुणे

सारथी संस्थेत स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अलीकडचा काळ हे स्पर्धेचे युग असून, आमच्या लहानपणी फार मोठ्या प्रमाणावर राजकीय हस्तक्षेप होत होता. त्यांना वाटले याला कुठे कामाला लावायचं तर ते त्याला कामाला लावून टाकत होते, अशा पद्धतीने कामाला लागून जायचं, आता मात्र ॲडमिशन देतानासुद्धा मेरिट पाहिलं जातं असल्याचं अजित पवारांनी अधोरेखित केलंय.



पुण्यातील सारथी येथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी भेट दिली, यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलंय. अजित पवार म्हणाले की, यावर्षी महाराष्ट्रातील खूप विद्यार्थी यूपीएससीच्या पूर्व परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाले पाहिजेत, अशा प्रकारची माझी विनंती आहे. राजश्री शाहू महाराजांच्या विचारांनी अन् प्रेरणांनी ही संस्था पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांनी त्या काळामध्ये तो आदर्श डोळ्यासमोर ठेवलेला होता किंवा तो कृतीमध्ये आणण्याचा प्रयत्न केलेला होता, त्याची आजदेखील समाजाला गरज आहे आणि ही वास्तू आपण सगळ्यांनी उभी केलेली आहे. यामध्ये आमचा हाच प्रयत्न की, उद्याची भावी पिढी अतिशय उत्तम पद्धतीने घडावी, असंही अजित पवारांनी सांगितलंय.

तसेच एक गोष्ट मुला-मुलींनो लक्षात ठेवा, अलीकडचा काळ हे स्पर्धेचे युग आहे. आम्ही ज्यावेळेस लहान होतो, तेव्हा फार मोठ्या प्रमाणावर राजकीय हस्तक्षेप होत होता आणि एखाद्याला कुठेही कामाला लावायचं तर ते याला कामाला लावून टाका, अशा पद्धतीने कामाला लागून जायचं. आता मात्र ॲडमिशन देताना पण मेरिट पाहिलं जातं होतं. अलीकडे श्रीमंतीला महत्त्व नाही, बुद्धिमत्तेला महत्त्व आहे. ज्याच्यामध्ये बुद्धिमत्ता आहे, तो जगामध्ये कितीही पुढे जाऊ शकतो, किती चांगल्या पद्धतीने सगळ्या गोष्टी त्याला पाहिजे, तशा पद्धतीने मिळू शकतात ही वस्तुस्थिती आहे, असंही यावेळी अजित पवार म्हणालेत.

ते पुढे म्हणाले की, विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या बाबतीमध्ये आई-वडिलांच्या फार अपेक्षा तुमच्या सगळ्यांकडून आहेत आणि तुम्हाला घडवण्याचा, तुम्हाला वाढवण्याचा, तुमच्यावर संस्कार करण्याचं काम तुमच्या जन्मापासून आजपर्यंत आई-वडील करीत आलेले आहेत.

# नामदेवशास्त्रींनी राजकारण न करण्याची प्रतिज्ञा धनंजय मुंडेंसाठी मोडली का?

प्रतिनिधी
■ धाराशिव

बीडमधील कथित गुन्हेगारीविषयी मंत्री धनंजय मुंडे यांची पाठराखण केल्याप्रकरणी भगवान गडाचे महंत नामदेवशास्त्री यांच्यावर चौफेर टीका सुरू आहे. त्यात आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते प्रकाश महाजन यांची भर पडली आहे. नामदेवशास्त्री यांनी गरजेच्यावेळी पंकजा मुंडे यांना गडाची कवाडे बंदी केली होती. आता त्यांनी राजकारण न करण्याची आपली प्रतिज्ञाही मोडली आहे, असे ते म्हणालेत.

प्रकाश महाजन शुक्रवारी धाराशिवच्या दौऱ्यावर होते. तिथे पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, स्वतःला न्यायाचार्य म्हणवणाऱ्या नामदेवशास्त्रींनी पंकजा मुंडे यांना गरज होती तेव्हा गडाचे दरवाजे बंद केले होते. या प्रकरणी त्यांनी न्याय करताना स्त्री - पुरुष असा भेद केला होता. यासाठी त्यांनी गडावर राजकारण न करण्याचा दाखला दिला होता. पण आता त्यांनी आपली प्रतिज्ञा मोडली व एक राजकीय भूमिका घेतली.



सध्या धनंजय मुंडे संकटात आहेत असे वाटत नाही. मीडियातून तसा भास निर्माण केला जात आहे. नामदेव शास्त्री आणि समाज यांनी घेतलेला हा निर्णय त्यावर कुणी बोलावे असे नाही. पण आपली मीडिया ट्रायल का सुरू आहे? याचा विचार धनंजय मुंडे यांनी जरूर केला पाहिजे. बीड जिल्हा परिषदेत सुरेश धस व धनंजय मुंडे यांनी गोपीनाथ मुंडे यांना त्रास दिला होता. आज स्वतःच हे दोघे भांडत आहेत, असेही प्रकाश महाजन यावेळी बोलताना म्हणाले.

## धनंजय मुंडेंनी राजीनामा दिलाच पाहिजे

■ नाशिक

भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी सकाळी पत्रकार परिषद घेत मंत्री धनंजय मुंडे यांची पाठराखण केली आहे. धनंजय मुंडे हे खंडणी प्रकरणात गुन्हेगार नाहीत हे मी 100 टक्के खात्रीने सांगतो, असे ते यावेळी म्हणाले आहेत. यावरून अनेक नेत्यांनी आता प्रतिक्रिया देण्यास सुरू केले आहे. भाजप नेते व अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी धनंजय मुंडे यांना घरचा आहेर दिला आहे.

धनंजय मुंडे यांना घरचा आहेर देताना नरेंद्र पाटील म्हणाले, एवढे सर्व प्रकरण झालेले असताना धनंजय मुंडे हे कराडच्या परळी येथील कार्यालयात जाऊन गाठीभेटी घेत होते. याचा अर्थ धनंजय मुंडे हे वाल्मीक कराडला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप



नरेंद्र पाटील यांनी केला आहे. तसेच धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना नरेंद्र पाटील यांनी आमदार सुरेश धस तसेच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांचे समर्थन केले आहे. नरेंद्र पाटील म्हणाले, अंजली दमानिया आणि सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. या दोघांचीही मागणी योग्य आहे.

## काळा घोडा महोत्सवात पर्यटकांना बचत गटांचे उत्पादन पर्यटकांच्या पसंतीस

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील फोर्ट परिसरात सध्या काळा घोडा कला महोत्सव सुरू आहे. या महोत्सवाचा आनंद घेण्यासाठी संपूर्ण मुंबईसह देशभरातील पर्यटक येत आहेत. मुंबई महापालिकेने अर्थसहाय्य केलेल्या बचत गटांनी देखील या महोत्सवात दालन प्रदर्शित केले आहेत. महिलांनी कलाकुसरीने आणि मोठ्या कौशल्याने तयार केलेली विविध आभूषणे, संसारोपयोगी वस्तू, खाद्यपदार्थ, सौंदर्य प्रसाधने पर्यटकांच्या पसंतीला उतरत आहेत. या निमित्ताने बचत गटांतील महिलांनाही उत्पन्न मिळत आहे.

कलाकारांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी मुंबईतील काळा घोडा महोत्सव हा विशेषत्वाने ओळखला जातो. या महोत्सवाच्या माध्यमातून नवकलाकारांना सतत उर्जा मिळत असते. यंदा २५ जानेवारीपासून या उत्सवाला सुरुवात झाली आहे. २ फेब्रुवारी २०२५ पर्यंत हा महोत्सव सुरू राहणार आहे. या महोत्सवात मुंबईसह देशभरातील कलाकारांनी आपली कलादालने प्रदर्शित केली आहेत.

गरजू महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी मुंबई महापालिका सातत्याने विविध योजना राबवित असते. महापालिकेच्या नियोजन विभागामार्फत महिला बचत गटांना अर्थसहाय्य केले जाते. या महिलांच्या बचत गटांनी तयार केलेल्या उत्पदनांना आंतरराष्ट्रीय ओळख मिळावी, प्रसिद्धी मिळावी तसेच त्यातून महिलांना आर्थिक उत्पन्न मिळावे, यासाठी देखील महापालिका विविध प्रकारचे व्यासपीठ उपलब्ध करून देत असते. याचाच एक भाग म्हणून काळा घोडा महोत्सवातही महापालिकेने या बचत गटांसाठी दालने (स्टॉल्स) उपलब्ध करून दिले आहेत. या महोत्सवात १८ बचत गट सहभागी झाले आहेत. त्यामध्ये बी, ई, एफ/दक्षिण, एफ/उत्तर, जी/दक्षिण, एच/पूर्व, एल, एम/पश्चिम, एन, एस, पी/उत्तर, आर/दक्षिण या प्रशासकीय विभागातील बचत गटांचा समावेश आहे. महापालिकेने अर्थसहाय्य केलेल्या बचत गटांनी निरनिराळ्या क्षेत्रात भरारी घेतली आहे. कापड व्यवसाय, आभूषणे, कापडी पिशव्या, खाद्यपदार्थ, गोधडी, शिल्पकला, महिलांसाठीच्या-कार्यालयीन कामकाजाच्या पर्स, बॅग अशी निरनिराळी उत्पादने त्यांनी तयार केली आहेत.

## तीन विद्यार्थिनींच्या धावत्या ऑटोतून उड्या, एकीचा मृत्यू



■ हिंगोली

धावत्या आटोतून तीन विद्यार्थिनींनी उडी मारल्याची धक्कादायक घटना हिंगोलीत घडली. या तीन विद्यार्थिनींपैकी पैकी एकीचा मृत्यू झाला असून दोघीजणी गंभीर जखमी असल्याची माहिती समोर येत आहे. या दोन विद्यार्थिनींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना तालुक्यातील राहोली पाटी शिवारात शुक्रवारी दुपारी घडली. विद्यार्थिनींनी रिक्षातून उड्या का मारल्या याची माहिती समोर आलेली नाही, मात्र पोलीस या घटनेचा अधिक तपास करत असून त्यानंतर नेमके कारण काय आहे हे स्पष्ट होईल.

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, हिंगोलीत शिक्षण घेणाऱ्या तीन विद्यार्थिनी शुक्रवारी दुपारच्या सुमारास ऑटोतून नर्सीनाकडे जात होत्या.

## कदम परिवाराचे सातवे राज्यस्तरीय कुलसंमेलन जामगे गावात

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

महाराष्ट्रातील प्राचीन कदम घराण्याचे सातवे भव्य राज्यस्तरीय कुलसंमेलन यावर्षी रत्नागिरी जिल्ह्यातील जामगे ( खेड ) येथे शिवसेना नेते व माजी पर्यावरण मंत्री रामदासभाई कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार ८ फेब्रुवारी व रविवार ९ फेब्रुवारी यादिवशी आयोजित करण्यात आले आहे.

प्राचीन सत्ताधीश कदंब राजवंशाचा इतिहास लाभलेल्या कदम कुटुंबीयांना स्वतःचे कुलाचार, परंपरा , वारसा याबद्दल माहिती व्हावी, नोकरी व्यवसायात एकमेकांना सहकार्य मिळावे तसेच घराण्यातील नामवंतांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देणे ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून क्षत्रिय मराठा कदम परिवार संस्थेने आजतागायत तुळजापूर, गिरवी ( फलटण ), गढीताम्हाणे ( सिंधुदुर्ग) , गलांडवाडी ( दौंड) , धामदरी ( नांदेड) , आणि आंबेचिंचोली( पंढरपूर) याठिकाणी मोठ्या उत्साहात संपन्न झाली आहेत. या वर्षाचे सातवे राज्यस्तरीय वार्षिक कुलसंमेलन कोकणातील खेडजवळच्या जामगे या गावामध्ये ८ व ९ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या कुलसंमेलनासाठी विद्यमान गृहराज्यमंत्री ना. योगेशदादा कदम यांचे मूळगावामध्ये महाराष्ट्रासह गोवा , मध्यप्रदेश, कर्नाटक , बडोदा या राज्यातूनही कदम बांधव उपस्थित राहणार आहेत.

कुलसंमेलनाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच शनिवारी ८ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी सात वाजता कुलदेवता श्रीतुळजाभवानीच्या जागर गोंधळाने कार्यक्रमाची सुरूवात होणार आहे.तसेच मागील कुलसंमेलनाच्या छायाचित्रांचा स्लाईड शो दाखवला जाणार आहे.

कुलसंमेलनाच्या मुख्य दिवशी सकाळी जामगे गावचे ग्रामदैवत श्रीकोटेश्वरी मानाई देवीचे दर्शन आणि पूजन झाल्यानंतर कदंब राजवंशाचे ध्वजारोहण गृहराज्यमंत्री योगेशदादा कदम यांचे हस्ते होणार आहे.त्यानंतर बदलापूर येथील सुप्रसिद्ध शस्त्रसंग्राहक सुनील कदम यांच्या शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. कदम कुलसंमेलनाचे उदघाटन शिवसेना नेते, माजी पर्यावरण मंत्री रामदासभाई कदम यांच्या हस्ते झाल्यानंतर प्रा. डॉ. सतीश कदम, उद्योजक मनोज कदम आणि चिपळूण येथील पराग कदम(अडरे) यांची कदम घराण्याचा इतिहास आणि सद्यस्थितीतील तरूणांना मार्गदर्शनपर व्याख्याने होणार आहेत.

## 'बार्टी'तर्फे अनुसूचित जातीच्या उमेदवारांना परीक्षेसाठीचे आर्थिक सहाय्य

■ पुणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मार्फत विविध परीक्षेच्या चाचणी परीक्षेच्या तयारीसाठी आर्थिक सहाय्य जाहीर करण्यात आले आहे. भारतीय वनसेवा मुख्य परीक्षा या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. 50,000/- आर्थिक सहाय्य देण्यात आले होते. आणि यु.पी.एस.सी. भारतीय वनसेवा परीक्षा या परीक्षांच्या व्यक्तिमत्व चाचणी परीक्षेकरिता पात्र उमेदवारास प्रती उमेदवार रक्कम रु. 25,000/- (एकरकमी) आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

13 जानेवारी 2025 रोजी संघ लोकसेवा आयोगाने भारतीय वनसेवा मुख्य परीक्षेचा निकाल घोषित केला आहे. सदर निकालानुसार भारतीय वनसेवा मुलाखती करिता (Personality Test) पात्र असलेल्या उमेदवारांना एकरकमी रक्कम रु. 25,000/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in > NOTICE BOARD> UPSC Indian Forest Service - Personality Test 2024 Financial assistance Scheme येथे भेट द्यावी. असे आवाहन करण्यात आले आहे.

## शहाद्यात बोगस आयुर्वेदिक औषधी निर्मिती

### अन्न औषध प्रशासनाच्या कारवाईत साडेसहा लाखाचा मुद्देमाल हस्तगत

■ नंदुरबार

शहादा शहरातील खेतिया रस्त्यावरील मलोणी शिवारात विना परवानगी आयुर्वेदिक औषधांची निर्मिती करण्यात येत होती. या कारखान्यावर अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने छापा टाकून कारवाई केली आहे.

या कारवाईत पथकाने सुमारे साडेसहा लाख रुपये किमतीचा कच्चा व पक्का माल तसेच औषध निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या साहित्याची जप्त करत तीन जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

शहादा शहरातील खेतिया रस्त्यावरील एका इमारतीच्या पाठीमागे असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये विना परवाना औषधांची निर्मिती करण्यात येत होती. नाशिक येथील सहाय्यक आयुक्त संदीप देवरे, धुळे येथील औषध निरीक्षक किशोर देशमुख, सहायक मंगेश भावसार नंदुरबार येथील सौरभ देवकर यांच्या पथकाने छापा टाकला.

## मलनिस्सारण वहिनी सेप्टिक टाकीला जोडण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करा - अभिजित सामंत

■ मुंबई

अंधेरी पूर्व येथील मलनिःसारण वाहिनी कार्य चलन करण्यात गत 2 वर्ष चाल ढकल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व त्वरित काम पूर्ण करून साईवाडी व आसपासच्या 10000 नागरिकांना GBS सारख्या रोगा पासून संरक्षित करण्यात यावे अशी मागणी अंधेरी विलेपार्ले पूर्व येथील माजी नगरसेवक अभिजित सामंत यांनी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांच्याकडे निवेदनाद्वारे केले आहे.

अंधेरी पूर्व येथील प्रभाग क्रमांक 84, जीवा महाले मार्ग, येथे 2017 पासून सामंत हे स्थायी समिती सदस्य म्हणून कार्यरत असताना पाठपुरावा करून सरते शेवटी 2020 ला (25 वर्ष solid rock लागल्यामुळे अर्धवट सोडलेले मलनिःसारण काम) मलनिस्सारण वाहिनीचे अर्धवट राहिलेले काम micro tunneling द्वारा सामंत यांनी केलेल्या प्रयत्नातून सुरू करून घेतले होते. हे काम 2021 अखेरीस पूर्ण झाले परंतु त्याचवेळी ना.सी. फडके मार्गवर उभारत असलेल्या उन्नत पुलाच्या कामाने मलनिस्सारण वाहिनी पंक्चर केली. म्हणून मग परत पूलविभाग, मलनिस्सारण विभाग ह्यांच्याशी पाठ पुरावा करूनही अजून तयार झालेल्या मलनिस्सारण वाहीनी जोडण्यासाठी चाल ढकल करीत आहेत. असे अभिजित सामंत यांनी निवेदनात म्हटले आहे. या होत असलेल्या चाल ढकलीमुळे साईवाडी विभागातील एस आर ए मध्ये रहाणाऱ्या सुमारे 3000 कुटुंबावर आरोग्य संकट उद्भवले आहे. सद्या धुमाकूळ घालणारा GBS हा जीवघेणा आजार दूषित पाण्यामुळे होतो असे कळते.

### दिल्लीत फडकणार मराठी साहित्याची पताका

## 'चपराक'च्या तब्बल 25 पुस्तकांचे संमेलनात होणार प्रकाशन

प्रतिनिधी
■ पुणे

दिल्ली येथे होत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित व्हावीत यासाठी अनेक प्रकाशकांचे सातत्याने प्रयत्न सुरू होते. यात 'चपराक प्रकाशन'ची वैविध्यपूर्ण विषयांवरील सर्वाधिक पंचवीस पुस्तके प्रकाशित होत असल्याची माहिती प्रकाशक आणि ग्रंथ प्रकाशन समितीचे अध्यक्ष घनश्याम पाटील यांनी दिली.

नाशिकच्या शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देणारे सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके यांचे पुस्तकानुभव हे वेगळ्या धाटणीचे पुस्तक आहे. यात १८३० ते १९१० या कालखंडातल्या निवडक पन्नास दुर्मीळ पुस्तकांची ओळख करून देण्यात आली आहे.

मुंबईतील काशिनाथ माटल यांनी कोविडच्या काळात ज्यांनी निरपेक्षपणे काम केले अशा कोविडयोद्ध्यांच्या प्रेरक कथा लिहिल्या आहेत. त्यांचा त्यावरील 'सावट' हा कथासंग्रह आणि 'बेवारस' हा दुसरा एक कथासंग्रहही प्रकाशित होतो आहे. ज्येष्ठ कवी अनंतराव घोगळे यांचा 'सोनचाफा' हा द्विभाषिक कवितासंग्रह आहे. त्यांच्या कविता मोडी आणि देवनागरी लिपित एकाचवेळी, एकाच पुस्तकात प्रकाशित होत आहेत. शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे यांच्या शिक्षणविषयक पुस्तकमालेतील दहा पुस्तके आजवर प्रकाशित झाली आहेत. एकच विषय, एकच लेखक आणि एकच प्रकाशक अशा मालिकेतील 'शिक्षणावर बोलू काही' आणि 'शिक्षणरंग' ही समारोपाची दोन महत्त्वपूर्ण पुस्तके प्रकाशित होत आहेत.

मुंबई महापालिकेचे निवृत्त आयुक्त गिरीश गोखले यांचे 'अरे सरकार सरकार' हे अनुभवकथन, कराडचे लेखक सुहास कोळेकर यांनी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनासंदर्भात लिहिलेले 'रॅगिंगचे दिवस' हे अनुभवकथन, सुरेखा बोऱ्हाडे यांनी भारतवर्षातील ६७ कर्तृत्ववान महिलांचा आढावा घेतलेला देदीप्यमान शलाका हा लेखसंग्रह, चंद्रलेखा बेलसरे यांचा 'ओव्हरटेक' हा भयकथासंग्रह, सातारचे लेखक डॉ. राजेंद्र माने यांचे 'मनापासून' हे ललित लेखांचे पुस्तक, आशिष निनगुरकर यांचा 'लालबत्ती ते कारंबा' हा पटकथासंग्रह, डॉ. बी. व्ही. कुलकर्णी यांचा 'परिणीता' हा कवितासंग्रह, हिरालाल पगडाल यांचे 'पुन्हा एकदा लंडन' हे प्रवासवर्णन अशी दर्जेदार पुस्तके वाचकांच्या भेटीस येत आहेत.

संगमेश्वरचे लेखक जे. डी. पराडकर यांनी गेल्या वर्षभरात फक्त कोकण याच विषयावरील आठ पुस्तके लिहिण्याचा आणि ती प्रकाशित होण्याचा विक्रम केला आहे. इंडिया रेकॉर्ड बुकने त्यांच्या या लेखन योगदानाची दखल घेतली. आता कोकणातील फुलांची सचित्र आणि तंत्रशुद्ध माहिती देणारे 'ऋतुरंग' हे त्यांचे नवे पुस्तक साहित्य संमेलनात प्रकाशित होत आहे. नाटककार डॉ. सोमनाथ मुटकुळे यांची तीन नाटके प्रकाशित होत आहेत. महत्त्वाचे म्हणजे संजय सोनवणी यांचे 'रत्नजडीत खंजिराचे रहस्य' ही कुमार कादंबरी, जनार्दन देवरे यांनी लिहिलेले क्रांतिकारक सरदार भगतसिंह हे चरित्र, राजेंद्र दिघे यांचा 'पाखरांची गाणी' हा बहुरंगी कवितासंग्रह, नांदेडच्या डॉ. भगवान अंजनीकर यांचे चरित्र स्मरण अशी काही बालसाहित्यातील पुस्तकेही प्रकाशित होत आहेत.

> दिल्लीच्या साहित्य संमेलनात पुस्तक प्रकाशित होण्याचा बहुमान मिळावा यासाठी अनेक लेखक उत्सुक होते. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातील आणि विविध साहित्य प्रकारातील दर्जेदार पुस्तके आम्ही प्रकाशनासाठी निवडली आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिले साहित्य संमेलन असल्याने राजधानी दिल्लीत आपला आवाज आणखी सशक्त व्हायला हवा. त्या दृष्टिने उत्तमोत्तम पुस्तके निवडण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.
>
> **- घनश्याम पाटील**
> **चपराक प्रकाशन**

## उदय पाटील पश्चिम रेल्वेच्या लोअर परळ वर्कशॉप मधून सेवानिवृत्त

प्रतिनिधी
■ मुंबई



उदय दत्तात्रय पाटील हे भारतीय रेल्वेतील पश्चिम रेल्वेच्या लोअर परळ वर्कशॉप मधून एकंदर ३३ वर्षे ४ महिने इतकी प्रदीर्घ सेवा देऊन काल सेवानिवृत्त झाले. लोअर परळ वर्कशॉपमधील विविध असोसिएशन, सेवा-संस्था आणि युनियन पदाधिकारी यांनी त्यांचा पुष्पगुच्छ आणि भेट देऊन सत्कार केला.

उदय दत्तात्रय पाटील भारतीय रेल्वेतील पश्चिम रेल्वेच्या लोअर परळ वर्कशॉपमध्ये सुरूवातीला नियुक्त झाले होते. त्यांनी या वर्कशॉपमध्ये विविध विभागात व सेक्शन्स मध्ये विभिन्न पदांवर काम केले आहे. एक गुणी कामगार, कुशल पर्यवेक्षक, मनमिळाऊ सहकारी, चळवळीतील कार्यकर्ता, लढाऊ नेता आणि उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून त्यांनी आपल्या सेवाकाळात ख्याती मिळविली होती.

सेवाकाळात उदय पाटील यांनी मुंबई सेंट्रल येथील विद्युत प्रयोगशाळा (Electrical Lab) येथे १० वर्षे सेवा देऊन या प्रयोगशाळेतील अनेक टेस्टसह यातील बारकाव्यात हातखंडा मिळवला होता. त्यांनी चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्सच्या मुंबई निरीक्षण युनिट येथेही ४ वर्षे प्रतिनियुक्तीवर सेवा दिली.

चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स येथे बनणाऱ्या/तयार होणाऱ्या लोको (इंजिना) साठी लागणाऱ्या विविध घटके (components) पुरवणाऱ्या पुरवठादार कंपन्यांची प्रत्यक्ष कार्यस्थळी जाऊन निरीक्षण अहवाल देण्याचे अत्यंत जबाबदारीचे कार्य त्यांनी उत्तमरीत्या केले. ते प्रतिनियुक्तीवरून आपल्या स्वगृही म्हणजे पश्चिम रेल्वेच्या लोअर परळ वर्कशॉपमध्ये अलिकडेच पुनश्च रुजू झाले होते.

## विराटच्या पदरी रणजीत निराशा, 6 धावांत त्रिफळाचित

**नवी दिल्ली :** विराट कोहली दशकभरानंतर रणजी ट्रॉफी खेळण्यासाठी उतरला होता. त्याची फलंदाजी पाहण्यासाठी अरुण जेटली स्टेडियमवर हजारो चाहते जमले होते. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सध्या फॉर्माच्या शोधात असणारा कोहली रेल्वेविरुद्धच्या सामन्यात आपली लय शोधेल आणि मोठी खेळी खेळेल, अशी सर्वांना अपेक्षा होती, पण विराटच्या पदरी निराशा पडली. रणजी ट्रॉफी सामन्यातही कोहली फ्लॉप झाला आणि त्याचा डाव अवघ्या ६ धावांवर आटोपला. रेल्वेकडून खेळणारा वेगवान गोलंदाज हिमांशू सांगवानने त्याला क्लीन बोल्ड केलं.देशांतर्गत क्रिकेटमध्येही विराट कोहलीला निराशेचा सामना करावा लागला आहे. विराट रेल्वेविरुद्ध केवळ १५ चेंडू खेळू शकला, ज्यामध्ये त्याने ६ धावा केल्या. यानंतर वेगवान गोलंदाज हिमांशू सांगवानने त्याला क्लीन बोल्ड केलं



## मुंबईत मंगळवारपासून राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धा




प्रतिनिधी
■ मुंबई

औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २८ वी आणि महिलांची २३ वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा येत्या मंगळवारपासून (दि.४ फेब्रुवारी) हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे सुरु होत आहे. स्पर्धेचे उद्घाटन मंगळवारी दुपारी ४ वाजता कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, खासदार अनिल देसाई, आमदार कालिदास कोळंबकर, कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, विकास आयुक्त (असंघटीत कामगार) तुकाराम मुंढे, कामगार आयुक्त डॉ.एच.पी.तुम्मोड, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होईल.

४ ते ७ फेब्रुवारी दरम्यान दररोज सायंकाळी ४ ते ९.३० वाजेपर्यंत स्पर्धेचे सामने होतील. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला (खुला) अशा तीन गटात स्पर्धेचे सामने खळवले जातील. राज्यभरातून सुमारे १०० हून अधिक संघ स्पर्धेत सहभागी होतील. तिन्ही गटातील अंतिम विजेत्या संघाना प्रत्येकी रु.५०,०००/-, अंतिम उपविजेत्या संघांना प्रत्येकी रु.३५,०००/-, अंतिम उपांत्य उपविजेता संघाना प्रत्येकी रु.२०,०००/- बक्षिस दिले जातील. तसेच विजेत्या संघांना सांघिक चषक, खेळाडूंना पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येईल.

स्पर्धेचे थेट प्रक्षेपण - मंडळाच्या mhlabourwelfare या युट्यूब चॅनल व फेसबुक पेजवर कबड्डी स्पर्धेचे थेट प्रक्षेपण केले जाईल, अशी माहिती कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी दिली आहे.

## तेंडुलकरचा होणार 'जीवनगौरव'ने सन्मान

▸ BCCIच्या मुख्य कार्यालयात आज होणार सोहळा ▸ मागच्या वेळी रवी शास्त्रींना मिळाला होता पुरस्कार

प्रतिनिधी
■ मुंबई

बीसीसीआय सचिन तेंडुलकरला जीवनगौरव पुरस्कार देणार आहे. शनिवार, 1 फेब्रुवारी रोजी बीसीसीआयच्या मुख्य कार्यालयात होणाऱ्या वार्षिक समारंभात सचिनला हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. बोर्डाच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेने याला दुजोरा दिला आहे. ते म्हणाले- होय, त्यांना (सचिन तेंडुलकर) सीके नायडू लाइफ टाईम अचिव्हमेंट अवॉर्ड दिला जाईल. हा पुरस्कार मिळवणारा सचिन हा ३१ वा क्रिकेटपटू ठरणार आहे.

५१ वर्षीय तेंडुलकरने भारतासाठी ६६४ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. कसोटी आणि वनडेमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम त्याच्या नावावर आहे. सचिनने २०० कसोटी सामन्यांमध्ये १५,९२१ धावा केल्या आहेत, तर ४६३ एकदिवसीय सामन्यांमध्ये १८,४२६ धावा केल्या आहेत. सचिनने एक टी-२० आंतरराष्ट्रीय सामनाही खेळला आहे. यापूर्वी २०२३ मध्ये हा पुरस्कार भारतीय संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांना देण्यात आला होता.



***जगातील सर्वच गोलंदाजांविरुद्ध सचिन यशस्वी***

*आपल्या काळातील महान फलंदाज मानला जाणारा तेंडुलकर प्रत्येक परिस्थितीत सहज धावा काढण्यासाठी ओळखला जात असे. त्याने वयाच्या १६ व्या वर्षी १९८९ मध्ये पाकिस्तानविरुद्ध कसोटी पदार्पण केले आणि पुढील २० वर्षांत त्याने जगभरातील गोलंदाजांविरुद्ध धावा केल्या. कसोटी आणि एकदिवसीय मिळून १०० शतके करण्याचा विक्रमही त्याच्या नावावर आहे. तेंडुलकर भारताच्या २०११ च्या विश्वचषक विजेत्या संघाचा प्रमुख सदस्य होता. हा त्याचा विक्रमी सहावा आणि शेवटचा विश्वचषक ठरला.*

१९८३ मध्ये, भारताच्या विश्वविजेत्या संघाचे सदस्य रवी शास्त्री आणि फारूक इंजिनियर यांना कर्नल सीके नायडू जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. फारुख यांनी भारतासाठी ४६ कसोटी आणि पाच एकदिवसीय सामने खेळले आहेत.रवी शास्त्री आणि फारुख इंजिनियर यांना २०२३ मध्ये जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.रवी शास्त्री आणि फारुख इंजिनियर यांना २०२३ मध्ये जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.हा पुरस्कार ३१ वर्षांपूर्वी सुरू करण्यात आला होता. BCCI ने हा पुरस्कार १९९४ मध्ये भारताचा पहिला कर्णधार कर्नल सीके नायडू यांच्या सन्मानार्थ सुरू केला होता. नायडू यांची १९१६ ते १९६३ दरम्यान ४७ वर्षांची प्रथम श्रेणी कारकीर्द होती. हा एक जागतिक विक्रम आहे. नायडू यांनी प्रशासक म्हणूनही या खेळाची सेवा केली.

38वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, उत्तराखंड

## महाराष्ट्राच्या नेमबाजांचा अचूक निशाणा

### पार्थला पदार्पणातच सुवर्ण, रुद्रांक्षला रौप्य तर किरणला कांस्य



प्रतिनिधी
■ डेहराडून

मराठमोळ्या नेमबाजांनी सुवर्णासह रौप्य व कांस्य पदकाच्या कमाई करीत 38व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील त्रिशूल शूटिंग रेजवर महाराष्ट्राची पताका अभिमानाने फडकवली. शेवटपर्यंत रंगतदार झालेल्या १० मीटर एअर रायफल्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या पार्थ माने या युवा खेळाडूने सोनेरी वेध घेतला, तर जागतिक सुवर्णपदक विजेता रुद्रांक्ष पाटील याने रुपेरी यश संपादन केले. सेनादलाचे प्रतिनिधित्व करणारा सातारा जिल्ह्यातील खेळाडू किरण जाधव याला कांस्यपदक मिळाले.

एअर रायफल्स स्पर्धेत अखेरच्या क्षणापर्यंत चुरस पहावयास मिळाली. १७ वर्षीय खेळाडू पाथने २५२ .६ गुण, रुद्रांक्ष याने २५२ .१ गुण, तर किरणने २३०.७ गुणांची नोंद करीत महाराष्ट्राला तिन्ही पदके जिंकून देण्याचा भीमपराक्रम केला. एका फेरीचा अपवाद वगळता पार्थने सुरुवातीपासून शेवटपर्यंत आघाडी टिकवत सुवर्ण यश संपादन केले. रुद्राक्ष हा मधल्या टप्प्यात सहाव्या स्थानावर होता. मात्र शेवटच्या चार टप्प्यांमध्ये त्याने एकाग्रता दाखवीत अतिशय अचूक नेम साधले आणि जोरदार मुसंडी मारत दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली. अर्थात त्याला पार्थ याची आघाडी तोडता आली नाही.

***पूजा दानोळेच्या रूपेरी यशाने महाराष्ट्राला महिलांना विजेतेपद***

***रुद्रपूर :*** *38व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील कोल्हापूरच्या पूजा दानोळेने आणखी एक पदकांची कमाई करीत रोड सायकलिंगमध्ये महाराष्ट्राला महिला गटाचे विजेतेपद जिंकून दिले. पूजाने शुक्रवारी साठ किलोमीटरच्या शर्यतीत रौप्य पदक पटकावले.आपली पदकांची मालिका कायम राखत सायकलिंग मधील वैयक्तिक टाईम ट्रायलमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या पूजा हिने आज ६० किलोमीटर अंतराच्या शर्यतीत रुपेरी कामगिरी केली. तिची या कामगिरीने महाराष्ट्राने रोड सायकलिंगचे विजेतेपदावर नाव कोरले.डोंगरदऱ्यातील रुद्रपूरमधील शेवटपर्यंत चुरशीने झालेल्या शर्यतीत पूजा हिने हे अंतर एक तास ४५ मिनिटे १०.५९० सेकंदात पार केले. सुवर्णपदक जिंकणाऱ्या गुजरातच्या मुस्कान गुप्ता हिला हे अंतर पार करण्यास एक तास ४५ मिनिटे १० .५१२ सेकंद वेळ लागला. स्पर्धेत १ सुवर्ण, १ रौप्य पदके जिंकून महाराष्ट्राने रोड सायकलिंगमधील महिला गटाचे विजेतेपदावर नाव कोरले. ही दोन्ही पदके पूजा दानोळेने जिंकून महाराष्ट्राची शान राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत उंचविली आहे.*

इंग्लंडला पाजले मोठ्या पराभवाचे पाणी

भारताच्या लेकींनी क्रिकेट मैदान गाजवले

## अंडर 19 विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक

वृत्तसंस्था
■ कौलालंपूर

१९ वर्षांखालील महिलांच्या टी-२० विश्वचषकात अजेय राहिलेल्या भारतीय संघाने अंतिम फेरीत धडक मारली आहे. अंडर-१९ महिला टी-२० विश्वचषकाचा दुसरा उपांत्य सामना भारत आणि इंग्लंड यांच्यात खेळवला गेला. शुक्रवार ३१ जानेवारी रोजी झालेल्या या सामन्यात भारतीय संघाने शानदार कामगिरी करत इंग्लंडचा ९ विकेट्स राखून पराभव केला. टीम इंडियाने सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.



भारतीय संघ १९ वर्षांखालील महिलांच्या टी-२० विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेविरूद्ध अंतिम सामना खेळणार आहे. या स्पर्धेत दोन उपांत्य फेरीचे सामने झाले. पहिल्या फेरीत दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला. तर दुसऱ्या फेरीत भारताने इंग्लंडला धूळ चारत अंतिम फेरीत प्रवेश केला. आता भारत आणि दक्षिण आफ्रिका विजेतेपदाच्या लढतीत आमनेसामने येणार आहेत.

हा सामना रविवार २ फेब्रुवारी रोजी होणार आहे. भारतीय संघ या स्पर्धेचा गतविजेता संघ आहे.भारत वि दक्षिण आफ्रिकेचा महिला अंडर-१९ संघ अंतिम फेरीत भिडताना दिसणार आहेत. हा अंतिम सामना बायुम्मास ओव्हल क्वालालंपूर येथे होणार आहे. भारतीय वेळेनुसार हा सामना दुपारी १२ वाजता खेळवला जाईल.भारतीय संघाने आतापर्यंत महिलांच्या अंडर-१९ टी-२० वर्ल्ड कपमध्ये एकही सामना गमावलेला नाही. त्यांनी सर्व सहा सामने जिंकले आहेत. ज्यामध्ये गट टप्प्यातील सामने सुपर सिक्स फेरी आणि उपांत्य फेरीतील सामन्यांचा समावेश आहे.

## शिवाजी पार्क जिमखान्यातर्फे कॅरम स्पर्धेचे आयोजन

**मुंबई :** शिवाजी पार्क जिमखान्याच्या वतीने ८ ते १० फेब्रुवारी २०२५ दरम्यान १६ व्या शिवाजी पार्क जिमखाना राज्य मानांकन कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने होणाऱ्या या स्पर्धेत पुरुष एकेरी व महिला एकेरी अशा दोन विभागात हि स्पर्धा संपन्न होणार असून विजेत्यांना १ लाख १० हजारांची रोख पारितोषिके व चषक देण्यात येणार आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या www. maharashtracarromassociation.com संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. महाराष्ट्र कॅरम असोसिएशनकडे नावे नोंदविण्याची अंतिम मुदत २८ जानेवारी २०२५ असून स्पर्धेत भाग घेण्यासाठी इच्छुक खेळाडूंनी आपल्या जिल्हा संघटनेशी संपर्क साधावा असे आवाहन अरुण केदार ,मानद सचिव महाराष्ट्र कॅरम असोसिएशन यांनी केले आहे.

## शासकीय वसतिगृहातील सोयी-सुविधा सुधारण्यावर भर देणार - मंत्री संजय शिरसाट

प्रतिनिधी
■ मुंबई

सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सोयी- सुविधांमध्ये सुधारणा करुन विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या पध्दतीने शिक्षण घेता यावे यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत विशेष प्रयत्न केले जातील, असे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.



मुंबईतील सामाजिक न्याय विभागाअंतर्गत सुरु असलेल्या संत मीराबाई मुलींचे शासकीय वसतिगृह वरळी 116, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह वरळी 117, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह वरळी 118 या वसतिगृहांना सामाजिक न्याय मंत्री शिरसाट यांनी भेटी देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदिप कांबळे, समाज कल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, सहाय्यक आयुक्त मुंबई शहर, उज्ज्वला सपकाळे, सहाय्यक आयुक्त मुंबई उपनगर प्रसाद खैरनार उपस्थित होते.

वरळी येथील शासकीय वसतिगृहाच्या इमारतीचा पुर्नविकास करताना विद्यार्थ्यांसाठी कमीत कमी 200 ते 250 चौ.फूट इतकी जागा प्रत्येक खोलीत उपलब्ध करुन देण्यात येईल, जेणेकरुन विद्यार्थी पुरेशा जागेत राहू शकतील. तसेच विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारच्या कॉट ,गादया व कपाटे, अद्ययावत कॉम्प्युटर, स्पर्धा परिक्षेची अद्ययावत पुस्तके उपलब्ध करुन देण्यात येतील. विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या निर्वाह भत्त्यामध्ये वाढ करण्यात येईल. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा यासाठी सुद्धा सामाजिक न्याय विभागातर्फे विशेष प्रयत्न केले जातील असेही शिरसाट यांनी सांगितले.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्याची सफारी होणार सुरु - मंत्री शेलार

प्रतिनिधी
■ मुंबई

बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्याची सफारी सुरु होणार असून काल राज्याचे माहिती तंत्रज्ञान तथा सांस्कृतिक कार्य मंत्री आणि मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी याबाबत घोषणा केली. तसेच या उद्यानातील दोन सिंह वर्षभरासाठी त्यांनी दत्तक घेतले आहेत.

मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. शेलार यांनी काल बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा पाहणी दौरा केला. यावेळी उपनगराचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, मुख्य वनरक्षक श्रीजी मल्लिकार्जुन, उपसंचालक रेवती कुलकर्णी, सहाय्यक वनरक्षक सुधीर सोनवणे, मुख्य सुरक्षा अधिकारी योगेश महाजन आणि संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.





संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये सध्या वाघ आणि सिंहाच्या दोन सफारी उपलब्ध आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागात बिबट्यांचे सापडलेले बछडे याच उद्यानात संरक्षित करण्यात आलेले आहेत. त्यांचे पालन करण्यात येते आहे. मात्र पर्यटकांना पाहण्यासाठी त्यांची सफारी उपलब्ध नाही. त्यासाठी सुमारे तीस हेक्टर जागा लागणार असून ही जागा या क्षेत्रात उपलब्ध आहे. तर सफारीसाठी प्रकल्प उभारण्यासाठी सुमारे 5 कोटी खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

या राष्ट्रीय उद्यानाला वर्षभरात २० लाख पर्यटक भेट देतात. जर बिबट्याची सफारी उपलब्ध झाली तर पर्यटकांची संख्या वाढेल व त्यातून वनक्षेत्राचे उत्पन्न वाढेल, अशी माहिती देऊन मुख्य वनरक्षक श्रीजी मल्लिकार्जुन यांनी मंत्री ॲड.शेलार यांच्यासमोर सादरीकरण केले. दरम्यान, याबाबत आढावा घेतल्यानंतर मंत्री आशिष शेलार यांनी या क्षेत्रात नवी बिबट्याची सफारी सुरू करा, त्यासाठी लागणारा निधी वन खात्याकडून आणि जिल्हा नियोजन समितीमधून आम्ही देऊ, असे त्यांनी सांगितले. याबाबत तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

**'भारत, भारती'ला पालकमंत्र्यांनी घेतले दत्तक**

या उद्यानात "भारत आणि भारती" हे तीन वर्षाचे दोन सिंह नुकतेच २६ जानेवारीला गुजरात मधून आणण्यात आले आहेत. त्यांना वर्षभरासाठी मंत्री ॲड.शेलार यांनी दत्तक घेतले असून त्यांच्या पालनपोषणासाठी होणारा खर्च मंत्री ॲड.शेलार वैयक्तिक रित्या करणार आहेत.

**४११ जणांना सुरक्षा कवच**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात ४०० वन मजूर असून ते उन, वारा , पाऊस याची तमा न बाळगता तसेच वन्य प्राण्यांचा अधिवास असलेल्या क्षेत्रात स्वतःचा जीव धोक्यात घालून सतत गस्तीचे काम करतात. यातील बहूसंख्य हे आदिवासी बांधव आहेत. तर मानवी वस्तीमध्ये वन्य प्राणी घुसल्यानंतर त्यांना पकडण्यासाठी जाणारी ११ जणांची टीम असून या सगळ्यांचा प्राण्यांशी थेट संपर्क येतो. मात्र या सगळ्यांचा सुरक्षा विमा उतरवण्यात आलेला नाही, ही बाब मंत्री ॲड.शेलार यांच्या निदर्शनास आली. त्यामुळे त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने याबाबत निर्देश दिले व या सगळ्यांचा सुरक्षा विमा उतरवण्यास सांगितले. त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देऊ अशी ग्वाही ही त्यांनी दिली.

## कुष्ठरोग शोध अभियानाअंतर्गत 49 लाख नागरिकांच्या तपासणीचे पालिकेचे उद्दिष्ट

महानगरातील ९ लाख घरांमध्ये कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात येणार

प्रतिनिधी
■ मुंबई

'राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमा'च्या मार्गदर्शक तत्वांनुसार वर्ष २०३० पर्यत कुष्ठरोग निर्मूलनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी कुष्ठरोग रूग्ण लवकरात लवकर शोधून औषधोपचाराखाली आणण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानाच्या माध्यमातून कुष्ठरोग प्रसाराची साखळी खंडीत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे ३१ जानेवारी २०२५ ते १५ फेब्रवारी २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध अभियान (LCDC) राबविण्यात येणार आहे. एकंदरीत ९ लाख ८९ हजार घरांतील अंदाजित ४९ लाख नागरिकांची तपासणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून करण्यात आहे.

कुष्ठरोग शोध अभियान २०२४-२५ अंतर्गत आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन कुष्ठरोग विषयक जनजागृती तपासणी करणार आहेत व कुष्ठरोगाच्या नवीन रुग्णांचा शोध घेणार आहेत. सदर अभियानाकरिता एकूण २८०७ चमू तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक चमूमध्ये एक महिला आरोग्य स्वयंसेविका व स्वयंसेवक यांचा समावेश असेल. सदर चमूंमार्फत एकंदरीत ९ लाख ८९ हजार घरांतील अंदाजित ४९ लाख लोकांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट आहे. या अभियानादरम्यान आढळलेल्या नविन कुष्ठरुग्णांची नोंदणी करण्यात येईल व त्यांना नजिकच्या महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रे, दवाखाने येथे मोफत उपचाराकरिता संदर्भित केले जाणार आहे.

***कुष्ठरोगाची लक्षणे व उपचार पध्दती***

*कुष्ठरोगामध्ये रूग्णांच्या त्वचेवर फिकट / लालसर बधीर चट्टा/ चट्टे येण, जाड बधीर तेलकट चकाकणारी त्वचा, कानाच्या पाळया जाड होणे, भुवयांचे केस विरळ होणे, तसेच तळहातावर व तळपायावर मुंग्या येणे, बधीरपणा व जखमा असणे, हाताची व पायाची बोटे वाकडी असणे, हात व पायांमध्ये अशक्तपणा जाणवणे,चालताना पायातुन चप्पल गळून पडणे इत्यादी लक्षणे आढळुन येतात.*

## देवनार कचराभूमी परिसरातील 39 दिव्यांच्या खांबांची चोरी

**मुंबई :** महानगरपालिकेकडून देवनार कचराभूमी परिसरात बसविलेल्या ३९ दिव्याच्या खांब्याची आज्ञात व्यक्तीने चोरी केली. ही बाब लक्षात आल्यानंतर कर्मचाऱ्यांनी याप्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.मुंबई शहरातील सर्वात मोठी कचराभूमी म्हणून देवनार कचराभूमी ओळखली जाते. गोवंडीच्या शिवाजी नगर परिसरात ही कचराभूमी आहे. गेल्या काही वर्षांत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आगीच्या घटना घडल्या होत्या. रात्रीच्या वेळी कचराभूमीतील कचऱ्याला आग लावण्यात येत असल्याचा पालिकेला संशय होता. त्यामुळे पालिकेने काही वर्षांपूर्वी संपूर्ण कचराभूमी परिसरात सौर ऊर्जेवर आधारित दिवे बसविले होते. या परिसरात एकूण २१० दिव्याचे खांब आहेत. मात्र गेल्या काही महिन्यात यापैकी ३९ दिव्यांचे खांब अज्ञात चोरांनी चोरल्याचे निदर्शनास आले आहे. तर काही ठिकाणी त्याची बॅटरीही चोरण्यात आली आहे.

## गेटवे जवळ मरीनामुळे ट्रॅफिक सिम्युलेशनचा अभ्यास करण्यासाठी एजन्सी नियुक्त करावी

मकरंद नार्वेकर यांची मेरीटाईम बोर्डाकडे मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने (एमएमबी) ट्रान्सपोर्ट मरीनाला प्रिन्सेस डॉक येथे हलवण्याबाबत आक्षेप व्यक्त केल्यानंतर, कुलाब्यातील नागरिकांनी गेटवे ऑफ इंडिया येथे ट्रॅफिक सिम्युलेशनचा अभ्यास करण्यासाठी एमएमबीने एक प्रतिष्ठित एजन्सी नियुक्त करावी अशी मागणी केली आहे.

एमएमबीच्या सीईओंना लिहिलेल्या पत्रात, माजी भाजप नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी गेटवे ऑफ इंडियाजवळ ट्रान्सपोर्ट मरीनाच्या उभारणीमुळे प्रकल्पाच्या वाहतुकीवर होणाऱ्या परिणामाबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

ट्रान्सपोर्ट मरीना हा दक्षिण मुंबईतील जेट्टींवरील रहदारी कमी करण्यासाठी एक महत्त्वाचा पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. रहिवाशांच्या आक्षेपानंतर, विधानसभा अध्यक्ष आणि कुलाब्याचे आमदार राहुल नार्वेकर यांनी तो प्रिन्सेस डॉक येथे हलवण्याची मागणी केली. १४ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीत, एमएमबीचे सीईओ प्रदीप पी यांनी सांगितले की प्रिन्सेस डॉक येथे हा प्रकल्प व्यवहार्य नाही.

बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी रहिवाशांना समजावून सांगितल्यानंतर प्रस्ताव पुढे नेण्याच्या सूचना दिला. तसेच गेटवेवरील वाहतूक कोंडीबद्दलच्या चिंतेबाबत, राणे यांनी ट्रॅफिक सिम्युलेशन अभ्यास करण्याची कल्पना मांडली.

## प्रतीक गोस्वामी मध्य रेल्वेचे नवे अतिरिक्त महाव्यवस्थापक

प्रतिनिधी
■ मुंबई

प्रतीक गोस्वामी मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक पदाचा पदभार काल स्वीकारला ते १९८८ च्या बॅचमधील भारतीय रेल्वे स्टोअर्स सेवेचे अधिकारी आहेत.

मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारण्यापूर्वी ते मुख्य दक्षता अधिकारी, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन



लि.च्या अतिरिक्त कार्यभारासह मध्य रेल्वेचे वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक आणि मुख्य दक्षता अधिकारी म्हणून काम कर त होते.

प्रतीक गोस्वामी हे मालवीय नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, जयपूर येथून सिव्हिल इंजिनीअरिंग पदवीधर आहेत आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई येथून पदव्युत्तर पदवीधर आहेत. त्यांनी १९८८ मध्ये भारतीय अभियांत्रिकी सेवा परीक्षा उत्तीर्ण केली आणि १९९० मध्ये भारतीय रेल्वे स्टोअर्स सेवेत रुजू झाले. त्यांच्या ३५ वर्षांच्या प्रतिष्ठित कारकिर्दीत, श्री गोस्वामी यांनी भारतीय रेल्वे आणि इतर संस्थांमध्ये विविध पदांवर प्रमुख पदे भूषवली आहे.

## सुनीता विल्यम्स यांनी नवव्यांदा केला स्पेसवॉक

**वॉशिंग्टन :** भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांनी गुरुवारी संध्याकाळी भारतीय वेळेनुसार 6.30 वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (ISS) स्पेसवॉक सुरू केला. यावेळी अंतराळवीर बुच विल्मोर हे देखील त्यांच्यासोबत होते. सुमारे 5.5 तास चाललेल्या या स्पेसवॉक दरम्यान, दोन्ही ISS चे बाह्य भाग स्वच्छ करण्यात आले आणि सूक्ष्मजीवांच्या प्रयोगांसाठी नमुने घेण्यात आले. रिपोर्ट्सनुसार, यावरून हे स्पष्ट होईल की ISS वर सूक्ष्मजीव जिवंत आहेत की नाही. याशिवाय तुटलेला अँटेनाही आयएसएसपासून वेगळा करण्यात आला. सुनीता विल्यम्स यांचा हा 9वा स्पेसवॉक होता. त्यांनी अंतराळवीर पेगी व्हिटसनचा 60 तास 21 मिनिटांचा विक्रम मोडून सर्वात लांब अंतराळ चालण्याचा विक्रम केला आहे. आतापर्यंत एकूण ६२ तास ६ मिनिटे अंतराळात स्पेसवॉक केला आहे. बुच विल्मोर यांचा हा पाचवा स्पेसवॉक आहे.



# हरियाणाच्या मुख्यमंत्र्यांवर फौजदारी खटला दाखल करा, त्यांनी यमुनेच्या पाण्यात विष टाकले

## माजी मुख्यमंत्र्यांनी निवडणूक आयोगाची भेट घेतली

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल शुक्रवारी सकाळी 11.30 वाजता निवडणूक आयोगाच्या कार्यालयात पोहोचले. यमुना विषबाधा प्रकरणी आयोगाने विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना त्यांनी हे पत्र दिले. यावेळी त्यांच्यासोबत दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मानही होते.

हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी यमुनेच्या पाण्यात जाणूनबुजून विष मिसळल्याचे केजरीवाल यांनी पत्रात लिहिले आहे. हरियाणाच्या मुख्यमंत्र्यांवर गुन्हा दाखल करावा. मीडिया रिपोर्ट्सनुसार, केजरीवाल अपॉइंटमेंट न घेता




निवडणूक आयोगाच्या कार्यालयात गेले होते. मात्र, आयोगाने विशेष बाब मानून केजरीवाल यांच्यासोबत बैठक घेतली. निवडणूक आयोगासाठी अमोनियायुक्त पाण्याच्या 3 बाटल्या घेऊन केजरीवाल पोहोचले आणि आयोगाला ते पिण्याचे आव्हान दिले.

डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी हरियाणाच्या मुख्यमंत्र्यांना फोन करून अमोनिया कमी करण्यास सांगितले. हरियाणाच्या मुख्यमंत्र्यांनी ते आवश्यक पावले उचलतील असे आश्वासन दिले, परंतु त्यांनी तसे केले नाही.दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांना अनेकवेळा फोन केला. नंतर हरियाणाच्या मुख्यमंत्र्यांनी फोन उचलणे बंद केले. दरम्यान, अमोनियाचे प्रमाण वाढतच गेले. यानंतर पंजाबच्या मुख्यमंत्र्यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या वतीने नायब सैनी यांनाही बोलावले.

15 जानेवारी (15 जानेवारी रोजी सुमारे 3.2 पीपीएम) नंतर अमोनियाची पातळी खूप वेगाने वाढू लागली आणि काही दिवसांनी 7 पीपीएमपर्यंत पोहोचली. प्रदूषित पाणी पाठवून दिल्लीच्या निवडणुकांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न हरियाणाकडून जाणीवपूर्वक होत असल्याचे दिसून आले.

नंतर मी सोशल मीडियावर लिहिले , निवडणुकीत पराभवाच्या भीतीने भाजपला दिल्लीतील जनतेची तहान भागवायची आहे. हे विषारी पाणी जलशुद्धीकरण केंद्रातही स्वच्छ करता येत नाही. भाजपवाल्यांना दिल्लीतील जनतेचा नरसंहार करायचा आहे. हे आम्ही अजिबात होऊ देणार नाही. मी म्हणालो होतो की दिल्लीचे मुख्यमंत्री आणि पंजाबचे मुख्यमंत्री यांनी या विषयावर चर्चा करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे तातडीची वेळ मागितली होती. अत्यंत प्रदूषित पाणी दिल्लीत पाठवून दिल्लीच्या निवडणुकांवर प्रभाव पाडण्यासाठी भाजपच्या हरियाणाच्या मुख्यमंत्र्यांकडून जाणीवपूर्वक कट रचण्यात आला होता.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर हे पत्र पोस्ट करत केजरीवाल यांनी लिहिले - दिल्लीच्या जनतेचे खूप खूप अभिनंदन. आम्ही प्रत्येक संघर्षात यश मिळवले. जे विषारी पाणी दिल्लीला पाठवले जात होते ते आता थांबले आहे. दिल्लीत येणाऱ्या पाण्यात अमेरिकेचे प्रमाण 7 पीपीएमवरून 2 पीपीएम झाले आहे. घोषणाबाजी आणि संघर्ष केला नाही तर आज दिल्लीतील दाट लोकसंख्येला पाणी मिळत नाही. आम्ही दिल्लीला मोठ्या जलसंकटातून वाचवले.

### शंभू सीमेवर आणखी एका शेतकऱ्याचा मृत्यू

## डल्लेवाल यांची प्रकृतीही खालावली, आज उपोषणाचा 66 वा दिवस



वृत्तसंस्था
चंदीगड

पंजाब आणि हरियाणाच्या शंभू सीमेवर सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनादरम्यान आणखी एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे. त्या शेतकऱ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. या शेतकऱ्याचे नाव प्रगत सिंग आहे जे अमृतसरच्या लोपोके तहसीलमधील कक्कर गावचे रहिवासी होते. त्या शेतकऱ्याकडे २ एकर जमीन होती.

पंजाब आणि हरियाणाच्या शंभू आणि खानौरी सीमेवर सुरू असलेल्या किसान आंदोलन-२ ला १३ फेब्रुवारी रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. अशा परिस्थितीत, दोन्ही आघाड्यांवर शेतकऱ्यांची संख्या वाढवली जात आहे.

तसेच, ११ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या तीन किसान महापंचायत यशस्वी करण्यासाठी शेतकरी नेते रणनीती आखण्यात व्यस्त आहेत. शेतकरी नेते जगजीत सिंह डल्लेवाल यांच्या उपोषणाचा आज (शुक्रवार) ६६ वा दिवस आहे. मात्र, उपोषणामुळे डल्लेवाल यांचे शरीर कमकुवत झाले आहे. यामुळे त्यांना ताप आला आहे. १४ फेब्रुवारी रोजी केंद्र सरकारने चंदीगडमध्ये शेतकऱ्यांसोबत बैठक घेण्याचा निर्णय घेतला आहे. याआधी, शेतकरी सीमेवर मोठ्या संख्येने जमून दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत की आंदोलन सुरू होऊन एक वर्ष झाले तरी त्यांचे मनोबल अजूनही उंच आहे. तसेच, ते एक दीर्घ लढाई लढण्यास तयार आहेत.

दुसरे म्हणजे, शेतकरी अजिबात आक्रमकता दाखवत नाहीत. ते पूर्णपणे शांततेत समोर उभे आहेत. त्याच वेळी, डल्लेवाल यांचे उपोषण ज्या पद्धतीने सुरू आहे. यामुळे सरकारला विचार करण्यास भाग पाडले आहे. डल्लेवाल यांनी स्वतः लोकांना या चळवळीत सामील होण्याचे आवाहन करणारा संदेश पाठवला आहे.

शेतकऱ्यांचे लक्ष हे आंदोलन पंजाबबाहेर नेण्यावर आहे. अशा परिस्थितीत आता हरियाणा आणि राजस्थानवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या नियोजनाअंतर्गत, हरियाणातील शेतकऱ्यांचे पूर्वीचे गट सतत खानौरीला पोहोचत होते. आता, महापंचायत आणि ट्रॅक्टर मार्च हे त्याचाच एक भाग आहेत. कारण इतर राज्यांतील शेतकरी सामील होताच सरकारवरही दबाव येईल.

पान 1 वरुन...

## महायुती सरकारकडून तपासासाठी SIT स्थापन

तपास पथकाला अहवाल सादर करण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. भाजपाचे आमदार प्रवीण दरेकर यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात एक पेन ड्राईव्ह सादर केला होता. या पेन ड्राईव्हमध्ये सदर षडयंत्राचे स्टिंग ऑपरेशन असल्याचा दावा त्यांनी केला होता. पेन ड्राईव्ह सादर केल्यानंतर त्यांनी या प्रकरणाची एसआयटीद्वारे चौकशी व्हावी, अशी मागणी केली. सभागृहात कॅबिनेट मंत्री शंभूराज देसाई यांनी सरकारतर्फे उत्तर देताना एसआयटी स्थापन केली जाईल, असे सांगितले होते. फडणवीस यांना अडकविण्यासाठी खोटा गुन्हा दाखल करण्याबाबत एक पोलीस उपायुक्त सामान्य नागरिकावर दबाव टाकत असल्याचे या व्हिडीओत दिसत असल्याचा दावा प्रवीण दरेकर यांनी केला होता. विशेष म्हणजे मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनीही अशाच प्रकारचा आरोप मागे केला होता. एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना ते म्हणाले होते, "शरद पवार यांचे निवासस्थान असलेल्या सिल्वर ओकवर बैठक पार पडली होती. या बैठकीला शरद पवार, अनिल देशमुख, अनिल गोटे आणि पी.पी. चव्हाण उपस्थित होते. या बैठकीत त्यांनी माझ्यावर विरोधकांवर खोटी कारवाई करण्यासंदर्भात दबाव आणला. मात्र, मी त्यांना नकार दिला. मी अशाप्रकारे कुणावरही खोटा गुन्हा दाखल करणार नाही, असे स्पष्टपणे सांगितले."

## कुंभमेळ्यावरुन परतताना भाविकांच्या वाहनाचा अपघात, भीषण दुर्घटनेत सहा ठार

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

उत्तर प्रदेशच्या गाजीपूर जिल्ह्यातील प्रयागराजमधील महाकुंभात स्थान केल्यानंतर घरी परतताना भाविकांच्या वाहनाचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. नंदगंज पोलीस स्टेशनच्या हद्दीतील कुसुम्ही महामार्गावर ही भीषण दुर्घटना घडली. या अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या अपघातामधील १० जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.



नंदगंज ठाणे हद्दीतील वाराणसी-गोरखपूर महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. महाकुंभाहून पिकअप व्हॅनने भाविक गाजीपूरच्या दिशेने जात होते. त्याचवेळी वाराणसी-गोरखपूर महामार्गावर पिकअप अनियंत्रित होऊन ट्रकला धडकला. या अपघातानंतर घटनास्थळी एकच खळबळ उडाली. ट्रकला धडकल्यानंतर पिकअपमधील लोक रस्त्यावर पडले. याच दुर्घटनेत ६ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

भीषण अपघातानंतर स्थानिकांनी सूचना पोलिसांना दिली. अपघाताची सूचना मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळावरील मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवले. या अपघातामधील जखमींना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मृतांमध्ये २ महिला, २ पुरुष आणि २ लहान मुलांचा समावेश आहे. या घटनेची माहिती मिळताच जिल्ह्याचे प्रशासकीय अधिकारी घटनास्थळी पोहोचत माहिती जाणून घेतली. तसेच त्यांनी जखमींची विचारपूस केली.

## नेदरलँडच्या म्युझिअममधून 2500 वर्षापूर्वीचे शिरस्त्राण चोरीला

ॲमस्टरडॅम

नेदरलँडमधील ड्रेन्टस् मुझिअममधून ४५० इसव सन पूर्व काळातील एक सोन्याचे शिरस्त्राण व ब्रेसलेट चोरीला गेले आहे. २५ जानेवारी रोजी ही घटना घडली. हे (शिरस्त्राण) हेल्मेट व ब्रेसलेट सोन्याचे असून जवळपास २५०० वर्षापूर्वीचे आहे. इतिहासकालिन गेटो- डेशिअन या राजवटीतील मौल्यवान अशा या दोन्ही वस्तू आहेत.

नॅशनल हिस्ट्री म्युझिअम ऑफ रोमानिया यांच्याकडून कर्ज स्वरुपात प्रदर्शनासाठी हे ऐवज नेदरलँडने घेतले होते. बुचरेस्ट शहरातील ड्रेन्ट मुझिअममध्ये प्रदर्शनात या वस्तू ठेवल्या होत्या. स्थानिक पोलिसांनी सांगितले की ही चोरी करण्यासाठी चोरांनी म्युझिअमचा दरवाजा स्फोटाने उडवला. 'म्युझिअमच्या इतिहासातील हा काळा दिवस आहे' अशी प्रतिक्रीया ड्रेन्ट मुझिअमचे संचालक हॅरी ट्यूपान यांनी म्हटले आहे. १७३ वर्षाच्या मुझिअमच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडले आहे असे ते म्हणाले. १९९० च्या दशकात डेशिअन किल्ल्यामधून अनेक सोन्याचे ऐवज लुटून नेले होते. यापैकी या दोन वस्तू होत्या. यांची किंमत कोट्यवधी रुपयांच्या घरात आहे.

## सुहास पटवर्धन यांचे पर्यटनाबरोबरच शाळेत एक तास इंग्लिशचे ज्ञानदान

वृत्तसंस्था
दिसपूर

आसाम राज्यात पर्यटनासाठी गेल्यावर " काय ती झाडी, काय ते डोंगर " हे उदगार सहज तोंडातून बाहेर पडतात. सकाळी निसर्ग दृष्याचा आस्वाद घेतल्यावर दुपारच्या वेळात जेवण व थोडा वेळ विश्रांती करुन संध्याकाळपर्यंत पुन्हा एकदा प्रेक्षणीय स्थळांना भेटी असा पर्यटकांचा दिनक्रम असतो. नुकतेच एका ट्रॅव्हल कंपनीमार्फत काझीरंगा ( आसाम)




येथील जगप्रसिद्ध पार्क पाहून येतांना एक माध्यमिक शाळा दिसताच जेवण अजून तासाभरात होणार असल्याने आदर्श राष्ट्रीय इंग्रजी विषय शिक्षक पुरस्कार प्राप्त व Learn to enjoy English या पुस्तकाचे लेखक सुहास पटवर्धन यांनी तेथील शाळेला भेट देऊन ९ वीच्या विद्यार्थ्यांना "इंग्रजीच्या अभ्यासाचे मंत्र आणि तंत्र" या विषयावर मार्गदर्शन केले .

केवळ वाचन म्हणजे अभ्यास नव्हे तर वाचनाबरोबरच भरपूर लिखाण केले तरच खऱ्या अर्थाने अभ्यास झाला असे म्हणता येईल. लिखाणामुळे हस्ताक्षर सुधारते, लिखाणाची गती वाढते, शब्दांचा अचूक वापर केला जातो ,स्पेलिंग लक्षात राहते व त्यामुळे आत्मविश्वासाने परिक्षेला सामोरे जाता येते असे पटवर्धन सरांनी हसत खेळत समजावून सांगितले. ज्येष्ठ शिक्षक दिनेश सिंग यांनी वर्गात उपस्थित राहून प्रसंगी दुभाष्याची भूमिका पार पाडली .

## टॉयलेट सीट चाटायला भाग पाडलं... 15 वर्षीय विद्यार्थ्याची रॅगिंगला कंटाळून आत्महत्या

वृत्तसंस्था
कोची

केरळमध्ये शाळेतील रॅगिंग आणि छळाला कंटाळून एका १५ वर्षीय विद्यार्थ्याने १५ जानेवारी रोजी आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कोची येथील एका प्रसिद्ध खाजगी शाळेत हा विद्यार्थी शिक्षण घेत होता. शाळेत सतत त्याचा रॅगिंग आणि छळ केला जात असे. अखेर याला कंटाळून शाळेतून परत आल्यानंतर या विद्यार्थ्याने स्वत:चे जीवन




संपवले. दरम्यान या विद्यार्थ्याच्या आईने मुलाला शाळेत टॉयलेट चाटण्यास भाग पाडण्यात आल्याचा तसेच टॉयलेट फ्लश होत असताना त्याचे डोके टॉयलेटमध्ये कोंबण्यात आल्याचा दावा केला आहे.

आत्महत्या केलेल्या मुलाच्या आईने थ्रिपूनीथूरा येथील हिल पॅलेस पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली आहे. चाइल्ड कमिशनकडे देखील याचिका दाखल केली असून ज्यामध्ये त्यांनी मुलाच्या छळाची कसून चौकशी केली जावी अशी मागणी करण्यात आली आहे.

या तक्रारीत त्या मुलाच्या यापूर्वीच्या शाळेच्या उपमुख्याध्यापकांनी व्यवस्थित वागणूक न दिल्याचा आरोपही त्याच्या आईने केला आहे.

## सरपंच हत्या प्रकरणातील आरोपींची मानसिकताही समजून घेतली पाहिजे...

**पान १ वरुन..**

'नामदेवशास्त्री म्हणाले की, धनंजय मुंडे हा राजकीय घराण्यात जन्माला आलेला मुलगा आहे. विविध पक्षाचे नेते त्याचे बालमित्र आहेत. तो गुन्हेगार नाही. त्याला गुन्हेगार का ठरवत आहेत, हे समजत नाही, असाही सवाल त्यांनी केला. भगवानगड हा भक्कमपणे धनंजय मुंडे यांच्या पाठीशी आहे. धनंजय मुंडे खंडणीवर जगणारा माणूस नाही, असे सांगत नामदेव शास्त्री म्हणाले की, गेले 53 दिवस त्यांची मीडिया ट्रायल सुरु आहे. नामदेवशास्त्री यांनी मस्साजोग घटनेतील आरोपींबद्दल म्हटले की, ज्या लोकांनी हे प्रकरण केले, हत्या केली, त्यांची मानसिकता का बिघडली, हे मीडिया का दाखवत नाही? त्यांना मारहाण का झाली, हेही दखल घेण्याजोगे आहे. मारहाण झाली तो त्यांच्या गावाचा मुद्दा आहे, असे नामदेवशास्त्री म्हणाले.

## गर्लफ्रेंड आणि तिच्या वडिलांचा मृतदेह 4 महिने घरात दडवला

### होमिओपॅथी डॉक्टरचे भयानक कृत्य

वृत्तसंस्था
चेन्नई

तमिळनाडूच्या चेन्नई येथे एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. येथे एका ३४ वर्षीय होमिओपॅथी डॉक्टर सॅम्युएल एबेनेजर संपत याने आपल्या ३७ वर्षीय प्रेयसीची हत्या केल्याची घटना समोर आली आहे. प्रेयसीचे वडील सॅम्युअल शंकर (७८) यांच्या मृत्यूनंतर या दोघांमध्ये भांडण झाले होते. ज्यादरम्यान सिंथियाने वडीलांच्या मृत्यूबद्दल संपत याला जबाबदार धरले होते. यावरून दोघांमध्ये कडाक्याचा वाद झाला आणि संपत याने सिंथियाला धक्का देऊन खाली पाडले. पण पडल्यानंतर सिंथिया बेशुद्ध झाली आणि त्यानंतर तिचा मृत्यू झाला.

आरोपीने कायद्याच्या कचाट्यात अडकण्यापासून वाचण्यासाठी प्रेयसी आणि तिच्या वडीलांचा मृतगेह चार महिन्यांहून अधिक काळापर्यंत स्वतःच्या फ्लॅटमध्येच ठेवला. तसेच त्याने मृतदेहाची दुर्गंधी रोखण्यासाठी रसायनांचा वापर केला.

गुरूवारी खूपच दुर्गंधी येऊ लागल्यानंतर शेजाऱ्यांनी पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी घटनास्थळी गेल्यानंतर दोन मृतदेह ताब्यात घेतले. पोलिसांनी संपत याला अटक केली आहे.

## झुकेरबर्ग ट्रम्प यांना 217 कोटी रुपयांची भरपाई देणार

### खटला न्यायालयाबाहेर निकाली; मेटाने 2021 मध्ये फेसबुक-इन्स्टा खाते बंद केले होते

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

मार्क झुकेरबर्ग यांची कंपनी मेटा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना 25 मिलियन डॉलर (सुमारे 217 कोटी रुपये) नुकसानभरपाई देणार आहे. न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी याप्रकरणी कायदेशीर तोडगा काढला आहे.

6 जानेवारी 2021 रोजी यूएस संसदेच्या कॅपिटल हिलमध्ये झालेल्या दंगलीनंतर मेटाने फेसबुक आणि इंस्टाग्रामवरून ट्रम्प यांचे खाते हटवले होते. त्यावेळी ट्रम्प अध्यक्षपदावर होते. मेटा यांच्या या निर्णयाबाबत ट्रम्प यांनी खटला दाखल केला होता. आता झुकेरबर्गला हे प्रकरण न्यायालयाबाहेर सोडवायचे आहे.



वृत्तानुसार, नुकसानभरपाईपैकी $22 दशलक्ष (रु. 190 कोटी) ट्रम्प यांच्या अध्यक्षीय लायब्ररीसाठी जाईल आणि उर्वरित रक्कम कायदेशीर शुल्क आणि इतर गोष्टींवर खर्च केली जाईल. मार्क झुकेरबर्ग (सर्वात डावीकडे) आपल्या पत्नीसह ट्रम्प यांच्या शपथविधी समारंभाला उपस्थित होते. ट्रम्प यांच्या विजयापूर्वी मेटाने खाते पुनर्संचयित केले जुलै 2024 मध्ये अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीपूर्वी मेटाने ट्रम्प यांची फेसबुक आणि इंस्टाग्राम खाती पुन्हा सुरू केली होती. नोव्हेंबरच्या निवडणुकीत ट्रम्प यांच्या विजयानंतर मेटा यांनी त्यांच्याशी संबंधित प्रकरणे हाताळण्यास सुरुवात केली.

ट्रम्प यांच्या विजयानंतर झुकेरबर्ग त्यांना भेटण्यासाठी फ्लोरिडातील मार-ए-लागो या रिसॉर्टमध्ये गेले. एक महिन्यानंतर, मेटाने ट्रम्प यांच्या शपथविधी कार्यक्रमासाठी 1 दशलक्ष डॉलर्स (8.6 कोटी रुपये) दान केले. ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्याला मार्क झुकेरबर्गनेही हजेरी लावली होती. झुकेरबर्गने गेल्या बुधवारी झालेल्या बैठकीत अमेरिकन टेक कंपन्यांना पाठिंबा दिल्याबद्दल आणि 'अमेरिकन मूल्यांचे' संरक्षण केल्याबद्दल ट्रम्प प्रशासनाचे कौतुक केले.

ट्रम्प आणि झुकेरबर्ग अनेक वर्षांपासून एकमेकांचे विरोधक आहेत. 2017 मध्ये ट्रम्प यांनी मार्क झुकरबर्गच्या फेसबुक प्लॅटफॉर्मला 'ट्रम्पविरोधी' म्हटले होते. चार वर्षांनंतर अकाउंट डिलीट केल्यानंतर ट्रम्प आणि झुकेरबर्ग यांच्यातील संबंध आणखी बिघडले. ट्रम्प यांनी मार्च 2024 मध्ये झुकेरबर्गवर राग व्यक्त केला होता आणि फेसबुकला 'लोकांचा शत्रू' म्हटले होते.

### मुंबईतील संस्थेचे ईशान्येकडे 'कॅन्सर मुक्त जागरुकता अभियान'

## अरुणाचल प्रदेशच्या दुर्गम भागात आरोग्य सुविधा पोहोचवण्यात यश

वृत्तसंस्था
इटानगर

छबी सहायोग फाउंडेशन आणि देव देश प्रतिष्ठान या मुंबईत कार्यरत असलेल्या संस्थेमार्फत उत्तरेकडील राज्यात आरोग्य सुविधा पुरविणारे उपक्रम आयोजित करत असून 'कॅन्सर मुक्त जागरूकता अभियान' राबविण्यात येत आहेत. अरुणाचल प्रदेशातील दुर्गम भागात आरोग्य सुविधा पोहोचवण्यासाठी 'कॅन्सर मुक्त जागरूकता अभियान' अंतर्गत दिनांक २८ जानेवारी रोजी सिंगचुंग आणि दिनांक २९ जानेवारी रोजी थ्रिजिनो येथे मोफत कॅन्सर तपासणी व आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरांसाठी स्टेट कॅन्सर सोसायटीच्या कॅन्सर स्क्रीनिंग व्हॅनचा वापर डॉ. सॅम त्सेरिंग ( नोडल ऑफिसर ) यांच्या विशेष प्रयत्नांतून करण्यात आला . हा



उपक्रम आमदार तेनझिन न्यिमा ग्लोव ( 6 थ्रिजिनो- बुरगाव असेंब्ली ) यांच्या सौजन्याने राबवण्यात आला. दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी सिंगचुंग येथे आरोग्य शिबिर उदघाटन एडीसी सिंगचुंग श्रीमती मुर्निया काकी यांच्या हस्ते झाले. प्रमुख उपस्थितींमध्ये श्रीमती जुमतेर ग्लोव (मा. आमदार तेनझिन न्यिमा ग्लोव यांच्या पत्नी), डॉ. ड्रोमा (MO, CHC सिंगचुंग) आणि आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी थ्रिजिनो येथे आरोग्य शिबिर संपन्न झाले. येथील शिबिराचे उद्घाटन वरिष्ठ नेते इंजि. बॉनी शक्रिन्सो यांच्या हस्ते झाले. यावेळी एडीसी थ्रिजिनो टोपिक काकी (APCS), डॉ. किरेन देरु (MO, थ्रिजिनो PHC) आणि वैद्यकीय कर्मचारी उपस्थित होते. या मोहिमेत MICWS तर्फे चेअरमन खांडू थुंगोन, छबी सहायोग फाउंडेशन तर्फे महासचिव पार्थो रॉय, वरिष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. बी.के. पाटील, वरिष्ठ आरोग्य प्रशासक व अभियान संरक्षक डॉ. अविनाश गारगोटे, डॉ. दिव्या श्रीनिवास तसेच देव देश प्रतिष्ठान तर्फे डॉ. रविंद्र कांबळे, डॉ. स्नेहा भट्टे व जयगणेश लिंगाथार आदी उपस्थित होते.